


सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

आसमंतसह

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | रविवार, ३० मार्च २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४१ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com







विनम्र अभिवादन



रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा आज तिथीनुसार जन्मदिन

# पंढरपूर कॉरिडोरच्या बाधितांना मिळेल जम्बो मोबदला : मुख्यमंत्री

## देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ मार्च -**

आत्तापर्यंत कुठल्याही प्रकल्पा मध्ये मिळाला नाही असा मोबदला पंढरपूर कॉरिडोरमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना दिला जाणार असल्याची ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पंढरपूर विकास आराखडा अर्थात पंढरपूर कॉरिडोर संदर्भातील बैठकीसाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी (ता.२९) पंढरपूर मध्ये आले होते. त्यावेळी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे, सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख आदींसह जिल्ह्यातील इतर आमदार तसेच पदाधिकारी आणि विविध शासकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पंढरपूर कॉरिडोरचे काम लवकर सुरु करायचे आहे. त्याचा विस्तृत आराखडा तयार आहे. त्यामध्ये आपला प्रयत्न असा आहे की, ज्या मालमत्ता (प्रॉपर्टीज) ताब्यात घ्याव्या लागतील. त्यांना विस्थापित न होऊ देता किंवा न करता अतिशय चांगल्या प्रकारे मोबदला देण्यावर आपण ठाम आहोत. ज्या नागरिकांची दुकाने बाधित झालेली आहेत त्यांना दुकाने आणि शिवाय मोबदला देखील द्यावयाचा आहे. याप्रमाणेच ज्यांची घरे बाधित झालेली आहेत त्यांना चांगला मोबदला द्यावयाचा आहे. आत्तापर्यंत कुठल्याही प्रकल्पामध्ये मिळाला नाही असा मोबदला याठिकाणी आम्ही देणार आहोत असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला. **(उर्वरित वृत्त पान २ वर.....)**



**पुरातत्व विभागाकडून सुरू असलेल्या कामाची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. यावेळी मंदीर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, पालकमंत्री जयकुमार गोरे व अन्य.**

## फडणवीस यांची तुळजाभवानी मंदिराला भेट

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी तुळजापूर येथील तुळजा भवानी मंदिराला भेट देऊन परिसराची पाहणी केली. मंदिर परिसराच्या पुनर्विकासासाठी आराखडा तयार करण्यात आला असून काही तांत्रिक बाबी आराखड्यात जोडण्यात आल्या आहेत. विकासकामांसाठी निधी पुरवठा करण्यात येणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## मनसेप्रमुख राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता



**छत्रपती संभाजीनगर :** बस वर दगडफेक आणि आंदोलन करणाऱ्यांना चिथावणी दिल्याचा आरोप राज ठाकरे यांच्यावर ठेवण्यात आला होता. या प्रकरणात पुरावे न आढळल्याने औरंगाबाद उच्च न्यायालयाने राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता केली आहे.










सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, ३० मार्च २०२५
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

रजि.नं. : एसयुआर/एनएसआर/एचएसजी(टिओ)/९७७/२०१९-१३/०६/२०१९



प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत

# राष्ट्रतेज अटल



## कामगार गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित



सर्वसामान्यांसाठी
1BHK घर फक्त ₹ 3,71,000/-*

नोंदीत व सक्रिय बांधकाम कामगारांसाठी
1BHK घर फक्त ₹ 1,71,000/-*

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
म्हाडा MHADA

## लाभार्थी वैधता


- आवेदक / कुटूंब / कुटूंबास देशाच्या कोणत्याही भागामध्ये, त्याच्या नावावर किंवा त्यांच्या कुटूंबातील सदस्याच्या नावावर पक्के घराचा मालक किंवा रहिवासी जागा नसावी.
- आवेदकाचे वार्षिक उत्पन्न ३ लाखाहून कमी पाहिजे.
- आवेदकाने कधीही भारत सरकारच्या कोणत्याही गृहनिर्माण योजने अंतर्गत कोणत्याही केंद्रीय / राज्य सहाय्य प्राप्त केलेले नसावे.
- मालमत्ता मालकीमध्ये एक प्रौढ महिला सदस्यता अनिवार्य आहे.
- कुटूंबाच्या महिला सदस्याने मालमत्तेचे सहमालकी असणे आवश्यक आहे.
- स्वतः कमविणारे मुलगा किंवा मुलगी सबसिडीसाठी पात्र आहेत.

## लागणारी आवश्यक कागदपत्रे (स्त्री-पुरुष)

- आधारकार्ड झेरॉक्स
- रेशनकार्ड झेरॉक्स
- बँक पासबुक झेरॉक्स
- पॅनकार्ड झेरॉक्स
- पासपोर्ट साईज ८ फोटो
- उत्पन्न दाखला
- १००/- रुपयाचे बॉन्ड
- मतदान कार्ड झेरॉक्स
- बांधकाम कामगार कार्ड
- भाड्याने/वडिलोपार्जित राहत्या घराची टॅक्स पावती झेरॉक्स किंवा भाडेकरारपत्र

Maha Rera Regi.
No. : P52600019892
आधिक माहिती या संकेत स्थळावर उपलब्ध
http://maharara:mahaonline.gov.in





LOCATION PLAN

*नियम व अटी लागू.

ऑफिस पत्ता : ६०५, द. कसबा, दाते गणपती बोळ, पटवर्धन हॉस्पिटलच्या समोरच्या बोळात, नवी पेठ, सोलापूर.

साईटचा पत्ता : गट नं. ९२/२, दहिटणे-बक्षी हिप्परगा रोड, दाळमिल समोर, ता. दहिटणे, उत्तर सोलापूर. संपर्क : 9307108084

प्रासंगिक

# शतायु संघ : राष्ट्रीय पुनर्रचनेचा एक शतकाचा प्रवास

दत्तात्रेय होसबळे
सरकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ


राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या सेवेचे शंभरावे वर्ष पूर्ण करत असताना, या ऐतिहासिक टप्प्याकडे संघ कशा प्रकारे पाहतो, याबाबत उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे. संघाच्या स्थापनेपासूनच हे स्पष्ट झाले आहे की, असे प्रसंग केवळ उत्सवासाठी नसतात, तर ते आत्मपरीक्षण करण्याची आणि कार्यासाठी नव्याने समर्पित होण्याची संधी प्रदान करतात. ही संधी संघाला मार्गदर्शन करणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांचे योगदान स्मरणात ठेवण्यासाठी तसेच या वैभवशाली प्रवासात नि:स्वार्थपणे योगदान देणाऱ्या असंख्य स्वयंसेवक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या त्यागाचा गौरव करण्यासाठी उपयुक्त ठरते. हिंदू दिनदर्शिकेतील वर्षप्रतिपदेचा मंगलदिन हाच संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा जन्मदिनही आहे. त्यामुळे ही संधी साधण्यासाठी यापेक्षा अधिक योग्य दिवस कोणता असू शकतो? हा दिवस केवळ स्मरणाचा नाही, तर समरस, समृद्ध आणि अखंड भारताच्या भविष्याचा संकल्प करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे.

डॉ. हेडगेवार हे जन्मजात देशभक्त होते. भारताप्रती त्यांचे निस्सीम प्रेम आणि बिनशर्त समर्पण हे त्यांच्या बालपणातील कृतीतूनच दिसून येत होते. कोलकाता येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करेपर्यंत, भारताला ब्रिटिश वसाहतीतून मुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या सशस्त्र क्रांतीपासून सत्याग्रहापर्यंतच्या सर्व प्रयत्नांची त्यांना सखोल जाण होती. संघ परिवारात प्रेमाने ''डॉक्टरजी'' म्हणून संबोधले जाणारे डॉ. हेडगेवार यांनी या सर्व मार्गांचा उचित आदर केला आणि कधीही कोणत्याही मार्गाला कमी लेखले नाही. त्या काळात सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य हा विचारवंतांमध्ये चर्चेचा मुख्य विषय होता. मात्र, भारतीय समाजाचे ''वैद्य'' म्हणून डॉक्टरजींनी निदान करीत त्या समस्या ओळखल्या, ज्या आपल्या राष्ट्रीय अध:पतनास कारणीभूत ठरल्या आणि त्यावर चिरस्थायी उपाय शोधण्याचा निश्चय केला. त्यांना जाणवले की, देशप्रेमाचा अभाव, संकुचित अस्मितांमुळे होणारा राष्ट्रीय चारित्र्याचा ऱ्हास आणि सामाजिक जीवनातील शिस्तीचा अभाव हीच ती मूलभूत कारणे होती, ज्यामुळे परकीय आक्रमणकर्त्यांना भारतात आपले पाय रोवता आले. सातत्याने होत असलेल्या आक्रमणांमुळे भारतीयांनी आपल्या गौरवशाली इतिहासाची सामूहिक स्मृती हरवली. परिणामी, संस्कृती अन् ज्ञान परंपरेविषयी न्यूनगंड आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण झाला.

डॉ. हेडगेवारांचा ठाम विश्वास होता की, केवळ काही नेत्यांच्या राजकीय नेतृत्वाने या प्राचीन राष्ट्राच्या मूलभूत समस्यांचे निराकरण होणार नाही. त्यामुळेच, त्यांनी लोकांना राष्ट्रासाठी जगण्याचे प्रशिक्षण देणारी एक पद्धत विकसित करण्याचा निर्णय घेतला. शाखापद्धतीवर आधारित संघाचे हे नावीन्यपूर्ण आणि अद्वितीय कार्य केवळ राजकीय संघर्षातून जन्मलेले नसून, या द्रष्टेपणाचे फलित आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यात सहभागी होताना आणि इतरांनाही तसे करण्यास प्रोत्साहित करताना, डॉ. हेडगेवार यांनी केवळ संघटना उभारण्यावर भर न देता संपूर्ण समाज संघटित करण्यासाठी एक प्रशिक्षण प्रणाली विकसित केली.

आज, शंभर वर्षांनंतरही हजारो तरुण डॉक्टर हेडगेवारांनी दाखवलेल्या मार्गावर चालत आहेत आणि राष्ट्रकार्यासाठी स्वतःला संपूर्णपणे समर्पित करण्यास तयार आहेत. संघाविषयी समाजातील स्वीकृती आणि अपेक्षा दिवसेंदिवस वाढत आहेत. ही बाब केवळ संघाच्या वाढत्या प्रभावाची नव्हे, तर डॉक्टरजींच्या दूरदृष्टी आणि कार्यपद्धतीला मिळालेल्या व्यापक मान्यतेची साक्ष आहे. या चळवळीचा आणि तिच्या तत्त्वज्ञानाचा क्रमशः उलगडा हा एखाद्या चमत्कारासारखाच आहे. संकुचित, संकीर्ण आणि बहिष्कृत राष्ट्रवादाच्या युरोपीय संकल्पनांनी इंग्रजी-शिक्षित अभिजात वर्ग प्रभावित होत असताना, हिंदुत्व आणि राष्ट्रवाद यांची संकल्पना स्पष्ट करणे सहजसाध्य नव्हते. डॉ. हेडगेवार यांनी केवळ विचारधारेचं सिद्धांतीकरण केलं नाही, तर एक कृतिप्रधान कार्यक्रमाचं बीज रुजवलं, जे या प्रवासात मार्गदर्शक शक्तिसाधन ठरलं आहे. त्यांच्या हयातीतच संघाचे कार्य भारताच्या सर्व प्रदेशांमध्ये विस्तारले आणि संघटनात्मक पद्धतीने समाजमनात स्थिरावले.

जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हाच दुर्दैवाने धार्मिक आधारावर आपल्या प्राणप्रिय देशाची फाळणी झाली. त्या कठीण काळात संघाच्या स्वयंसेवकांनी हिंदू बांधवांचे पाकिस्तानातून सुटकेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि त्यांचे भारतात सन्मानाने पुनर्वसन व्हावे यासाठी स्वतःला समर्पित केले. संघाने राष्ट्रीय जीवनाच्या विविध क्षेत्रांत संघटनात्मक ऊर्जा प्रसारित करण्यासाठी 'संघटनेसाठी संघटन' हा मंत्र उलगडत नेला. समाजासाठी जबाबदारीची जाणीव आणि कर्तव्यबुद्धी अशा संकल्पनेतून सिद्ध झालेल्या स्वयंसेवकांच्या सक्रियतेने शिक्षण, कामगार, समाजसेवा आणि राजकारण या क्षेत्रांमध्ये संघाचे अस्तित्व अधोरेखित केले.



प्रत्येक गोष्टीची पुनर्रचना राष्ट्रीय भावसंचिताच्या प्रकाशात करणे आवश्यक असते, या टप्प्यावर संघाचे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी (माधव सदाशिव गोळवलकर) मार्गदर्शक शक्ती ठरले. भारत ही एक प्राचीन संस्कृती, समाजरचना आहे, जी तिच्या आध्यात्मिक परंपरांवर आधारलेली मानवी कल्याणासाठी नियोजित भूमिका पार पाडते. वैश्विक एकात्मता आणि समरसतेसाठी भारताने वाटचाल करायची असेल, तर जनसामान्यांनी त्या ध्येयासाठी स्वतःला तयार करणे अनिवार्य ठरेल. या दिशेने श्रीगुरुजींनी भक्कम वैचारिक पाया घातला. जेव्हा भारतातील सर्व पंथांनी कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला धार्मिक मान्यता नाही, असे जाहीर केले तेव्हा हिंदू समाजाच्या सुधारणावादी कार्यसूचीला गती मिळाली. आणिबाणीच्या काळात, जेव्हा राज्यघटनेची विटंबना झाली, तेव्हा लोकशाही पुन:स्थापित करण्याच्या लढ्यात संघ स्वयंसेवकांनी शांततापूर्ण मार्गाने निर्णायक भूमिका बजावली.

संघाने शाखाव्यवस्थेच्या संकल्पनेतून समाजाच्या नैतिक उन्नतीचे कार्य वाढवत सेवा आणि समर्पणाची भूमिका बजावली. गेल्या ९९ वर्षांत संघाने शाखापद्धतीचा विस्तार करीत समाजातील सज्जनशक्तीच्या सहभागातून सेवा कार्ये उभारून लक्षणीय प्रगती केली. श्रीरामजन्मभूमीमुक्तीसारख्या चळवळींनी संपूर्ण भारतातील सर्व लहानमोठ्या घटकांना एकत्र आणून भारताच्या सांस्कृतिक मुक्तीचा अनुभव दिला. राष्ट्रीय सुरक्षा ते सीमा-व्यवस्थापन, सहभागात्मक प्रशासन ते ग्रामीण विकास या प्रत्येक क्षेत्रात संघ स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडत कोणतंच क्षेत्र अस्पर्श ठेवलं नाही. या प्रणालीगत परिवर्तनाचा एक भाग बनण्यासाठी आता समाज पुढे येत सहभागी होत आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे.

आजच्या काळात प्रत्येक सामाजिक, सांस्कृतिक किंवा विकासात्मक कार्याकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहण्याची प्रवृत्ती वाढलेली असताना, संघ मात्र सांस्कृतिक जागरणातून न्यायोचित सुयोग्य विचारांच्या व्यक्तींची मजबूत साखळी निर्माण करून त्यांच्या संघटनाला महत्त्व देत आहे. गेल्या काही वर्षांत संघाने महिलांच्या सहभागाला विशेष गती दिली आहे. कुटुंबसंस्थेच्या पावित्र्याच्या पुनरुज्जीवनावर भर देत, संघाने सामाजिक परिवर्तनातील स्त्रियांची भूमिका ठळक करण्याचा संकल्प केला आहे. लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने दहा हजारांहून अधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये २७ लाखांहून अधिक लोकांचा सहभाग होता. हे कार्यक्रम राष्ट्रीय अस्मितेच्या एकत्रित पुनर्रचना करणाची जाणीव निर्माण करणारे ठरले.

संघाच्या शंभराव्या वर्षाच्या प्रारंभाच्या अनुषंगाने व्यक्तिनिर्माण आणि गावपातळीपर्यंत संघटनेचा विस्तार करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला गेला. पद्धतशीर नियोजन आणि दृढ अंमलबजावणीच्या बळावर गेल्या एका वर्षात १०,००० नवीन शाखा सुरू झाल्या. ही वाढ संघटनेच्या दृढनिश्चयाचा आणि समाजाच्या स्वीकृतीचा स्पष्ट पुरावा आहे. मात्र, प्रत्येक गाव आणि वस्तीत संघकार्य पोहोचवण्याचे उद्दिष्ट अद्याप अपूर्ण आहे आणि ही बाब आत्मपरीक्षणाचा विषय आहे.

येणाऱ्या काही वर्षांत संघाचे मुख्य लक्ष 'पंच परिवर्तन' या संकल्पनेवर राहील. हे परिवर्तन राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या दिशेने निर्णायक पावले असतील. स्व-आधारित व्यवस्था, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन आणि नागरी कर्तव्य. संघाच्या 'परम वैभवम् नेतुम् एतत् स्वराष्ट्रम्' या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी हे सर्व उपक्रम हाती घेतले जात आहेत. शाखा विस्ताराच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत हे विचार पोहोचवण्याचे संघाचे ध्येय आहे. या कार्यात प्रत्येक व्यक्तीने आपली भूमिका समजून घेऊन योगदान द्यावे, हाच खरा राष्ट्र उभारणीचा मंत्र आहे.

गेल्या शंभर वर्षांत संघाने उपेक्षा आणि उपहासाकडून कुतूहल आणि सहभाग असा एक ऐतिहासिक प्रवास केला आहे.

याकडे जात राष्ट्रीय पुनर्रचनेच्या चळवळीचे रूप घेतो. समाजाच्या सर्व थरांमध्ये आपले विचार पोहोचवताना, संघाने आपल्या अविचल ध्येयावर आणि मूल्यांवर ठाम राहून प्रगती साधली आहे. संघ विरोधाला विरोधाने उत्तर देत नाही, तर त्याच्या कार्याची व्यापकता स्वतःच विरोधकांना समर्थकांमध्ये बदलते. संघाच्या विचारधारेला समजून घेतल्यानंतर, संघाचा प्रचार करणाऱ्या अनेक व्यक्ती संघाच्या गोटात सामील झाल्याचे इतिहास साक्ष देतो. ही भूमिका केवळ राजकीय किंवा सामाजिक स्वीकारापुरती मर्यादित नाही, तर भारतीय संस्कृतीतील सर्वसमावेशकतेचा आणि सहिष्णुतेचा उत्तम नमुना आहे.

आज संपूर्ण जग हवामान बदल, युद्ध, सांस्कृतिक संघर्ष आणि आर्थिक अस्थिरता यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहे. या सर्व समस्यांचे उत्तर भारताच्या हजारो वर्षांच्या अनुभवात्मक ज्ञानात आहे. संस्कृती, परंपरा आणि अध्यात्माच्या माध्यमातून भारत जगाला एक नवीन दिशा देऊ शकतो. हे अपरिहार्य कार्य तेव्हाच शक्य होईल, जेव्हा भारतातील प्रत्येक नागरिक आपली भूमिका ओळखेल आणि इतरांसाठी आदर्श निर्माण करेल. भारतीय संस्कृतीतील कुटुंबसंस्थेचा गाभा जगातील सर्वांत यशस्वी आणि स्थिर सामाजिक प्रणालींपैकी एक आहे. कुटुंबसंस्थेतील एकता, परस्पर साहाय्य, नीतिमत्ता आणि परंपरागत मूल्ये जगासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. भारताचा विकास आणि उज्ज्वल भविष्यातील वाटचाल ही जगासाठी अनुकरणीय ठरावी, हा संघाचा संकल्प आहे. भारतातील सत्पुरुष/सज्जनशक्ती, विचारवंत, कार्यकर्ते आणि संघटनांनी एकत्र येऊन सुसंवादी आणि संघटित भारताचे जागतिक पातळीवर आदर्श सादर करणे गरजेचे आहे. हा संकल्प फक्त संघाचा नाही, तर समाजातील प्रत्येक व्यक्तीचा आहे.

''परम वैभवम् नेतुम् एतत् स्वराष्ट्रम्'' - आपल्या राष्ट्राला सर्वोच्च उन्नतीच्या शिखरावर नेण्याचे ध्येय फक्त शाखा आणि विचारवंतांपुरते मर्यादित राहू शकत नाही; हे व्यापक समाजपरिवर्तनाच्या माध्यमातूनच साध्य होईल. भारताची प्राचीन समृद्धी आणि आधुनिक प्रगती एकत्र करून संघ एक नवा भारत घडवण्यासाठी कटिबद्ध आहे. या राष्ट्रीय पुनर्रचनेच्या महान कार्यात प्रत्येक भारतीयाने सक्रिय सहभाग घ्यावा, हीच खरी राष्ट्रसेवा आहे.

# स्मृतिमंदिर : उजेडी राहिले, उजेड होऊन..

गुरुदेव त्या वादपटू शिष्याला निक्षुन सांगत होते, प्रत्येक प्रश्नाला उत्तर नसते. कारण कधी कधी प्रश्नच नसतो. म्हणजे खरा नसतो. असते ती भ्रांती, ग्लानी. ती दूर झाली की प्रश्नाची सावलीही उरत नाही.

शिष्य पराभूत न होत प्रमाण मागत होता..

गुरुदेव म्हणाले, भ्रांती तुझी.. दूर तूच करशील..

शिष्य पूर्ण बुचकळ्यात पडला.

गुरुदेव म्हणाले, अरे, तुझ्या सावलीसमोर दिवा लाव.. सावली उरणार नाही.

शिष्य वरमत विचारता झाला, गुरुदेव, मी हट्टी, वाचाळ म्हणून सांगताय ना? हे केवळ माझ्यासाठी ना?

गुरुदेव म्हणाले, हे साऱ्यांसाठी. अगदी माझ्यासहित. आपली सावली पुसणारा दिवा हवा.. तो असतोच. प्रत्येकाने शोधायला हवा.. आणि तो अनुभवायलाही हवा..

बोधकथा त्याच्या कानात गुंजत होती. खरं तर मनात.. तो आत्ताच ऐकत असल्यासारखा रमून गेला होता. अभावितपणे थोडं पुढे झुकत त्याने डोकं नमवलं. पण पद्मासनात बसून डोकं समोर भूमीवर टेकवणं ? आता ? कल्पनेतही जिकिरीचं. अशक्यच.

पण त्यामुळे तो भानावर आला. किती वेळ झाला असेल..? तो आला तेव्हा जवळपास कुणीच नव्हतं. इथे आणि आला त्या मार्गावरही. निसटता अंधार.. झाडाच्या डहाळीवर उमललेली फुलं दिसावीत एवढाच जेमतेम उजेड.. त्या तेवढ्या उजेडात हातातल्या काठीच्या वाकड्या मुठीने डहाळी वाकवून फुलांची मिळकत मिळविणारा कुणी वयस्कर इसम. त्याला पाहताना वयस्कर आणि इसम असे दोन्ही शब्द ह्याच्या मनी आले नाहीत. पण ते तसे शब्द आहेत हे जाणवताच त्याला नवल वाटलं. आपण कधीच असं म्हणत नाही.. म्हटलं नाही. आपल्या लेखी ते गृहस्थ तरुणच.. फार तर प्रौढ, पण वयस्कर नाहीच नाही. आणि इसम ? तो शब्द तर नेहेमीच अपराध वार्तेमध्येच वाचला होता. आपल्या लेखी सारेच वयम्.. वयम् हिंदुराष्ट्रांगभुता! म्हणजेच नइसम वा अइसम..



रेशीमबागेच्या मुख्य रस्त्यावरून कमानीखालून तो वळला होता. त्या डहाळीवरचं एखादं फूल मागून घ्यावं का असं वाटेपर्यंत तो पुढे सरकला होता. विचार करू लागला ह्या आधी आपण इथे कितीदा आलो.. पण फूल घेऊन ? कधीच नाही. पण मग काय वाहिलं आपण ? इतक्या वेळी आलो पण तसं रिक्तहस्तेच आलो ना ? तसंच आज.

तिथे बसल्या बसल्या त्याने ओंजळ उघडून तळवे पाहिले. आत्ताही रिक्तच. खरंच आपण काही द्यायला.. वाहायला आलो का इथे? तसं द्यायला, वाहयला आपल्याकडे आहे काय? तो अनिमिषपणे समोर समाधीच्या चौथऱ्याकडे पहात मनाशी म्हणाला आपण इथे येतो ते वाहायला नाही.. व्हायला येतो. असं व्हायला, ह्यांच्यासारखं जीवन करून ते वाहायला येतो. मग वेगळं आणिक काही द्यायला उरतं का ? नाहीच.. स्वतःचं, स्वतःचंच असं काहीही न उरवायला इथे येतो.

पण जमलं का ? किती ? आपल्याला किती जमलं ते आपणंच कसं पहावं.. म्हणावं? 'पहावे आपणासी आपण..' अशी संतोक्ती आहे. पण इथं आलं की वेगळं असं कुणी दिसतंच नाही. येतेजाते सारेच आपल्यासारखे.. 'आपण' म्हणावे असेच दिसतात. का होतं असं? कसं? आज जेमतेम उजेडात दिंडीदरवाज्यातल्या हनुमंताला नमस्कार करून तो रेशीमबाग परिसरात शिरला होता तेव्हाची त्याला आठवण झाली. दिंडीवरचे सुरक्षारक्षक निवांत होते. बहुधा चेहऱ्यामोहऱ्यावरून पारख करण्यात ते आता सराईत झाले असावेत. असं होतं.. केवळ तेवढं पाहून परिचय नसताना हा स्वयंसेवक म्हणून ओळखणं शक्य असतं. असे कितीतरी प्रसंग त्याने बौद्धिक वर्गात, चर्चासत्रात ऐकले होते. त्याचा लहानसा स्वानुभवही होता. गाडीतून उतरताना खाली सामान देणाऱ्या व्यक्तीला त्याने तुम्ही तुम स्वयंसेवक हो क्या? असं विचारलं होतं आणि तोही प्रसन्न हसत जी हाँ..! असं म्हणाला होता. गाडी हलली, पुढे निघून गेली. ह्याला वाटलं आपण 'त्या'चं नाव, पत्ता विचारलाच नाही. काय असेल बरं? कुठला रहिवासी असेल? काय करीत असेल? कोण.. कोण असेल तो? पण क्षणभरात त्यानेच समोर पसरलेली प्रश्नांची भेंडोळी दूर केली. तो कोण ह्याचं समाधाकारक उत्तर त्याला मिळालं होतंच.. स्वयंसेवक !

त्याच्या अवतीभवती आता तेच दिसत होते. तो आला तेव्हा स्मृतिमंदिराच्या कुंपणाचं दार नुकतंच उघडलं होतं. एक दोघं त्याच्याबरोबरच आत आले. त्यांच्याच मागोमाग तो समाधीस्थानी शिरला. स्मृतिमंदिराचा गाभाराच.. तिथे दिव्याची वात तेवत होती. उदबत्तीही संथपणे जळत होती. समाधीचा पांढुरका संगमरवरी चौथरा, त्यावर सोनपिवळी वेलबुट्टी.. त्यावर रूळणारी रुद्राक्षमाळ.. समाधीवर वाहिलेली चार ताजी मोगऱ्याची फुलं त्या चौथऱ्याभोवती संगमरवरी कठडा बस्स.. इतकंच. कितीतरी जीवनं घडविणाऱ्या परम पूजनीय डॉक्टर हेडगेवारांचं हे समाधीस्थान. देहरूपातील डॉक्टरजींचं अस्तिव इथे विसावलं.. आणि ज्याची सावली पडावी..दिसावी असा देह सावलीवेगळा झाला. गुणरूप झाला. जणू आता सावली न उरता 'उजेडी राहिले, उजेड होऊन..!' असं निष्कंप उजळत्या ज्योतीसारखं.. आकाशमोगऱ्याच्या परिमळासारखं.. चैतन्यरूप.. स्वसंवेद्य.. अपार्थिव अविनाशी चैतन्यच. एकावेळी जेमतेम सातआठ माणसं उभी राहू शकतील इतुकंच ते जणू गर्भगृह. अशा असीमाचं मंदिर.. स्मृतिमंदिर..तेही असं भव्य नव्हे भाव्य.. भावतीर्थ झालेलं. आपापल्या प्राणज्योतीतून त्या चैतन्याचा प्रकाश उजळत रहावा ह्यासाठी इथे येत असलेले अगणित.. इथे थोडं भिंतीशी सरकून बसायची सोय. येणारा प्रत्येक समाधीसमोर उभा राहतो आणि मागे सरून डोळे मिटून थोडा वेळ भिंतीशी बसतोच. तोही तसाच.

तो बसला तेव्हा तिथे मंद उजेड होता. पण बाहेरच्या झुंजमुंजू प्रकाशाहून अधिक ऊबदार होता. आत आत पाझरत जात होता. त्या उजेडाच्या वाटेवरून तो मागे मागे पहात होता. किती वेळा इथे आलो कधी कधीअसा मागोवा घेऊ लागला.

संघ शिक्षा वर्गाच्याही आधी कोणत्या तरी बैठकीसाठी तो प्रथम इथे आल्याचं त्याला स्मरत होतं. बैठक, बैठकीचे विषय, तिथे भेटणारे अधिकारी, कार्यकर्ते ह्या सर्वाविषयी ओढ स्वाभाविकच होती, पण त्याहून अधिक त्या भूमीची, तीर्थवत स्थानाची ओढ अधिक होती. वारी चालून आल्यावर इंद्रायणीच्या पात्रात स्नानाला उतरावं पण मन, नेत्र मात्र पंढरीरायाच्या राऊळाकडे लागलेलं असावं तसंच त्याचं झालं होत. रात्रीच पोहोचला होता, पण दार बंद झालं होतं. तो अधाशीपणे कळसाकडे, घुमटखाली असलेल्या डॉक्टरांच्या प्रेरणामूर्तीकडे आणि समोरच्या श्री गुरुजींच्या स्मृत्यर्थ उभ्या केलेल्या यज्ञकुंडाकडे आळीपाळीने रात्री उशिरापर्यंत पहात उभा होता. कलत्या चंद्राकडे पाहिल्यावर एकदम खूप रात्र झाल्याचं त्याच्या ध्यानात येऊन तो झोपायला जाण्यापूर्वी आकाशात ध्रुव दिसतोय का पाहू लागला. त्या मंद चांदण्यांच्या थव्यात त्याला ध्रुव ओळखता आला नाही. काहीसा खट्टू होतंच तो झोपी गेला. आणि पहाटे सर्वांच्या आधी आवरूनस्मृतिमंदिरात आल्यावर त्याला जाणवलं की ध्रुव दूर गगनात असतोच, पण इथे भूमीवरही असतो. तेव्हाच तो प्रथमच त्याच्या ध्रुवासमोर बसला होता.

त्यानंतर तृतीय वर्षाच्या संघ शिक्षा वर्गात आला तेव्हा तर तो आणि त्या वर्गात सहभागी झालेले त्याचे संघसहचर सगळ्या रात्री स्मृतिमंदिरासमोरच जमत. मोकळ्या गप्पा करत, गीतं गुणगुणत खूप उशिरापर्यंत जागरणं करून जणू निरूपायाने निजायला जात. व्यवस्थेच्या पोटात शिरून रात्रीच्या दुधाचीही सोय एकाने केली होती. त्यामुळे वर चांदण्याचं दूध पसरलेलं आकाश आणि स्मृतिमंदिराच्या साक्षीने दुग्धपान करीत रमलेला स्वयंसेवक वृंद असं चित्रं पंचवीस रात्रींनी पाहिलं. तिथे खरंच काय मिळत होतं.. केवळ पेलाभर दुधासाठी ती जाग्रणं खासच नव्हती. त्या चैतन्याच्या सांन्निध्यात मनं उजळत होती, अंतरं समृद्ध होत होती, चित्तं एकाकार होत होती.. समानो मंत्र: समितिः समानी

समानं मनः सहचित्तमेषाम् ।श्र चा तो पंचवीस रात्रींचा अनुभव नुकत्याच लावलेल्या निरांजनासारखा सगळ्यांच्याच मनात तेवत होता. असा कितीदा आला.. तसाच आजही.. आज काय होतं? बैठक, वर्ग काही काही नव्हतं. पण इथेच मन धाव घेत होतं. त्याचं त्याला आश्चर्य वाटत होतं की खरंच तो आलाय की कारण अन्यथाही स्मृतिमंदिरात घालवलेले क्षणच जपमाळेच्या मण्यासारखे पुनःपुन्हा चक्रगतीने येत होते आणि तो ते जपत होता.. जगत होता. अजून वर सगुण साकार डॉक्टरांना पहायला पायऱ्या चढून जायचं होतं. समोर यज्ञकुंडावरची शेवटची विनवणी वाचून श्री गुरुजींचं स्मरण करायचं होतं. त्याने डोळे मिटले. तो आता अधिक श्रद्धेने समाधीकडे पाहू लागला. श्रद्धेला प्रश्न पडत नाहीत. खरं तर श्रद्धेत प्रश्न उरत नाहीत. ह्याच्याही मनात प्रश्न उरले नव्हतेच.

**- प्रमोद बापट**

# संमेलनातील देखणा 'वसंत'


दखल

पराग मगर

कोणतीही गोष्ट भारतीय होण्यासाठी त्याला दिल्लीचा परिसस्पर्श आवश्यक असतो. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेत १९५४ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने मराठीचा झेंडा अटकेपार कधीच फडकवला. असे असले, तरी २०२५ ला दिल्लीला झालेले ९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचे पहिलेच. त्यामुळे त्याला एक वेगळे वलय आहे. या पृष्ठभूमीवर 'वसंत' मासिकाचा मार्च महिन्याचा '९८ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन विशेषांक' ७० वर्षांचा प्रवास मांडतो. अंकाचे संपादक दिलीप देशपांडे यांनी संपादकीय मथळ्यातच कविवर्य वि. म. कुलकर्णी यांच्या 'माझ्या मराठीची गोडी मला वाटते अवीट' या ओळी उद्धृत करीत मराठी भाषा व संस्कृती ममत्वाने जपण्याची गरज व्यक्त केली आहे. स्पर्धेच्या युगात देशाच्या सीमारेषा पुसट होत असताना प्रमाण भाषेच्या दुराग्रहात बोलीभाषेची गळचेपी थांबवत उलट त्या मुख्य प्रवाहात आणण्याची गरज ते अधोरेखित करतात.

बडोद्याचे राजे श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या कारकीर्दीत बडोद्यात १९०९, १९२१ अशी दोन मराठी साहित्य संमेलने झालीत. तर, १९३२ मध्ये कोल्हापूर येथे झालेल्या संमेलनाच्या अध्यक्षपदी महाराज होते. 'महाराजांचा मराठी साहित्य संमेलनाशी असलेला अनोखा संबंध' संजय बच्छाव यांनी ओघवत्या शैलीत मांडला आहे.

१९५४ मध्ये दिल्लीला झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. संमेलनातील त्यांच्या भाषणाचा आढावा 'तर्कतीर्थांचे ते भाषण' या लेखात डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी घेतला आहे. प्रा. वर्षा पतके-थोटे यांचा साहित्य संमेलनाध्यक्षांची भाषणे - एक आढावा, रागिणी बापट - महाराष्ट्राची संस्कृती जपणारी वैभवशाली संस्था - वनिता समाज, डॉ. वि. स. जोग यांचा जयवंत दळवींच्या निवडक कादंबऱ्या, प्रा. प्रतिभा सराफ यांचा महाराष्ट्राबाहेर साहित्य संमेलनाची गरज, डॉ. अपर्णा बेडेकर यांचा शब्दांचे धन, अमृताची अक्षरे, प्रा. रमेश वरखेडे यांचा अभिजात मराठीचे मिथक आणि भवितव्य, श्रीपाद टेंबे यांचा संमेलनाची




वाटचाल उत्सवातून देखाव्याकडे यासह डॉ. दीपक चिद्दरवार, जीवन तळेगावकर, अर्चना मिरजकर, रश्मी घटवाई, आरती कुळकर्णी, प्रा. वैजनाथ महाजन यांचे लेख साहित्य संमेलनाची दिशा स्पष्ट करणारे आहेत. तर, तर्कतीर्थांचे १९५४ चे संपूर्ण भाषण साहित्याचा ४४ वर्षांचा प्रवाह समजून घेण्यासाठी सहायक सिद्ध होणारे आहे.

**धर्मराजाची दिल्ली**

हजारो वर्षांचा वैभवशाली इतिहास आपल्या कवेत घेणारी दिल्ली आजही कुणाची? अशा प्रश्नावर सहज उत्तर येते ते धर्मराज युधिष्ठिराची...! अनेक शतकांपासून राजकीय व सांस्कृतिक घडामोडींच्या केंद्रस्थानी राहिलेले हे शहर भल्याभल्यांना आकर्षित करते. त्यामुळे येथे आयोजित साहित्य संमेलनाचा बाज जरा वेगळाच. याच पृष्ठभूमीवर रवींद्र दाणी यांनी 'धर्मराजाची दिल्ली' या लेखात शतकाकडे वाटचाल, द रोम ऑफ एशिया, पूर्व पश्चिम संगम, बेकर ल्युटेन्स संघर्ष, अपशकुन पंतप्रधान निवासस्थान, विदेशी आक्रमकांचे राज्य, आख्यायिका यमुनातटी आदींतून या शहराचा उभा-आडवा इतिहास सुरेख पद्धतीने मांडला आहे.

८२७५५५३५६६

# श्री गजानन महाराज भक्तांची ऑनलाईन फसवणूक टळावी

दोन-तीन महिन्यांपूर्वीची गोष्ट. पुण्याहून पुतण्याचा फोन आला. निरंजन सांगू लागला, काका, मी आणि बाबा आम्ही त्र्यंबकेश्वरला गजानन महाराजांच्या मठात दर्शनासाठी जाण्याचा विचार करतो आहोत. तिथे जागा मिळण्याचे टेन्शन नको म्हणून ऑनलाईन खोली बुकिंगसाठी मी एका वेबसाईटवर बुकिंग केलं. पण माझ्या लक्षात आलं की माझी फसवणूक झाली आहे. पाच हजार रुपये गेले. आता तिकडून सांगत आहेत की एन्ट्री परतवण्यासाठी पुन्हा दीडशे रुपये भरावे लागतील. मला संशय आला म्हणून तुला फोन केला. गजानन महाराज संस्थान त्र्यंबक अशी ती साईट पाहून मनात संशयच आला नाही. त्याचं म्हणणं ऐकलं आणि माझ्या मनाने शेगांवात धाव घेतली. मला शेगावला पाहिलेला बोर्ड आठवला. तो असा, नम्र निवेदन, संकेतस्थळ हेच असून अन्य कोणतेही संकेतस्थळ नाही. श्री संस्थांनच्या शेगावसह सर्व शाखांध्ये श्री दर्शन व रूम बुकिंगसंबंधी कोणतीही ऑनलाईन बुकिंग करण्यात येत नाही. अधिक माहितीसाठी मोबाईल नंबर ९८८१७५८७६२ आणि ९५२९६५८०७४ यावर संपर्क साधता येईल. ही माहिती ऐकल्यानंतर निरंजनने विचारलं, ठीक आहे, माझी तर फसगत झाली. पण याविषयी काही समाज जागृती करायला हवी की नाही? त्यावर म्हटलं, संस्थान त्यांच्या पद्धतीने प्रयत्न करीत आहे. पण हे सर्व इतकं व्यापक आहे की समाजकंटक या गोष्टीचा गैरफायदा घेण्यासाठी टपलेलेच आहेत. एक खोटी वेबसाईट लक्षात आली की लगेच तत्सम नावाची दुसरी तयार करून भक्तांना फसवण्यासाठी तत्पर असणारे दुर्जन अनेक आहेत. एकीकडे, निरंजनच्या या म्हणण्यावर विचार करीतच होतो, तर अशीच घटना ओंकारेश्वर भक्त निवासाच्या संदर्भात घडल्याचं कानावर आलं. गोपाळ भट्टड, ब्रह्मपुरी यांना ओंकारेश्वर येथे दर्शनासाठी जायचं मनात आलं. त्यांनी खोली बुकिंगसाठी ऑनलाईन शोध घेतला, तेव्हा त्यांना एक संकेतस्थळ आढळलं. महाराज संस्थान ओंकारेश्वर त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर पैसे भरलेत आणि त्यांच्या लक्षात आलं की आपण फसलो. मात्र त्यांनी लगेच पाऊल उचलून आपल्या बँकेत फोन करून त्या पेंटवर रोख लावला. ही दोन वानगीदाखल उदाहरणे आहेत. खोलात शिरून शोध घेतला तर लक्षात येईल की, असंख्य भक्तांची आणि सज्जनांची फसवणूक होत आहे. चाणक्यासह अनेक विचारवंतांनी विचार मांडला आहे. दुर्जनांचं दुष्कृत्य काळजी करण्यासारखं आहेच, पण सज्जनांची निष्क्रियता अधिक काळजी करण्यासारखी आहे. त्यामुळे अर्थातच यासंदर्भात भक्तांनी, सज्जनांनी सावध होणं गरजेचं आहे आणि त्याच विचाराने हे लिखाण आहे. शेगाव गजानन महाराज भक्तांपुरतं बोलायचं तर, त्यांनी शेगाव संस्थानचं संकेतस्थळ नीट लक्षात ठेवून एक खूणगाठ सध्या पक्की लक्षात ठेवावी की संस्थानच्या सर्व शाखांध्येच रूम बुकिंग ऑनलाईन होत नाही.

**जयंत वेलणकर/९४२२१०८०६९**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### पैशाच्या कारणावरून घरात घुसून कोयत्याने वार; चौघांविरुध्द खूनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

शहरातील देगाव रोडवरील श्रीराम नगरात पैशाच्या कारणावरून घरात घुसून तरूणावर कोयत्याने वार करून खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी चौघांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत नवनाथ मानसिंग चव्हाण (वय ३८, रा. श्रीराम नगर, बसवेश्वर नगर, देगाव रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन धनंजय जगन्नाथ तेलंगे, महेश जगन्नाथ तेलंगे व इतर दोन अनोळखी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ मार्च रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास नवनाथ चव्हाण हे घरी टीव्ही पहात होते. त्यावेळी दोन अनोळखी इसम हे चव्हाण यांच्या घरात घुसले. त्या दोघांनी चव्हाण यांस तेलंगे यांचे पैसे देतो का नाही असे म्हणून लाथाबुक्क्याने मारहाण करण्यास सुरूवात केली. त्याच्या पाठोपाठ धनंजय तेलंगे व महेश तेलंगे हे देखील चव्हाण यांच्या घरात घुसले. त्यांनी तु आमचे व्याजाचे पैसे देतो का नाही, धरा रे याला असे बोलून धनंजय तेलंगे याने कोयत्याने चव्हाण यांना ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या डोक्यात वार केला. तो वार चव्हाण यांच्या डोक्यात लागल्याने ते खाली पडले, त्यावेळी इतरांनी हाताने, हॉकी स्टीक व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यावेळी भांडण सोडविण्यासाठी आलेल्या चव्हाण यांच्या पत्नीलादेखील मारहाण करून घरातील गृहोपयोगी साहित्याची तोडफोड केली. म्हणूप सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

### कर्ज फेडण्यासाठी पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

कर्ज फेडण्यासाठी माहेरून पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत रेश्मा सादिक नदाफ (वय २०, रा. विरभद्रेश्वर नगर, किर्ती नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती सादिक, सासू शबाना, सासरे मौलाली (रा. चिंतामणी नगर, हडपसर, पुणे), मिनाज अन्वर नदाफ (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ एप्रिल २०२४ ते ५ जानेवारी २०२५ या कालावधीत रेश्मा या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती सादीक व त्याच्या घरातील लोकांनी रेश्माचा मानसिक व शारीरीक त्रास देऊन हाताने मारहाण केली. तसेच माहेरून कर्ज फेडण्यासाठी २ लाख रूपये घेऊन ये तसेच तु दिसायला सुंदर नाही, तु माझ्या भावाला सूट होत नाही, तसेच लग्नात सोने कमी दिले, हुंडा दिला नाही असे बोलून मानसिक व शारीरीक त्रास दिला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

### एमआयटी समोरील अपघाताप्रकरणी पिकअप चालकाविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

सोलापूर-पुणे महामार्गावरी केगाव येथील एमआयटी कॉलेज समोरील रस्त्यावर समोरील कंटेनरला पाठीमागून धडक दिल्याने टेम्पोतील एक जण ठार झाला तर एकजण जखमी झाला. हा अपघात शुक्रवार २८ मार्च रोजी पहाटे चार वाजता घडला. याप्रकरणी पिकअप चालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश पापा जोंधळे ( वय २८, रा. अमर नगर, नूतन शाळेजवळ, मुलून कॉलनी, मुंबई) असे अपघातात ठार झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. सलिम अब्दुल रशीद शेख ( वय ४६, रा. अमर नगर, नूतन शाळेजवळ, मुलून कॉलनी, मुंबई) असे जखमीचे नाव आहे. पोलिस हवालदार जाधव यांच्या फिर्यादीवरुन सलीम अब्दुल रशिद शेख (वय ४२, रा. नुतन गल्ली. अमर नगर, विटीसी, मुलुंड कॉलनी, मुंबई) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश आणि सलिम हे मुंबईहून पिकअप गाडी क्र. एमएच ०३ ईजी ६८५६ घेऊन सोलापूरच्या दिशेने जात होते. शुक्रवारी पहाटे ४.३० वाजता ते केगाव परिसरातील एम आयटी कॉलेज समोरील रस्त्याने जाताना समोर थांबलेल्या कंटेनर क्र. एमएच १२ एलटी ९१३१ ला पाठीमागून पिकअपची धडक बसली. यात पिकअपमधील दोघेही गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच आकाश हा मृत्यू पावला तर सलीम शेख हा गंभीर जखमी झाला. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

### नवीन विडी घरकुल येथे एकास सर्पदंश


**सोलापूर, दि. २९ मार्च-**

कुंभारी येथील नवीन विडी घरकुल येथे राहत्या घरी झोपले असता, एकास सापाने दंश केला. हा प्रकार २८ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता घडला.शकिल अहमद नासिर शेख (वय ५२) असे सर्पदंश झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. शकिल शेख यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी मुलगा युसूफ याने सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मल्लेवाडीत कारच्या धडकेत एकजण जखमी

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

मंगळवेढा तालुक्यातील मल्लेवाडी येथे बस स्टॉप जवळ थांबले




असता, समोरून आलेल्या कारने धकड दिल्याने अतुल विश्वास तोडारमल्ले (वय ३५ रा. मल्लेवाडी) हा जखमी झाला. हा अपघात २७ मार्च रोजी रात्री ९ वाजता झाला. अतुल तोडारमल्ले यांना मंगळवेढा येथील सरकारी दवाखान्यातून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

Classifieds

**विकणे आहे**

**विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.**
**- संपर्क -**
**प्रदीप चंद्रकांत ख्याडे**
**मो. ९८९०८६६४६४**
**८१७७९७८३८३**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# आता महापालिका परिवहन बस प्रवासी सेवेत अल्प भाडेवाढ

## परिवहन उपक्रमाला उर्जितावस्थेसाठी प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**

महापालिकेच्या परिवहन उपक्रमा अंतर्गत शहरात सुरू असलेल्या बस सेवेत १ एप्रिल २०२५ पासून प्रवासी भाडेवाढ करण्यात येत आहे. ही भाडेवाढ अल्प असून यामागे परिवहन उपक्रमाला ऊर्जेत अवस्थेत आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे दिसून येते.

तत्पूर्वी जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त यांची यासाठी मान्यता घेण्यात आली आहे. सोलापूर महापालिका आर्थिक सहाय्य रूपाने पूर्वीत असलेल्या सेवा सुविधांबाबतचा मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम कलम ९५ अ नुसार सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका समवेत विविध अहवाल सादर करण्यात आला आहे याम



ध्ये परिवहन उपक्रमाला उर्जित अवस्था प्राप्त करून देण्यासाठी विविध उपाय योजना आखण्यात आले आहेत. त्यानुसार शहरातील बस सेवा देताना त्यामध्ये अल्प दरवाढ करण्यात येत आहे. टप्प्याटप्प्यानुसार ही दरवाढ ५ रुपयाच्या तुलनेत असणार आहे. सन २०२५-२६ मध्ये परिवहन उपक्रमाचे ३० बसेस मार्गावर धावतील असे ग्राह्य धरून ६ कोटी ५३ लाख इतके उत्पन्न अपेक्षित आहे. यामध्ये सवलतीचे पासेस व रिझर्व बसेस तसेच इतर उत्पन्न धरण्यात आले आहे. वर्षभरात बसेस वरील आंतरबाह्य जाहिरात व बस क्यू जाहिरात व बस क्यू शेड वरील जाहिरात यापासून वार्षिक ३३ लाख ४५ हजार रुपयांचे उत्पन्न गृहीत धरण्यात आले आहे. किंचित करण्यात आलेल्या बस भाडे दरवाढ यामुळे प्रवाशांना अधिक आर्थिक तोटा बसणार नाही पण यामुळे परिवहन उपक्रमाला उर्जित अवस्थेत आणण्यासाठी मदत होणार आहे. वास्तविक परिवहन उपक्रमाला उत्पन्न ७ कोटी आणि खर्च ४० कोटीच्या वर असल्याचेही सांगण्यात आले.



## रेल्वे प्रवाशांचे साहित्य चोरणाऱ्या चौघांना अटक

### लोहमार्ग पोलिसांकडून ८ मोबाईल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ मार्च -**

सोलापूर लोहमार्ग पोलिसांनी रेल्वे प्रवाशांचे साहित्य, मोबाईल चोरणाऱ्या टोळीतील चौघांना अटक करून त्यांच्याकडून चोरीचे ८ मोबाईल जप्त केले.

नवनाथ किशन भारती (वय २८, रा. गंगाभेट, बेट सांगवी, जि. नांदेड), आकाश उर्फ विकास अंबादास राजगुरू (वय ३२, रा. कासार पिंपरी, ता. आष्टी. जि. बीड), प्रकाश खेलावन चौहान (वय २७, रा. बेलासपूर, पोस्ट सेहरिया मुडा डिह, गजहा, जि. बलरामपूर, उत्तर प्रदेश, सध्या रा. जेऊर रेल्वे स्टेशनजवळील चिकलठाण गाव, ता. करमाळा, जि. सोलापूर), अल्ताफ चाँद शेख (वय ४७, रा. चांगदेव नगर, सावडी विहिर, ता. राहता, जि. अहिल्यानगर, मुळ रा. पंडीत नगर, सिडको, नाशिक) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. लोहमार्ग पोलीस व आर पी एफ सोलापूर यांच्या संयुक्त पथकाने सोलापूर रेल्वे स्टेशनवरील तसेच रेल्वेतून प्रवास करणारे प्रवासी यांच्या झोपेचा फायदा घेऊन मोबाईल चोरी तसेच इतर सामान चोरी करणारी टोळी यांचा पाठलाग करून तीन आरोपींना पकडले.

या टोळीकडून आठ मोबाईल हस्तगत करण्यात आले असून यातील आरोपींनी शिर्डी येथे राहणाऱ्या अल्ताफ शेख या भंगार विक्रेत्यास चोरलेल्या वस्तू विकल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी चोरीस गेलेल्या वस्तु त्या भंगार विक्रेत्याकडून जप्त केल्या आहेत. ही कारवाई पोलिस अधिक्षक तुषार दोशी, अप्पर पोलीस अधीक्षक रोहिदास पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक एम जे गुरव, अंमलदार एस एस वायदंडे,एस व्ही कोळी, प्रसाद गायकवाड यांनी केली.



## शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत रोहिणी चौधरी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च-**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन तसेच महाराष्ट्र राज्य आयोजित विद्या प्राधिकरण पुणे यांच्यामार्फत आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचा जिल्हास्तरीय बक्षीस वितरण समारंभ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर जिल्हा सोलापूर आणि शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यावतीने शिवछत्रपती रंगभवन या ठिकाणी पार पडला. या स्पर्धेत उत्तर सोलापूर तालुक्यात इयत्ता तिसरी ते पाचवी या गटात परिसर अभ्यास या विषयात प्रथम क्रमांक आल्याबद्दल व्हिडिओ निर्मिती पुरस्कार प्राप्त रोहिणी चौधरी यांना सन्मान चिन्ह ट्रॉफी व रोख रक्कम देण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य जितेंद्र साळुंखे, प्रशासन अधिकारी कादर शेख, अधिव्याख्याता तुकाराम राजे, गटविस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार, तसेच अधिव्याख्याता शशिकांत शिंदे उपस्थित होते. या यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रीपती वर्षा जेधे यांनी अभिनंदन केले.

## सुट्टी दिवशीही मिळकत कर कार्यालय चालू

### शास्तीमध्ये ५० टक्के सूट मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**

पाडवा व रमजान ईद निमित्त सुट्टी आहे मात्र सुट्टी दिवशीही सोलापूर महापालिकेचे मिळकत कर कार्यालय आणि हुतात्मा स्मृती मंदिर येथे कर संकलन केंद्र सुरूच राहणार आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महापालिकेतील मिळकतकर संकलन विभागाकडून मिळकत कर वसुली आणि कारवाईची धडक मोहीम सुरूच आहे. मार्च एंड मुळे तर ही मोहीम अधिक तीव्रपणे आणि बेधडकपणे चालू आहे. या विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध पथकांकडून गाळे सील करण्याची कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, दि. ३० व ३१ मार्च २०२५ रोजी अनुक्रमे पाडवा व रमजान ईद आहे. परंतु मालमत्ता कर कार्यालय व हुतात्मा स्मृती मंदिर येथील कॅश काउंटर चालू राहतील. शास्ती मध्ये ५० टक्के सूट देण्याचे चालू आहे. नागरिकांनी आपला मिळकत कर भरून कटू कारवाई टाळावी, असे आवाहन उपायुक्त लोकरे यांनी केले आहे.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४०/२०२५
निशाण नं.६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सि. डि. सो. यांचे कोर्टात..**

**१) सरस्वती अनिल अंधारे,**
वय-३१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कारी, ता. बाशी, जि. सोलापूर
**२) कु. अरुंधती अनिल अंधारे,**
वय-११ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर
अ.पा.क. जनक आई अर्जदार नं. १
**३) आरती रतन अंधारे,**
वय-३१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**

**विरुध्द**
**कोणीही नाही** - **सा.वाला**

**ज्या अर्थी** यातील अर्जदार नं. १ चे पती अर्जदार नं. २ चे वडिल व अर्जदार नं. ३ चे भाऊ अनिल रतन अंधारे हे दि. १६/०५/२०२४ रोजी मौजे कारी, ता. बार्शी, येथे मयत झालेले आहेत. मयत अनिल रतन अंधारे यांना अर्जदार नं. १ व २ शिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत अनिल रतन अंधारे वाहक क्रं. १२५२१३ हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात वाहक म्हणून नोकरीस होते. मयत अनिल रतन अंधारे यांचे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथे भविष्य निर्वाह निधीचे खाते असून सदर खात्यामध्ये तसेच उपदान/पुरवणी उपदार व शिल्लक रजा असे एकूण र.रु.५,८२,१५०/- एवढी अंतिम देयकाची रक्कम आहे. यातील अर्जदार नं. १ याने सदरची रक्कम वारस नात्याने अर्जदार नं. १ यांना मिळावी म्हणून ता. २१/१०/२०२४ रोजी विनंती केली असता संबंधीत विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ यांनी वारसचा दाखल्याची मागणी केली त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांना वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात केलेला आहे.

**त्या अर्थी** वर नमूद अर्जदार नं. १ ते २ यांचे शिवाय मयत अनिल रतन अंधारे यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख दि.३/५/२०२५ रोजी याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना मयत अनिल रतन अंधारे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. दि.२६/०३/२०२५

**सही/-**
**क. लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

## धामणगावात पूर्ववैमनस्यातून तरूणास मारहाण

**सोलापूर** - बार्शी तालुक्यातील धामणगावात पूर्ववैमनस्यातून चौघांनी केलेल्या मारहाणीत तरूण जखमी झाला. ही मारहाण २७ मार्च रोजी दुपारी १.४५ वाजता झाली. सदानंद दयानंद बोधले (वय २५ रा. धामणगाव) असे जखमी झालेल्या तरूणाचे नाव आहे. त्याच्यावर वैराग येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून सोलापूर येथील



शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, डि व सब डि सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील उत्तर सदर बझार पेठ, सोलापूर येथील मिळकत यांसी म्यु. पल घर नं. ९३९ यांसी सिटी सर्व्हे नं. ७१०५/३ प्लॉट नंबर २०/२ याचे एकुण क्षेत्र २०२३.०० चौ.मी. यामध्ये बांधण्यात आलेल्या यशश्री अपार्टमेंट या इमारतीमधील दुस-या मजल्यामधील फ्लॅट / सदनिका नं. एस.एफ. १२ याचे क्षेत्र ८६.१५ चौ.मी. असून सदरची मिळकत श्री. सोन्याबापू भिमराव बोरोटीकर यांनी श्री. मोरेश्वर दादो डंके यांचे कुलमुखत्यार मे. अरुण कन्स्ट्रक्शनचे प्रोप्रायटर श्री. अरुण गोविंद शेटे यांचेकडून रितसर रजिस्टर खरेदीदस्त नं. २५६९/१९९५ अन्वये दि. २५/०७/१९९५ रोजी खरेदी केलेली होती. तद्नंतर श्री. सोन्याबापू भिमराव बोरोटीकर यांनी आमचे अशिल श्री. मनोज लक्ष्मण गिरी यांना सदरची मिळकत रितसर रजिस्टर खरेदीदस्तान्वये खरेदी दिलेली आहे. सदर खरेदीखत करताना श्री. सोन्याबापू भिमराव बोरोटीकर यांनी त्यांचे रजिस्टर खरेदीदस्त नं. २५६९/१९९५ व त्याची मुळ पावती आमचे अशिल श्री. मनोज लक्ष्मण गिरी यांच्या ताब्यात दिले होते.

तरी वर नमुद केलेप्रमाणे सदर मिळकतीचे खरेदीदस्त नं. २५६९/१९९५ चा मुळ दस्त व त्याची मुळ पावती हे आमचे अशिल श्री. मनोज लक्ष्मण गिरी यांच्या ताब्यात होते व ते त्यांच्याकडुन गहाळ झालेले असुन व ते अद्याप पावेतो आमचे अशिलास आढळुन आलेले नाही. तसेच आमचे अशिल यांनी जेलरोड पोलीस स्टेशन येथे ऑनलाईन सदरचे दस्त गहाळ झालेबाबत गहाळ रजिस्टर तकार नं. २१२७-२०२५ ता. २८/०३/२०२५ रोजी नोंद केलेली आहे. याशिवाय आमचे अशिलांनी दिलेल्या माहीतीवरुन व सांगणेवरुन सदरची मिळकत त्यांनी कोणासही कसल्याही प्रकारे हस्तांतरण अगर अन्य त-हेने विकी केलेले नाही व अन्य कोणत्याही बँकेस, संस्थेस गहाणखताने वर नमूद केलेले खरेदीखताचे मुळ दस्त व त्याची मुळ पावती तारण वगैरे ठेवुन कर्ज घेतलेले नाही व सदरचे खरेदीखताचे मुळ दस्त व त्याची मुळ पावती ही कागदपत्रे कोणत्याही बँकेच्या, वित्तीय संस्थेच्या अथवा कोणत्याही सावकाराच्या ताब्यात नाहीत. वर नमूद गहाळ झालेला खरेदीखताचे मुळ दस्त व त्याची मुळ पावती कोणीही गैरवापर करु नये व तसेच सदरचे वर नमूद खरेदीखताचा दस्त कोणास मिळाल्यास त्यांनी त्वरीत खालील नमुंद दिलेल्या पत्यावर आणुन द्यावे तसेच त्याबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसांच्या आंत लेखी कागदोपत्रानिशी आपल्या हरकती अगर तकारी खालील पत्यावर कळवाव्यात व आमची खात्री करून दयावी. तसेच सदर खरेदीखताचे मुळ दस्त व त्याची मुळ पावतीच्या आधारे कोणाचीही कसल्याही प्रकारे फसगत होवु नये, म्हणुन ही जाहीर नोटीस दिली, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. २८/०३/२०२५.

**सही/-**
**ॲड. रविंद्र रमेश दुलंगे,**
**बी.कॉम., एलएल.बी.**
**रा. १० लॉयर्स चेंबर्स जिल्हा न्यायालय आवार,**
**सिध्देश्वर पेठ, सोलापूर मो.नं ९८५०७९३५२१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## यल्लम्मा हॅण्डलूममध्ये उन्हाळा स्पेशल ऑफर

**सोलापूर, दि.२९ मार्च-**

कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलसाठी प्रसिद्ध असलेल्या दत्त चौक व भद्रावती पेठ येथील यलम्मा हॅन्डलूममध्ये खास, उन्हाळा स्पेशल ऑफर दिली जात आहे. कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलच्या खरेदीवर २० टक्के सूट दिली जात असल्याचे यल्लम्मा हॅण्डलूमचे व्यवस्थापक यल्लप्पा नादरगी यांनी सांगितले. नाविन्यपूर्ण व भरपूर व्हरायटीज असलेल्या यल्लम्मा हॅण्डलूममध्ये कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे फ्रेश स्टॉक कॉम्बो ऑफर व उन्हाळा स्पेशल ऑफर दिली जात आहे. यामध्ये पिझ्झासाडी ३ नग ६९९ रुपये, मंगळसूत्रसाडी ३ नग ९९९ रुपये, प्ररिणीतीसाडी ३ नग११९९ रुपये, बटरकॉटनसाडी ३ नग १४९९ रुपये अशी खास ऑफर उन्हाळ्यानिमित ठेवले आहे. विविध राज्यातील कॉटन साड्या व ड्रेस मटेरियल असून यामध्ये पीवर कॉटनच्या असंख्य व्हरायटी जसे हॅण्ड्लुमच्या साड्या फक्त आमच्या कडे मिळतात. जसे मदुराई कॉटन, ओरिसा कॉटन, कर्णाटक कॉटन, ढाका कॉटन, व्यंकटगिरी कॉटन, कलकत्ता हॅण्डवर्क कॉटन, कलमकारी कॉटन, पोचमपल्ली कॉटन हैद्राबाद कॉटन, जामदानी कॉटन, असे विविध राज्यातील हॅण्डलुम व पावरलूम कॉटन साड्याच्या साड्या व ड्रेस मटेरियलच्या असंख्य व्हरायटीज येथे उपलब्ध आहेत. गेल्या अकरा वर्षापासून कॉटन साडी व ड्रेस मटेरियलसाठी यल्लमा हॅन्डलूम सुप्रसिध्द आहे.

**ताबा नोटीस नमुना झेड (Z NOTICE)**

म.स.सं. नियम 1960 मधिल नियम 107 (11) ड-1

**सोलापुर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित सोलापुर**
**श्रीमहालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बार्शी ता. बार्शी**
जुने नाव धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म. तडवळे ता. बार्शी

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी मला प्राप्त म.स.सं. कलम 156 च्या अधिकारानुसार मी गोपीचंद अरुण तुकशेट्टि, विशेष वसुली व विकी अधिकारी श्रीमहालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी जुने नाव धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था म.तडवळे ता. बार्शी यांच्या खालील थकबाकीदारास म.स.सं. नियम 1961 अन्वये मागणी नोटीसद्वारे त्यांच्याकडिल येणे रक्कमा भरण्यास कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खालील निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी म.स.सं.नि. 1961 मधिल नियम 107 (10) व 11 (ड) नुसार रितसर बोजा नोंद करून झेड नोटीसद्वारे ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसद्वारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विकी, गहान, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत याउपर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो श्रीमहालक्ष्मी नागरी सह. पतसंस्था म.बार्शी यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बोजाची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुलीखर्चास कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदार/जामिनदार | मिळकतदार | दाखला क्रमांक व दिनांक | झेड नोटी र. रु. ३१/०३/२०२५ अखेर | मिळकत ठिकाण | मिळकत क्रमांक | क्षेत्र | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सुतार मारुती दिगांबर<br>स्वामी सोमनाथ नागनाथ<br>मदने संभाजी बळीराम | सुतार मारुती दिगांबर<br>मदने संभाजी बळीराम | 1321/2009<br>17/04/09 | 1,98,222 | तडवळे<br>तडवळे | 610<br>715 | 0/60 पैकी<br>2/11 पैकी | 06/10/2022 |
| 2 | जाधव सुदर्शन बिभिषण<br>भोसले रविंद्र गजेंद्र<br>शिरगिरे दत्तात्रय बाळासाहेब | सुदर्शन बिभिषण जाधव<br>उमा रविंद्र भोसले<br>मिनाक्षी दत्तात्रय शिरगिरे | 15/2016<br>07/04/2016 | 1,19,157 | उपळे द.<br>उपळे दु.<br>उपळे दु. | 273 पैकी<br>24 पैकी<br>19/3 | 0/88<br>1/04<br>0/81 | 29/3/2025 |
| 3 | बोकेफोडे गणेश भगवान<br>कसबे विजय रामभाऊ<br>बोकेफोडे शंकर जालिंदर | जलिंदर केरू बोकेफोडे | 13/2016<br>07/04/2016 | 2,06,193 | निंबळग<br>ता. बार्शी | 83 पैकी | 1/25 | 29/03/2025 |
| 4 | सय्यद मुमताज अजमेर<br>कसबे संजय कोरबा<br>माळी श्रीधर पांडुरंग<br>आवाटे दौलत बासू<br>सय्यद आयुब अजमेर | कसबे संजय कोरबा<br>माळी श्रीधर पांडुरंग | 16/2016<br>07/04/2016 | 2,08,163 | उपळे दु.<br>उपळे दु. | 60/1<br>964 | 0/28 पैकी<br>1/26 | 29/03/2025 |
| 5 | नलवडे मंजुषा सिध्देश्वर<br>नलवडे सिध्देश्वर विठ्ठल<br>नागटिळक तानाजी शिवाजी | नलवडे मंजुषा सिध्देश्वर | 7/2016<br>07/04/2016 | 1,90,867 | मळेगाव<br>मळेगाव | 162/1<br>129/1 | 0/02<br>0/40 | 29/03/2025 |
| 6 | डुरे उत्रेश्वर गोपीनाथ<br>भालशंकर श्रीशैल मच्छिंद्र<br>लोंढे दिपक विजयकुमार | डुरे उत्रेश्वर गोपीनाथ | 01/2016<br>07/04/2016 | 1,13,383 | इर्ले<br>इर्ले | 179 पैकी<br>52 पैकी | 0/24 पैकी<br>0/98 पैकी | 29/03/2025 |
| 7 | गोसावी प्रसाद गजानन<br>धावणे प्रशांत मारुती<br>माळी प्रदिप सुग्रीव | माळी प्रदिप सुग्रीव | 12/2016<br>07/04/2016 | 2,04,475 | कळमण<br>ता. उत्तर<br>सोलापूर | 142/1/ब | 1/00 पैकी | 29/01/2025 |

ही ताबा नोटीस दिली असे.
दिनांक : 29/03/2025

सील

**सही/-**
**गोपीचंद अरुण तुकशेट्टि**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन म. सोलापूर**





**चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया**

**भाग - ६**

## रनिंगमध्ये रेस्ट डे चे महत्त्व आणि फायदे

धावपटूंना वाटते की सातत्याने धावल्यानं कामगिरी सुधारते, पण रेस्ट डे शरीरासाठी तितकाच महत्त्वाचा आहे. तो स्नायूंना पुनर्बांधणीची संधी देतो, दुखापती टाळतो आणि मानसिक ऊर्जा पुनर्संचित करतो.

### रेस्ट डेचे फायदे

- स्नायू पुनर्बांधणी आणि मजबुती:
  धावल्याने स्नायूंमध्ये मायक्रोटिअर्स होतात. रेस्ट डेनं हे दुरुस्त होऊन स्नायू बळकट होतात.
- चोट टाळतो:
  सतत धावल्यानं ओव्हरट्रेनिंगमुळे दुखापती होऊ शकतात (उदा. शिन स्प्लिंट्स, स्नायू ताण). रेस्ट डेनं शरीराला पुनरुज्जीवन मिळतं.
- मानसिक ताजेपणा:
  रोज धावल्यानं कंटाळा आणि थकवा येऊ शकतो. रेस्ट डेनं मन ताजं राहतं आणि प्रेरणा वाढते.
- कार्यक्षमता सुधारते:
  ग्लायकोजेनचा साठा पुनर्संचित होतो, ज्यामुळे स्टॅमिना वाढतो आणि कामगिरी सुधारते.
- इम्युन सिस्टम बळकट होते:
  उच्च तीव्रतेच्या सरावामुळे प्रतिकारशक्ती कमी होते. रेस्ट डेनं शरीर आजारांपासून बचाव करतं.
- झोपेची गुणवत्ता सुधारते:
  योग्य विश्रांतीमुळे हार्मोन्स संतुलित राहतात आणि झोप गाढ होते.

### रेस्ट डे कसा घ्यावा?

संपूर्ण विश्रांती किंवा सक्रिय पुनर्बलन (हलके स्ट्रेचिंग, चालणे, योगा).

### किती रेस्ट डे घ्यावा?

**बिगिनर:** २ दिवस
**मध्यम स्तर:** १-२ दिवस
**प्रगत धावपटू:** १ दिवस किंवा सक्रिय विश्रांती

### निष्कर्ष

रेस्ट डे हे ट्रेनिंगचा अविभाज्य भाग आहे. ते दुखापती टाळते, सहनशक्ती वाढवते आणि मानसिक-शारीरिक आरोग्य सुधारते. त्यामुळे रेस्ट डे घेतला, तरच धावण्याची गुणवत्ता वाढेल!

**- अतिश शहा**

फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

# दुसरा विजय दिल्ली कॅपिटल्सचे लक्ष्य

◆ **विशाखापट्टणम्, २९ मार्च**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी दुपारच्या सत्रात दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. अलिकडेच लखनौ सुपर जायण्ट्सविरुद्ध विजय मिळविल्यामुळे आत्मविश्वास बळावलेला आणि के. एल. राहुलच्या पुनरागमनामुळे उत्साह संचारलेला अक्षर पटेलचा दिल्ली कॅपिटल्स संघ हंगामात आपली लय कायम ठेवत दुसरा विजय नोंदवण्यास उत्सुक आहे. तिकडे दणकेबाज सुरुवात केल्यानंतर सनरायझर्स हैदराबादला गुरुवारी लखनौ सुपर जायण्ट्सकडून पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे हैदराबाद संघ सुद्धा पुन्हा विजयाच्या मार्गावर परण्यास उत्सुक असेल, परंतु कर्णधार पॅट कमिन्सवर दबाव असेल.

तिकडे केएल राहुलच्या पुनरागमनामुळे दिल्ली कॅपिटल्समध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. आपल्या पहिल्या बाळाच्या स्वागतासाठी राहुल सुटीवर हगेला होता व त्यामुळे तो लखनौविरुद्धच्या सलामी सामन्याला मुकला होता.



दुबईत भारताला चॅम्पियन्स चषक जिंकून देण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या केएल राहुलला दिल्ली कॅपिटल्सने १४ कोटी रुपयांत खरेदी केले आहे. अनुभव असूनही केएल राहुलने संघाचे नेतृत्व करण्याचे टाळले व अक्षर पटेलवर कर्णधारपदाची जबाबदारी सोपविली.

एकेकाळी भारताचा सर्व फॉरमॅटचा मुख्य आधार मानला जाणारा राहुल गत वर्षी भारताच्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग नव्हता आणि लखनौ सुपर जायण्ट्ससोबतच्या आयपीएल कारकिर्दीत त्याला प्रभाव पाडण्यास संघर्ष करावा लागला, त्यामुळे त्याला लखनौ संघात कायम ठेवले नाही.

संघाचे मालक संजीव गोयंका यांच्याशी झालेल्या त्याच्या तणावपूर्ण वादामुळे गेल्या हंगामात तो चर्चेत आला. आता राहुल एका नवीन फ्रॅन्चायझीमध्ये नवीन सुरुवात करताना आपल्या कामगिरीवर चर्चा करण्यास उत्सुक असेल.

'मी काही काळापासून टी-२० संघाबाहेर आहे. मी खेळाडू म्हणून कुठे आहे व मला परत येण्यासाठी काय करावे लागेल याची मला पूर्ण कल्पना आहे. आयपीएलच्या माध्यमातून मला भारताच्या टी-२० संघात परतण्यासाठी प्रयत्न करण्याची संधी आहे, असे राहुलने अलीकडेच म्हटले होते. दिल्ली कॅपिटल्सच्या तंबूत सहभागी होण्यापूर्वी तो मुंबईत भारताचे सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करताना दिसला. राहुलच्या पुनरागमनामुळे गत सामन्यात संघर्ष करणाऱ्या दिल्लीच्या अव्वल फळीला अत्यंत आवश्यक स्थिरता मिळेल.

२११ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सला ५ बाद ६५ अशा दयनीय स्थितीनंतर आशुतोष शर्मा (३१ चेंडूत नाबाद ६६) आणि विप्रज निगमने (८ व्या क्रमांकावर ३९) संघाला एका गड्याने रोमांचक विजय मिळवून दिला. सहाव्या क्रमांकावर ट्रिस्टन स्टब्सनेही ३४ धावांची खेळी केली.

पहिल्यांदाच आयपीएल संघाचे नेतृत्व करत असलेल्या अक्षर पटेलला संघासाठी चांगला निकाल मिळेल अशी आशा आहे.

दिल्लीकडे एक जबरदस्त गोलंदाजी आक्रमण असून त्याचे नेतृत्व मिशेल स्टार्क करत आहे. स्टार्क, अक्षर व कुलदीप यादवसह, हैदराबादच्या अभिषेक शर्मा व हेड या स्फोटक सलामीवीर जोडीचा सामना करण्यासाठी महत्त्वपूर्ण असेल. स्टब्स आणि मोहित शर्मा सुद्धा शेवटच्या टप्प्यात महत्त्वपूर्ण यश मिळवू शकतात.

कैदराबादने आपल्या हंगामाच्या पहिल्या सामन्यात ६ बाद २८६ धावांचाडोंगर उभा केला होता, परंतु दुसऱ्या सामन्यात ते अपयशी ठरले आणि लखनौविरुद्ध केवळ ९ बाद १९० धावा काढू शकले.

महत्त्वाच्या क्षणी गडी गमावल्यामुळे आमचा वेग बिघडला. असे वारंवार घडू नये याची आम्हाला खात्री करावी लागेल, असे हेनरिक क्लासेन म्हणाला. मोहम्मद शमी, कमिन्स व हर्षल पटेलच्या नेतृत्वाखालील सनरायझर्स हैदराबादचे गोलंदाजी आक्रमण अजूनही मजबूत आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

दिल्ली कॅपिटल्स वि. सनरायझर्स हैदराबाद
**स्थळ :** डॉ. वाय. एस. राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियम, विशाखापट्टणम्
**वेळ :** दुपारी ३.३० वाजतापासून

राजस्थान रॉयल्स वि. चेन्नई सुपर किंग्ज
**स्थळ :** डॉ. भूपेन हजारिका स्टेडियम, गुवाहाटी
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# मुंबई इंडियन्सचा सलग दुसरा पराभव

## गुजरातने ३६ धावांनी हरविले : साई सुदर्शनचे अर्धशतक

**अहमदाबाद, दि. २९ मार्च-**

गुजरात टायटन्सने आयपीएलच्या चालू हंगामातील पहिला विजय नोंदविला आहे. त्यांनी शनिवारी मुंबई इंडियन्सचा ३६ धावांनी पराभव केला. गुजरातचा हा पहिला विजय तर मुंबईला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. अहमदाबादमध्ये गुजरातने सलग चौथ्या सामन्यात मुंबईचा पराभव केला आहे.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. गुजरातने २० षटकांत ८ गडी गमावून १९६ धावा केल्या. प्रत्युत्तरात मुंबईला २० षटकांत ६ बाद १६० धावाच करता आल्या.

गुजरातकडून साई सुदर्शनने ४१ चेंडूत ६३ धावा केल्या. त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले. त्याच्याशिवाय जोस बटलरने ३९ आणि शुभमन गिलने ३८ धावा केल्या. कर्णधार हार्दिक पंड्याने २ विकेट घेतल्या. ट्रेंट बोल्ट, दीपक चहर, मुजीब उर



रहमान आणि एस राजू यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. मुंबईकडून सूर्यकुमार यादवने ४८ आणि तिलक वर्माने ३९ धावा केल्या. मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. कागिसो रबाडा आणि साई किशोर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.



# ह.दे. प्रशालेच्या मुलांना विजेतेपद

## राज्य शालेय १७ वर्षांखालील क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**

हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाने १७ वर्षांखालील मुलांच्या राज्य शालेय क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

नेहरूनगर शासकीय मैदानावर झालेल्या स्पर्धेत राज्यातील ८ विभागांनी भाग घेतला होता. पुणे विभागाकडून प्रतिनिधित्व करताना ह. दे. प्रशालेने शेवटच्या चेंडूवर नागपूर विभागाचा दोन धावांनी पराभव केला. उपांत्य फेरीत लातूर विभागावर २२ धावांनी मात केली. अंतिम सामन्यात कोल्हापूर विभागाबरोबर प्रथम फलंदाजी करताना कोल्हापूर विभागाला पुणे विभागाने केवळ ५८ धावात रोखले. पुणे विभागातील गोलंदाजाने अंतिम सामन्यात भेदक गोलंदाजी करत कोल्हापूर संघास केवळ ५८ धावा रोखण्यात यश मिळवले. आदित्य दडे यांनी सर्वोत्कृष्ट गोलंदाजी करत दोन षटकात ८धावा देऊन दोन गडी बाद करत संघाच्या विजयात महत्त्वाचा वाटा उचलला. आदित्य तमनूर, ओम चव्हाण, जयंत मित्रगोत्री, यांनी प्रत्येकी एक बळी तर प्रथमेश लोंढे यांने दोन बळी घेत गोलंदाजीचे वर्चस्व सिद्ध करीत १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला.

५८ धावाचे लक्ष घेऊन मैदानात उतरलेला ह.दे.चा फलंदाज अथर्व काळे याने नाबाद २३ धावा व प्रथमेश लोंढे नाबाद ३७ धावा, या आघाडीच्या फलंदाजांनीच आठ षटकात ५८ धावांचे लक्ष गाठले व आपल्या संघास विजयी केले. या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळी ,पुणेचे उपाध्यक्ष श्री. श्रीकृष्ण चितळे, नियामक मंडळाचे सदस्य ॲड, दामोदर भंडारी, सुधीर काळकर ,पराग ठाकूर , शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या हस्ते सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्या दीपा फाटक, ज्येष्ठ पर्यवेक्षक हनमंत मोतीबने, लकण्णा कमळे, रविंद्र पानसरे, महेंद्र रणधीर, औदुंबर सर्वगोड, शांतप्पा कुंभार,आप्पासाहेब राऊत, भानुदास बनसोडे, णेश नेवरे, मारुती शहाणे,क्रीडाशिक्षक माणिक साळसकर, प्रमोद चुंगे, अक्षय गवळी यांचे मार्गदर्शन तर प्रकाश कंपली यांचे प्रशिक्षण लाभले.

**विजेता संघ :**

आदित्य दडे (कर्णधार),अथर्व काळे, प्रथमेश लोंढे, यश मंगरूळे(उपकर्णधार)ओम केदारनाथ चव्हाण,आदित्य तमनूर, सिद्धांत कांबळे, ययाती देवकते, आदित्य बंडगर, जयंत मित्रगोत्री, मयंक पात्रे, अनवीर वर्धा, कुणाल कामतकर, हर्षवर्धन होनपारखे, सुबोध वाघमारे, अरहित कांबळे.

# नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीस दुहेरी मुकुट

## साई समर्थ क्रीडा भारतीस २-१ असे हरविले

## संग्राम पवारची शतकी खेळी

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

चौदा वर्षाखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत साई समर्थ क्रीडा भारती विरुद्धच्या तीन सामन्याच्या मालिकेत नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने २-१ असा विजय मिळवित १४ व १२ वर्षांखालील गटातून दुहेरी मुकुट संपादिला.

पुष्प जिमखाना डोणगाव रोड येथे झालेल्या मालिकेतील १४ वर्षांखालील गटात पहिल्या सामन्यात उत्कृष्ट फलंदाज तन्मय वाघमोडे, गोलंदाज श्रुती चट्टे व सामनावीर तन्मय वाघमोडे ठरला. दुसऱ्या सामन्यात त्यांनी ३६ धावांनी विजय मिळविला. या सामन्यात उत्कृष्ट फलंदाज पाटील, गोलंदाज अथर्व पाटील व सामनावीर ऋग्वेद पाटील याने मिळविला.

१२ वर्षाखालील मुलांच्या सामन्यातही एनजीसीएने आपल्या वर्चस्व राखले. यातील पहिल्या सामन्यांमध्ये ३२ धावाने विजय संपादन केला. यात उत्कृष्ट फलंदाज तन्मय वाघमोडे, गोलंदाज योगेश मोटे, सामनावीर सुजल गायकवाड ठरला. दुसऱ्या सामन्यांत त्यांनी १७ धावाने मात केली. या सामन्यात सामन्यात





सामनावीर रणवीर सिंग बोमरा, फलंदाज ऋग्वेद पाटील, गोलंदाज नमन माने हे वैयक्तिक पुरस्काराचे मानकरी ठरले. तिसऱ्या सामन्यांमध्ये साई समर्थ क्रीडा भारती संघाने सात गडी राखून विजय संपादन केला. या सामन्यात सामनावीर आदित्य चटके, फलंदाज सुरज मोरे तर गोलंदाज आदित्य चटके यांनी वैयक्तिक बक्षीस पटकावले.

या संघाना एनजीसीएचे प्रशिक्षक निलेश गायकवाड तर साई समर्थ क्रीडा भारतीचे प्रशिक्षक अनिल सांब्राणी यांनी आपापल्या संघास मार्गदर्शन केले. पंच म्हणून गणेश पवार अभिजीत सरवदे. श्रवण म्हेत्रे व गोविंद कणके यांनी काम पाहिले. बक्षीस वितरण वितरणास सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले.

# सोलापूरच्या आर्या उमापची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

बीसीसीआय अंतर्गत होणाऱ्या वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेसाठी १७ वर्षाखालील गटात आर्या पोपट उमाप हिची महाराष्ट्र संघात निवड झाली. गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे होणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, बडोदा, विदर्भ आणि मुंबई हे संघ सहभागी आहेत. ३ ते १० एप्रिल दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी १ एप्रिलला महाराष्ट्र संघ अहमदाबादला रवाना होत आहे.



आर्याला स्नेहल जाधव, किरण मणियार, मानसी जाधव आणि सारिका कुरुलकर यांचे असे मार्गदर्शन लाभले. आर्याचे सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजीतसिंह मोहिते पाटील, संयुक्त सचिव धैर्यशील मोहिते पाटील व चंद्रकांत रेम्बर्सू यांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.

# ग्रामीण विभागातून अजिंक्यतारा संघ उपांत्य फेरीत

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

येथील विजापूर रोडवरील शासकीय मैदानावर गेले ३ दिवसापासून सुरू असलेल्या सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील तरुण होतकरू मराठा समाजाच्या खेळाडूंना क्रीडा प्रकारातून एक उत्तम मंच देण्यासाठी प्रमुख आयोजक प्रशांत बाबर यांच्या व मित्र मंडळ तर्फे आयोजित मराठा प्रीमियर लीग २०२५ सीजन २ चे चौथ्या दिवशी ग्रामीण विभागातून अजिंक्यतारा संघ उपांत्य फेरीत पोचला असून उद्या अंतिम दिवशी शहरी विभागातील दोन संघ तसेच ग्रामीण विभागातून २ संघ यांच्यात उपांत्य फेरीचे सामने होणार असून त्यानंतर तिसऱ्या क्रमांक साठी व अंतिम सामना होणार असून त्यानंतर होणारा पारितोषिक वितरण समारंभ राजमाता जिजाऊ मां साहेबांचे वडील लखोजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजीराजे जाधव (सिंदखेडराजा) यांच्या शुभहस्ते करण्यात येणार असल्याचे आयोजक यांनी कळविले. चौथ्या दिवशी पंढरपूर, अकलूज,



**महेश मिसाळ याला सामनावीराचा पुरस्कार देताना सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, स्पर्धा आयोजक प्रशांत बाबर.**

पेनुर, सांगोला येथील चार संघात वन हाफ पद्धतीने साखळी सामने खेळविण्यात आले. यावेळी मराठा प्रीमियर लीग स्पर्धेसाठी यूट्यूब वर लाइव्ह प्रक्षेपण साठी सहकार्य केलेले सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा सोलापूर) श्री.राजन माने साहेब व फौजदार पोलिस स्टेशन चे विष्णु गायकवाड यांनी देखील सदिच्छा भेट दिली व त्यांच्या हस्ते सामनावीरचा पुरस्कार देण्यात आला व सामन्याची नाणेफेक करण्यात आली. स्पर्धेचे चषक पुरस्कृत केलेले श्री विक्रांत पवार यांचे हस्ते शेवटच्या दोन सामन्यातील सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

संक्षिप्त धावफलक - **प्रबळगड** : ६८/३ (६) गणेश भोसले २७, श्रीधर पोळ नाबाद १४ कृष्णा साळुंखे नाबाद १० सुभाष केदार २ बळी विठ्ठल चव्हाण १ बळी विजयी विरुद्ध **अजिंक्यतारा** : ४७/७ (६) सुभाष केदार ११, विठ्ठल चव्हाण १० महेश मिसाळ नितीन घाडगे प्रत्येकी २ बळी, संतोष मिसाळ विशाल जगताप प्रत्येकी १ बळी. सामनावीर - महेश मिसाळ

**लोहगड** : ९३/५ (६) मंगेश निकम २७ विश्वजीत पवार १४ मंगेश देशमुख ३१ ओंकार सोमवंशी २ बळी आनंद मेळगे आनंद माने प्रत्येकी १ बळी विजयी विरुद्ध विशाळगड : ९३/१ (६)मयूर तळेकर नाबाद ७३ सौरभ बारले १७ सुपर ओवर स्कोअर **विशाळगड** : १६/१ लोहगड : १७/0. सामनावीर - मंगेश देशमुख

**लोहगड** : ५३/४ (५) अभीज्योत खराडे नाबाद ३०, विश्वजीत पवार १० महेश मिसाळ २ बळी, नितीन घाडगे १ बळी पराभूत विरुद्ध **प्रबळगड** : ५४/४ (५)व महादेव घाडगे ४३ रोहित देशमुख बापू मगर प्रत्येकी १ बळी. सामनावीर - महादेव घाडगे.

**विशालगड** : ४८/६ (५) मयूर तळेकर १४ ओंकार सोमवंशी १४ विठ्ठल चव्हाण २ बळी समाधान माने व सुभाष केदार प्रत्येकी १ बळी पराभूत विरुद्ध **अजिंक्यतारा** : ४९/0 (३) राजेश माने नाबाद २४ विठ्ठल चव्हाण नाबाद १९. सामनावीर - विठ्ठल चव्हाण

**अजिंक्यतारा** : ९२/३ (५) विठ्ठल चव्हाण ६१, मनोज जाधव नाबाद १६, सुभाष केदार १३ बापू मगर व अभीज्योत खराडे प्रत्येकी १ बळीव विजयी विरुद्ध **लोहगड** : ७५/२ (५) अभिज्योत खराडे ५१ , विश्वजीत पवार १० राजेश माने सुभाष केदार प्रत्येकी १ बळी. सामनावीर - विठ्ठल चव्हाण

**उपांत्यपूर्व सामना**

अजिंक्यतारा : ६१/३ (४) विठ्ठल चव्हाण ४४, सुभाष केदार १० विशाल जगताप २ बळी, संतोष मिसाळ १ बळी विजयी विरुद्ध प्रबळगड : ४४/४ (४) विशाल घाडगे १७ राजेश माने २ बळी, समाधान माने विठ्ठल चव्हाण प्रत्येकी १ बळी. सामनावीर - विठ्ठल चव्हाण

**आद होणारे उपांत्य सामने**

१) शिवनेरी विरुद्ध सिंधुदुर्ग
२) रामशेजगड विरुद्ध अजिंक्यतारा

## मराठा प्रीमियर लीग २०२५ रविवारी उपांत्य आणि अंतिम सामने

### तिघांची शानदार अर्धशतके

चौथ्या दिवशी ३ खेळाडू मयूर तळेकर याने नाबाद ७३ धावा व विठ्ठल चव्हाण यांने नाबाद ६१ धावा, अभिज्योत खराडे नाबाद ५१ धावा करताना धमाकेदार अर्धशतके झळकावली आणि आज स्पर्धेत श्रीराज माने पाटील यांचा लोहगड विरुद्ध पंढरपूरचे आनंद मेळगे यांच्या विशालगड संघातील सामना सुपर ओवर मध्ये निकाल लागून त्यात लोहगड संघाने विजय मिळवला.

**उठावणा एवं बैठक**



**श्री. राजगोपाल गोविंदलाल मिणियार**
यांचे शुक्रवार दि. २८/०३/२०२५ रोजी निधन झाले.

**उठावणा :** रविवार दि. ३०/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.

**बैठक :** १ एप्रिल, २ एप्रिल तसेच ३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत राहील.

**ठिकाण :** निजी निवास, जोडभावी पेठ, सोलापूर

- शोकाकूल -

रविन्द्र, सुरज, प्रकाश, सागर
समस्त मिणियार परिवार

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### मंगळवेढयाच्या ग्रामीण भागातून ३० वर्षीय विवाहिता आपल्या मुलासह बेपत्ता

**मंगळवेढा दि..२९ मार्च-**

मंगळवेढयाच्या ग्रामीण भागातून एक ३० वर्षीय विवाहित महिला नातेवाईकांकडे जावून येते असे सांगून आपल्या मुलासोबत घराबाहेर पडली ती अदयाप घरी परतली नसल्याने तीच्या वडिलांनी बेपत्ता झाली असल्याची तक्रार पोलिसात दिली आहे. पोलिस त्या माय-लेकरांचा कसून शोध घेत आहेत. दि.२५ रोजी सकाळी ८.३० वा. सगळे घरी असताना बेपत्ता मुलगी व तीचा मुलगा असे दोघेजण चुलत बहिणीकडे जावून येते असे म्हणून घरातून निघून गेली. सायंकाळचे सात वाजले तरी ती मूळ गावी परतली नसल्याने तीच्या वडिलांनी याबाबत नातेवाईकांकडे फोन करून चौकशी केली असता ते दोघे दुपारी बारा वाजताच घरी जातो असे सांगून निघून गेले असल्याचे नातेवाईक म्हणाले. तीच्या घरच्यांनी पाहुण्याकडे गावात सर्वत्र शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. तीचे वर्णन - अंगात पिवळ्या रंगाची साडी,उंची ५ फुट,रंग गोरा,भाषा मराठी,शरीर बांधा मध्यम,डाव्या हातावर गोंदण,सोबत असलेल्या मुलाच्या अंगावर काळी पँट व पांढर्या रंगाचा शर्ट,उंची ४ फुट,रंग गोरा. अशा वर्णनाचे दोघे कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### वडिलांच्या स्मरणार्थ स्वखर्चातून बोअरवेल लोकार्पण

**मोडनिंब, दि.२९ मार्च -**

मोडनिंब (ता.माढा) येथील स्व. शिवाजी पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांचे पुत्र ग्रा.पं. सदस्य बालाजी पाटील आणि विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन जयसिंह पाटील यांनी स्वखर्चातून बोअरवेलचे लोकार्पण करण्यात आले. शहरातील प्रभाग क्रमांक तीन मधील रोहिदास नगर येथे ग्रा. प. सदस्य बालाजी पाटील यांच्या हस्ते या बोअरवेलचे लोकार्पण झाले. बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित पिण्याच्या पाण्याचा प्रश्न खऱ्या अर्थाने पूर्णत्वास निघाला,असल्याचे ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील यांनी सांगितले.लोकांची पाण्याची समस्या गंभीर होत चालली होती अशावेळी सामाजिक दातृत्व दाखवीत पाटील कुटुंबियांनी पुढाकार घेऊन स्वखर्चाने बोअरवेल घेऊन लोकार्पण केले. तेथील लोकांना दिलासा दिला.सदर बोअरवेलमुळे जनतेची पाण्यासाठीची पायपीट थांबली आहे. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल ग्रामस्थांनी गौरवोद्गार काढले आहेत.यावेळीपाटील कुटुंबियांच्या सदर स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. तसेच या कार्याबद्दल आभार मानून त्यांचा सत्कार करण्यात आला.



### शेळके वस्ती दहिगाव जि.प. शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात

**करमाळा दि.२९ मार्च-**

शेळके वस्ती दहिगाव जिल्हा परिषद शाळा तालुका करमाळा येथील शाळेची शैक्षणिक सहल सयाजी राजे वॉटर पार्क अकलूज या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. शिवसृष्टी वॉटर पार्कचा आनंद लुटत विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेतला. त्यानंतर ॲडव्हेंचर लँडमधील थरारक अनुभव अनुभवला. याचबरोबर पार्कमध्ये असलेल्या समुद्रामध्ये लाटा कशा निर्माण होतात याची माहिती घेऊन लाटांमध्ये पोहोण्याचा आनंद घेतला. सयाजीराजे पार्क नंतर येथील शिवसृष्टी विद्यार्थ्यांनी पाहिली. त्या ठिकाणी असलेले ऐतिहासिक प्रसंग पाहून विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची ओळख दृढ झाली. शिवसृष्टीमध्ये विद्यार्थ्यांना किल्ल्याची प्रतिकृती, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, राज्याभिषेक सोहळा या गोष्टी पाहिल्या व इतिहासाला उजाळा दिला. अतिशय उत्साही वातावरणात सहलीचे आयोजन व नियोजन पार पडले. विद्यार्थ्यांनी खूप आनंद व मजा घेतली. या सहलीचे नियोजन शाळेतील मुख्याध्यापक दस्तगीर शेख, शाळा समितीचे अध्यक्ष ज्योतिराम पाडुळे यांनी केले या कामी हरिश्चंद्र शेळके, महेश शेळके, नानाजी गलांडे, विठ्ठल पाडुळे, योगेश वाघमोडे, महादेव कोंडलकर या सर्वांचे सहकार्य लाभले.

## निधन वार्ता

### अन्नपूर्णा पायधन



**बार्शी दि.२९ मार्च-**

येथील आतेपूर रोड परिसरातील रहिवासी अन्नपूर्णा सीताराम पायधन (वय ८२) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्यात २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### बाळाबाई पवार



**सोलापूर, दि. २९ मार्च-**

जुळे सोलापूर भागातील बसवराज नीलयनगरातील बाळाबाई आप्पाराव पवार (वय ८५) यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी मोदी हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक पुत्र, सून, नातवंडे, पणतवंडे असा परिवार आहे. कृषी खात्यातील सेवानिवृत्त कार्यालयीन अधीक्षक प्रभाकर पवार यांच्या त्या मातोश्री होत्या.

### हनुमंतु कोटा



**सोलापूर, दि. २९ मार्च-**

कै. हनुमंतु किषणाहरी कोटा वय ८७ वर्षे (रा. भुलाबाई चौक) सोलापूर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. ते सुप्रसिद्ध मूळव्याधीवर उपचार करणारे वैद्य होते. त्यांच्या पश्चात दोन मुले आणि तीन मुली आणि नातवंड असा परिवार आहे. अंत्ययात्रा उद्या ३० मार्च रोजी सकाळी राहत्या घरापासून निघणार आहे.

### सुभाष भोसले



**सोलापूर, दि. २९ मार्च-**

गुरुदेव दुग्धालयाचे मालक सुभाष मुरलीधर भोसले यांचे अल्प आजाराने शुक्रवारी (दि.२८) निधन झाले. मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. चंद्रकांत भोसले यांचे ते थोरले बंधू व माजी नगरसेवक संतोष भोसले यांचे ते वडील होत. त्यांच्या मागे पत्नी, चार मुले, दोन सुना, दहा नातवंडे, भाऊ व भावजय असा परीवार आहे.

# कासेगावात आज होणार वर्षाचा संकल्प

## प्रतिवर्षी गुढीपाडव्याला होते संकल्प बैठक अन पंचांग वाचन

**तभ वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.२९ मार्च -**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथे गेल्या कित्येक वर्षापासून गावातील सर्व मंदीराचे व्यवस्थापनासह अन्य उपक्रमांचा संकल्प दर गुढीपाडव्यादिवशी करण्याची प्रथा आहे. ती आजही सांभाळली जात आहे. त्यानिमित्त उद्या दि.३० मार्च रोजी गुढीपाडव्यादिवशी ग्रामस्थांची ही संकल्प बैठक होत असून यावेळी पंचांगवाचनही होणार आहे.

येथे प्रत्येक वर्षी गुढीपाडव्याला ग्रामस्थांची संकल्पबैठक होते. त्या बैठकीत गावातील प्रत्येक कुटूंबप्रुख आपापल्या ऐपतीनुसार गावातील मंदीराची देखभाल व अन्य खर्चासाठीची वर्गणी जमा करतो. हे लोकवर्गणी जमा करण्याचे काम गुढीपाडव्यादिवशी दुपारी तीन वाजता एका ठिकाणी बसूनच केली जाते. प्रत्येकजण तेथे येऊन आपापल्या स्वेच्छेने वर्गणी जमा करतो. दुपारी तीन ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत जेवढी लोकवर्गणी जमा होते त्यातून पुढील गुढीपाडव्यापर्यंतच्या गावातील मंदीराच्या दिवाबत्तीसह अन्य खर्चाची तरतूद करण्यात येते. ग्रामदैवत महादेव मंदीरात ग्रामस्थांच्या वतीने अखंड नंदादीप असतो. त्यासाठी लागणाऱ्या तेलाचा पुरवठा वर्षभर करण्यासाठी गावातील दुकानदारांना आवाहन केले जाते.

यावेळी हजर असलेले किराणा दुकानदार हा तेलाचा पुरवठा करण्यासाठी लिलाव पध्दतीने बोली बोलतात. जो सर्वात कमी दराची बोली बोलेल त्यास हे तेल पुरवठ्याचे काम दिले जाते. गावातील अन्य मंदीरामध्ये विठ्ठलरूक्मीणी मंदीर, खंडोबा मंदीर याबाबतची चर्चा व नविन काही करण्याबाबतचा विचार या बैठकीत केला जातो. त्यानुसार ग्रामस्थांची एकमुखी संमती मिळाल्यास त्याची अंमलबजावणी करण्याचा संकल्प केला जातो.

त्यानंतर गावातील प्रमुख मान्यवराच्या हस्ते पंचागाचे पूजन केले जाते अन मुख्य पुरोहीताकडून पंचांगवाचन केले जाते. पाऊस कोणाच्या घरी आहे याची उत्सुकता सर्वांनाच असते.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून परिचारक कुटुंबियांचे सांत्वन

**पंढरपूर, दि.२९ मार्च-**

माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे वडील प्रभाकर परिचारक यांचे दोन महिन्यापूर्वी वृद्धपकाळाने निधन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.२९) प्रशांत परिचारक यांच्या पंढरपूर येथील निवासस्थानी त्यांची व कुटुंबियाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी दिवंगत सुधाकरपंत व दिवंगत प्रभाकरपंत यांना त्यांनी अभिवादन केले. पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार प्रशांत परिचारक, उमेश परिचारक आदी उपस्थित होते.

# रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२९ मार्च -**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रयत माउली कै. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९५ व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

समारंभ समिती व सांस्कृतिक समितीच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून माजी सचिव तथा सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. अशोक भोईटे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने होते. यावेळी संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य ज्योतिराम भायगुडे, डॉ. राजेंद्र जाधव, डॉ. तुकाराम अनंतकवळस, डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. अनिल चोपडे, पर्यवेक्षक विठ्ठल काटकर आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. माने यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रास्ताविक डॉ. रमेश शिंदे यांनी केले. डॉ. अमर कांबळे व प्रा. सारिका भांगे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी आभार मानले.



# अमन काझी याचा पहिला रोजा

**टेंभुर्णी, दि.२९ मार्च -**



टेंभुर्णी पासून जवळच असलेल्या काझीवस्ती येथील काझी परिवारातील अमन असिफ काझी याने स्वइच्छेने रोजा धरुन तो पुर्ण केला. पहाटे ५ वाजून ९ मिनिटाला सहेरी पुर्ण करुन पुर्ण दिवस अन्नपाणी त्याग करुन सायंकाळी ६ वाजून ४५ मिनिटांनी रोजा सोडला. तब्बल १३ तास उपवासाचे पालन केले व रोजा सोडताना आपल्या नावाप्रमाणेच अमन ने अल्लाह ला दुआ केली आपल्या देशात अमन आणि शांती कायम नांदत राहो यामुळे सर्व स्तरातून त्याचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



# मंद्रुप पोलीस ठाण्यात इफ्तार पार्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च,**

मंद्रुप पोलीस ठाणे हद्दीतील हिंदु मुस्लीम बांधवांसाठी मंद्रुप पोलीस ठाणे येथे इप्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस उपनिरीक्षक राजु डांगे, माजी सरपंच बक्षुभाई मुल्ला, नजीर आवटे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे, ग्रामपंचायत सदस्य यासीन मकानदार, सुधाकर कोरे, सामाजिक कार्यकर्ते सचिन फडतरे, अनमोल केवटे, निरंजन ख्याडे, संदिप मेंडगुदले, आसिफ शेख, बरूरचे अकिल कुडले, महमद शेख, उस्मान नदाफ, पोलीस पाटील आदि उपस्थित होते. हिंदु मुस्लीम बांधवांमध्ये एकता कायम अबाधित राहावे, तसेच सर्व समाजबांधव सुखा समाधानाने जगावे, यासाठी इप्तार पार्टीचे आयोजन केल्याचे सपोनि मनोज पवार यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश पाटील, सागर चव्हाण, महांतेश मुळजे, संदिप काळे, सचिन मसलखांब, माजिद शेख आदिंनी परीश्रम घेतले.

# मोडनिंब येथील शिबिरात १५१ जणांचे रक्तदान

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब,दि.२९ मार्च -**

मोंडनिंब (ता.माढा) येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त आणि कै. मंगल उर्फ शिवाजी पाटील यांच्या स्मरणार्थ यमाई देवी ट्रस्ट यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिबिरात १५१ दात्यांनी रक्तदान केले.

उन्हाळ्यात रक्तदान शिबीरांच संख्या कमी असते व रुग्णांना रक्ताची गरज अधिक प्रमाणात भासते. हीच गरज लक्षात घेऊन यमाई ट्रस्टकडून दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील यांनी दिली. सदर शिबिराचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आले. प्रत्येक रक्तदात्यास भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देण्यात आले.छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे युवा कीर्तनकार किरण सुरवसे यांची कीर्तन सेवा झाली. यावेळी आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार धनाजी साठे,शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय कोकाटे,जि.प. सदस्य भारत शिंदे,भाजप नेते योगेश पाटील, नागनाथ ओहोळ, कैलास तोडकरी, नागनाथ ओहोळ, जयसिंह पाटील,मोडनिंब आउट पोस्टचे देवकर, आवताडे, अत्तार आदी उपस्थित होते.

# युगपुरुष डॉ. हेडगेवार



१ एप्रिल १९८९, वर्षप्रतिपदेच्या दिवशी बळीराम आणि रेवती हेडगेवार यांचे पोटी एक युगपुरुष जन्माला आला. त्याचे नाव केशव बळीराम हेडगेवार. हेडगेवार घराण्याचे मूळ गाव तेलंगणातील वंजरा, हरिद्रा आणि गोदावरी नद्यांच्या त्रिवेणी संगमावर असलेले कुंदकुर्ती गाव! संस्कृत विद्येची परंपरा असलेले हे घराणे केशवचे पणजोबा सन १८०० साली कुंदकुर्तीहून नागपूरला घेऊन आले. घरची गरिबी होती. केशवचे वडील पौरोहित्य करीत. केशव हाडापेराने मजबूत व दणकट, ऊंचापुरा होता. भरपूर व्यायाम, कुस्ती खेळणे या केशवच्या आवडत्या गोष्टी होत्या.

केशवचे शिक्षण नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलमध्ये सुरू झाले. तो १८९७-९८ चा सुमार होता. लोकमान्य टिळक युगाचा प्रारंभ झाला होता. केशव टिळकांचा केसरी नियमित वाचत असे. मातृभूमीविषयी प्रेम आणि परकीय इंग्रजांबद्दलचा राग केशवच्या मनात वयाच्या आठव्या वर्षीच एवढा दृढमूल होता, की तो देशभक्ती जन्माला येतानाच घेऊन आला असे वाटावे. त्यातूनच व्हिक्टोरिया राणीच्या वाढदिवसानिमित्त दिलेला प्रसाद न खाणे, नागपूरच्या सीताबर्डीच्या किल्ल्यावरील युनियन जॅक काढण्यासाठी भुयार खोदून तेथपर्यंत जाऊन तो झेंडा काढून भगवा प्रतिष्ठित करण्याची कल्पना करणे व ते कामही सुरू करणे या गोष्टी त्याच्या हातून घडत गेल्या. वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी केशवचे डोक्यावरील आई-वडिलांचे छत्र प्लेगच्या साथीने हिरावून घेतले. गरिबीने केशवच्या घरात बस्तान बांधले. पण त्याही परिस्थितीत केशवने मित्रमंडळींच्या आधाराने आपले शिक्षण चालू ठेवले. टिळकांचे अनुयायी डॉ. मुंजे यांच्या सहवासात केशव आला. त्यांच्या आधाराने आणि सहवासाने केशवच्या देशभक्तीला प्रत्यक्ष कृतीचे रूप प्राप्त झाले. केशवचे काका आबाजी यांचे केशवकडे लक्ष असे. त्यांच्या मनातील देशभक्ती कार्यस्वरूपाने ते केशवमध्ये पहात असत. त्यासाठी त्यांना त्यांच्या सरकारी नोकरीचा राजीनामा द्यावा लागला.

सन १९१० मध्ये केशवने कलकत्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तिथे त्याचा संबंध नारायण दामोदर सावरकरांशी आला आणि क्रांतिकार्याकडे केशव आकर्षित झाला. हे सर्व चालू असतानाच ९ जुलै १९१५ ला केशव डॉक्टर झाला. अनेक चळवळी, ब्रिटिश सरकारच्या विरोधात काम करतानाच आपले सर्व जीवन देशसेवेसाठी वाहून टाकण्याचा निर्णय डॉक्टर केशव यांनी घेतला.

कलकत्याहून नागपूरला परतल्यावरही डॉक्टर क्रांतिकार्यात कार्यरत होते. त्याचबरोबर काँग्रेसच्या राजकारणाकडेही त्यांचे लक्ष होते. क्रांतिकार्यातून फार साध्य होणार नाही हे डॉक्टरांच्या लक्षात आले. डॉ. मुंजे आणि टिळकांचा आदर्श यामुळे ते काँग्रेसमध्ये सहभागी होऊ लागले. नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात केलेल्या कामाची प्रशंसा झाली. टिळकांनंतर गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा प्रवास सुरू झाला. असहकार आंदोलनात डॉक्टरांनी भाग घेतला, व्याख्याने दिली. ज्वलंत ध्येयवादाचे तेज त्यांच्या भाषणात उमटणे स्वाभाविकच होते. त्यामुळे इंग्रजांचे लक्ष डॉक्टरांकडे गेले. १९२१ मध्ये जिल्हाधिकार्यांनी डॉ. हेडगेवारांनी भाषणे करू नयेत असा निर्बंध घातला. डॉक्टर तो मानणे शक्यच नव्हते. अखेर त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांना जामीन आणि एक हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर लिहून देण्याचा निर्णय न्यायालयाने दिला, तो त्यांनी न मानल्यामुळे एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा दिली. १९२३ मध्ये डॉक्टरांची नियुक्ती प्रांतिक काँग्रेसच्या संयुक्त कार्यवाह पदावर झाली. पण कार्यातील आणि कार्यकर्त्यातील समन्वयाचा अभाव डॉक्टरांना स्पष्ट दिसत होता. हिंसाचार आणि खिलाफत चळवळ यामुळे त्यांचे मन वेगळाच विचार करू लागले. हिंदूंवर होणारे अत्याचार त्यांना अस्वस्थ करू लागले. अनेकांबरोबर झालेल्या चर्चा, विचारविनिमयातून काहीतरी वेगळे करण्याचा डॉक्टरांचा दृढनिश्चय झाला.

आणि १९२५ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर घरी गोळा झालेल्या १५-१६ मित्रांच्या मेळाव्यात त्यांच्या संकल्पाला त्यांनी वाचा फोडली आणि अतिशय शांत स्वरात डॉक्टरांनी ५-६ शब्द उच्चारले, 'आपण आज संघ सुरू करीत आहोत.' नागपूरच्या मोहिते वाड्यात शाखा सुरू झाली. सोपा मंत्र दिला गेला आणि 'नित्य देशभक्तीची भावना हिंदुमनात निर्माण होणे ही हिंदुसंघटनेसाठीची गरज' ही गोष्ट अधोरेखित केली गेली. अनेक माणसे जोडली गेली. मित्रमंडळींना विविध प्रांतात शिक्षणासाठी पाठविण्याचा अभिनव कार्यक्रम राबविला गेला. त्यातून संघाच्या शाखा वाढत गेल्या. कार्यक्रम, शिबिरे, दैनंदिन शाखांवरचे साधे साधे खेळ यातून 'संघटन में शक्ती है।' हे दिसू लागले. संस्कारक्षम तरूण पिढी संघ शाखेवर तयार होत होती. आतापर्यंत न जाणवणारे हिंदुंचे अस्तित्व जाणवू लागले होते. डॉक्टरांना गुरुस्थानी मानणारे अनेक असले तरी त्यांनी भगवा ध्वज हा आपला गुरू असे सांगितले. त्यातूनच व्यक्तिनिरपेक्षता, प्रसिद्धीपराङ्मुखता आणि निस्पृहता ही संघ कार्याला चिरस्थायी आणि विजिगिषु देणारी पाथेय जन्माला आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ टिकला, वाढला, विश्वव्यापी झाला त्याचे कारण ते आहे. १९३७ ला वर्ध्यात शिबिर भरले होते. समोरच महात्मा गांधीजींचा आश्रम होता. गांधीजींनी शिबिराला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. मा. अप्पाजी जोशी तिथे होते. पंधराशे स्वयंसेवकांच्या शिबिरास गांधीजींनी भेट दिली. त्यांना मानवंदना दिली गेली. त्यामुळे प्रभावित झालेले गांधीजी अप्पाजींना म्हणाले, 'मी खरोखरीच प्रसन्न झालो आहे. उभ्या देशात असे प्रभावी दृश्य मी आजवर कधी पाहिले नाही.' त्यानंतर त्यांनी डॉक्टरांची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. दुसऱ्या दिवशी डॉक्टर त्या शिबिरात येणार होते. त्यांना गांधीजींनी आपले नित्य कार्यक्रम बदलून रात्री साडेआठची वेळ दिली. अण्णासाहेब भोपटकर, अप्पाजी जोशी यांच्या समवेत डॉक्टर महात्मजींच्या आश्रमात गेले. संघाची शिस्त, व्यवस्थितपणा, स्वयंसेवकांची एकूण वृत्ती, घोष आवडल्याचे गांधीजींनी डॉक्टरांना सांगितले आणि दोघांमधील संवाद सुरू झाला. डॉक्टर आणि अप्पाजी काँग्रेसमध्ये होते, हे गांधीजींना माहीत होते. त्यांनी थेट प्रश्न केला, 'तुम्ही दोघे काँग्रेसमध्ये होता, मग तेथे अशी संघटना का उभी केली नाही? त्यावर डॉक्टर म्हणाले, प्रयत्न केला, पण तेथील नेत्यांची स्वयंसेवकांकडे पाहण्याची दृष्टी हे केवळ आपण सांगू ते काम करणारा अशी असते. ती आम्हाला योग्य वाटली नाही.' त्यावर ''मग तुमची दृष्टी काय आहे?' असे गांधीजींनी विचारल्यावर डॉक्टर म्हणाले, 'देशाच्या प्रगतीसाठी स्वयंप्रेरणेने त्यागपूर्वक काम करणारा तो स्वयंसेवक आणि असे सारे स्वयंसेवक परस्परांशी समान होत, अशी आमची दृष्टी आहे.' गांधीजींबरोबर जमनालाल बजाज होते. ते अनेक संस्थांना आर्थिक मदत करत असत. तशीच संघालाही होत असेल असे गांधीजींना वाटले, तसे ते म्हटल्यावर डॉक्टर म्हणाले- 'आम्ही कोणाकडून अर्थसाहाय्य घेत नाही.' मग सारा खर्च कसा चालतो हे गांधीजींनी विचारल्यावर, ''आपल्या इच्छेनुसार गुरुदक्षिणेच्या रूपाने स्वयंसेवक ध्वजापुढे पैसे ठेवतात आणि संघाचे काम चालते.' हे ऐकल्यावर महात्माजी थक्क झाले, ते म्हणाले, ''हे खरोखरीच विलक्षण आहे, मग तुम्ही कोणी देणगी दिली तर घेणार नाही?' डॉक्टर म्हणाले, 'जेव्हा समाजाला हे काम पटेल, तेव्हा तो आपण होऊन पैशाच्या राशी ओतेल, आम्हाला मागावे लागणार नाही. पण आम्ही संघाची कार्यपद्धती स्वावलंबी ठेवली आहे.''

गांधीजींना आणखी दोन धक्के बसावयाचे होते. त्यांनी डॉक्टरांना विचारले- 'या कामासाठी तुम्हाला बराच वेळ द्यावा लागत असेल. मग आपला व्यवसाय करणे तुम्हाला कसे जमते?' त्यावर डॉक्टरांनी सांगितले, 'मी व्यवसाय करीत नाही.' मग तुमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालतो, असे गांधीजींनी विचारल्यावर ते उत्तरले,''मी विवाह केलेला नाही.'' हे ऐकून गांधीजी चकित झाले आणि एवढ्या थोड्या काळात ते काम वाढले याचे मर्म त्यांच्या ध्यानात आले आणि भेट संपली. डॉक्टर आणि गांधीजी यांच्या या संवादातून संघकार्याची, त्याच्या ध्येयाची स्पष्ट कल्पना येते. डॉक्टर हेडगेवार युगपुरूष होते. त्यांनी जोडलेली माणसे संघानुकूल जीवन समर्पित करणारी होती. डॉक्टरांचे उत्तराधिकारी त्यांनी निवडले, ते सरसंघचालक श्री. माधव सदाशिव गोळवलकर यांची निवड सुद्धा विलक्षण होती. नागपूरच्या संघशिक्षा वर्गात सर्व प्रांतातून शिक्षार्थी आले होते. तब्बेत अतिशय खराब असुनही डॉक्टरांचे ते शेवटचे भाषण हृदयद्रावक, संघटनेची दिशा देणारे आणि मी आज हिंदुराष्ट्राचे छोटे स्वरूप पहात आहे, हे त्यांचे स्वप्न स्वयंसेवकांच्या गळी उतरवणारे होते. तेच त्यांचे शेवटचे संबोधन, ते दिल्यानंतर काही दिवसातच दि. २१ जून १९४० रोजी हा संघयुगाचा शालिवाहन अनंताच्या प्रवासाला निघून गेला. हे वर्ष संघाचे शताब्दी वर्ष आहे. सर्वत्र हिंदुत्वाचा जागर होत आहे. विश्वव्यापी संघाचे काम कार्यकर्त्यांच्या, प्रचारकांच्या आणि स्वयंसेवकांच्या अथक परिश्रमाने पुढे चालत आहे. चालत राहील आणि ध्येयापर्यंत पोहोचेल. संघनिर्मात्याचा त्याग, परिश्रम एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे दिशा देत राहतील यात शंका नाही. डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे हिंदुस्थानचे भवितव्य बदलणार्या एका महान युगपुरूषाचे नाव आहे.

**- रवींद्र घाटपांडे,**
**९५५२५७९८११**

# गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला साखरेचे हार महागले

### बाजारात पसरले तेजीचे वातावरण

### आवक घटल्याने साखरेच्या हाराचे दर पोहोचले १६० ते १८० रुपये किलो

### खोबऱ्याच्या हारांचे दर २०० ते २५० रुपये किलो

### श्रीफळ ५० रुपयाला नग



सोलापूर : गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला टिळक चौक बाजारपेठेत साखरेचे हार खरेदी करताना ग्राहक.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च-**

सनातन वैदिक हिंदू धर्मातील नव वर्षाच्या स्वागताला आनंदाची मांगल्याची गुढी उभारली जाते. त्या गुढीला भरजरी साडी नेसवून साखरेचे हार परिधान केले जातात. त्याच गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला बाजारपेठेत साखरेचे हार तेजीत होते. साखरेच्या हारांचे दर १०० ते १२० रुपयांवरून १६० ते १८० रुपये किलो पर्यंत पोहोचले आहेत. आवक घटल्याने दर तेजीत आल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

दरम्यान, हिंदू नववर्षाचे स्वागत गुढीपाडवा या साडेतीन शुभमुहूर्तापैकी एक असणाऱ्या सणाने होते. या सणाची हिंदू सम ाज बांधव वर्षभर आतुरतेने वाट पाहतात. पहाटे सूर्योदयाच्या वेळी मंगल्याची गुढी उभारली जाते. त्या गुढीला रेशमी भरजरी वस्त्र अथवा साडी परिधान केले जाते. त्यावर कडुलिंबाचा पाला साखरेचे हार पुष्पहार लावले जातात. मंत्रोच्चाराच्या घोषामध्ये सदरची गुढी उभारून आशीर्वाद घेतले जातात. वर्षानुवर्षेही परंपरा सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये चालत आलेली आहे. याच दिवसापासून मराठी तसेच हिंदू नववर्षाचा प्रारंभ होतो. या सणानिमित्त गेल्या आठ दिवसांपासून शहराच्या मध्यवर्ती टिळक चौक व मधला मारुती बाजारपेठेत साखरेचे आणि खोबऱ्याचे हार विक्रीसाठी दाखल झालेले आहेत. गत म हिन्याभरापासून साखरेच्या हाराची निर्मिती शहरातील भुईगल्ली येथे केली जाते. भट्टीच्या मध्यमातून साखरेच्या पाकापासून हार निर्मिती होते. सोलापूर शहर जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यातून देखील साखरेच्या हारांना मागणी असते. एक क्विंटल साखरेच्या पोत्यापासून सुमारे ८० किलो साखरेच्या हारांची निर्मिती होते. साधारणपणे २० किलो साखरेची तूट होते. यंदाच्या वर्षी साखरेचे हारांचे उत्पादन आणि आवक कमी प्रम ाणात असल्याने दर आता तेजीत आलेले दिसत आहेत. यापूर्वी हारांचे घाऊक दर शंभर रुपये याप्रमाणे होते. आता त्यामध्ये वाढ झालेली असल्याने किरकोळ दरामध्ये देखील वाढ झालेली आढळून येत आहे.

#### अमावस्यानिमित्त श्रीफळची मागणी

नववर्षाचे स्वागत आला ज्याप्रमाणे साखरेचे हार आवश्यक असतात त्याचप्रमाणे श्रीफळ देखील गरजेचे असतात. श्रीफळ वाढवून नवीन वर्षाचे मोठ्या उत्साहात आणि आनंदात स्वागत केले जाते. यंदाच्या वर्षी श्रीफळाच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. उच्च प्रतीचा श्रीफळ सुमारे ५० ते ६० रुपयांना एक नग याप्रमाणे विक्री केला जात आहे. दुय्यम प्रतीचा श्रीफळ ३० ते ४० रुपये याप्रमाणे विक्री केला जात आहे. अमावस्या तसेच गुढीपाडवा या निमित्ताने नागरिकांमधून श्रीफळाची मागणी वाढत आहे. मागणी वाढल्याने दरात तेजी निर्माण झालेली आहे.

#### दर तेजीत असल्याने खरेदी कमी प्रमाणात

यापूर्वी साखरेचे हार ८० ते १०० रुपये प्रति किलोपर्यंत विक्री होत असे. तेव्हा मोठ्या प्रमाणात साखरेचे हारांची खरेदी केली जात असे. परंतु दिवसेंदिवस दरामध्ये वाढ होत असल्याने, यापूर्वी दोन किलो साखरेचे हार घेणारा ग्राहक आता अर्धा किलो किंवा एक किलो साखरेचे हार खरेदी करत आहे. दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने, खरेदी कमी प्रमाणात होत आहे.

**-महेश वाघमारे, ग्राहक**

#### हारांचे उत्पादन आणि आवक कमी झाल्याने दरात वाढ

गुढीपाडवा सणाला साखरेचे हार व खोबऱ्यांचे हार यांचे सर्वाधिक महत्त्व आहे. गुढीला तसेच चिमुकल्या बालगोपाळांना आणि पाहुण्यांना हार दिले जातात. त्यामुळे ग्राहक मोठ्या प्रमाणात हारांची खरेदी करत असतात. देवाला देखील साखरेचे हार अर्पण करतात. परंतु यंदाच्या वर्षी उत्पादन आणि आवक कमी झाल्याने दर वाढलेले आहेत. १२० रुपये एक किलो प्रमाणे विकले जाणारे हार १६० ते १८० रुपयापर्यंत पोहोचलेले आहेत. तसेच खोबऱ्याचे हार देखील दोनशे रुपये किलो याप्रमाणे विक्री केले जात आहेत. कच्चामाल तसेच आवक याच्यामुळे दरावर परिणाम झालेला आहे.

**- भारत मंठाळकर, विक्रेते**




# मंद्रुपमध्ये गुडीपाडव्याला गूळ वाटण्याची प्रथा

## नवस पूर्ण झाल्याने गोड प्रसाद म्हणून गुळाला पसंती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**



गुढीपाडवा हिंदू नववर्ष म्हणून साजरा करण्यात येत असल्यामुळे यावेळी शेतकरी बांधवांकडून पुढील वर्षी शेतात उत्तम पीक पाणी येऊ दे तसेच शेतीमध्ये भरभराटी होऊ दे अशा प्रकारची मागणी व नवस करण्यात येतो. गुडी पाडवापासून शेतीमध्ये मशागतीची कामे करण्यास सुरूवात करण्यात येते. त्यामुळे मशागत सुरू करण्याअगोदर शेतातील पीक चांगल्या प्रकारे येण्यासाठी मळसिध्द देवाच्या चरणी नवस करण्यात येतो. वर्षभर शेतीतील धान्य नवस केल्याप्रमाणे आल्यामुळे गुढी पाडव्याला पुजारी, भक्त व गावकऱ्यांना गोड म्हणून गूळ वाटण्यात येतो. ज्या शेतकरी व भक्तांचे नवस पूर्ण झाले आहेत अशा भक्तांकडून गुढी पाडव्या दिवशी गुळ वाटण्यात येतो. शिवाय गूळबरोबर साखर, खडीसाखर व नारळही वाटण्याची प्रथा आहे. गुढी पाडव्या दिवशी मळसिद्ध मंदिर येथे शेकडो किलो गुळ वाटप केला जातो. तर मंदिरासमोर हजारो नारळ फोडून नवस पूर्ण करण्यात येतो. ही प्रथा अनेक वर्षापासून सुरू असल्याचे सांगण्यात येते. मात्र दुसरीकडे ऐन उन्हाळ्यात गुढीपाडवा येत असल्यामुळे व ऊन्हात शरीरामध्ये साखरेचे प्रमाण कमी असल्यामुळे व उष्णतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे गुळ खाल्ल्यानंतर शास्त्रीय दृष्ट्या शरीराचे तापमान नियंत्रित राहते. त्यामुळेही गुळ वाटण्यात येतो.

#### नारळ फोडूनही नवस पूर्ण करतात

मळसिध्द देवाकडे शेतकरी व भक्तांकडून शेतातील उत्तम पीकपाणीसह अनेक नवस मागण्यात येते. गुडी पाडव्याला मागितलेले नवस पूर्ण झाल्यानंतर पुढच्या गुडी पाडव्याला पुजाऱ्यांसह भक्तांना गोड प्रसाद म्हणून गूळ वाटण्यात येते. शिवाय अनेक भक्त मंदिरासमोर नारळ फोडूनही नवस पूर्ण करतात.


**- मळसिध्द पूजारी, सचिव, मळसिध्द देवस्थान कमिटी मंद्रुप**















# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





**सोलापूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विमानतळावर शनिवारी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, माजी खासदार जयसिद्धेश्वर महास्वामी, महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त दिपाली काळे, विजय कबाडे, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, शहर अध्यक्ष नरेंद काळे यांनी स्वागत केले. त्यानंतर ते हेलिकॉप्टरने तुळजापूर येथील कार्यक्रमासाठी रवाना झाले.**



## ▶▶ क्राईम वृत्त...

### माढा येथे महिलेस सर्पदंश

**सोलापूर, दि. २९ मार्च -**

माढा येथे राहत्या घरी महिलेस सापाने दंश केला. हा प्रकार २८ मार्च रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडला.कलावती औदुंबर जाधव (वय ४०) असे सर्पदंश झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना त्रास होऊ लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचा करून सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकीच्या धडकेत एसटीतील प्रवासी जखमी

**सोलापूर, दि. २९ मार्च -**

तुळजापूर रोडवरील ऑर्किड कॉलेजच्या समोरील पुलाजवळ एस.टी.मधून उतरताना अज्ञात दुचाकीस्वाराने धडक दिल्याने प्रवासी जखमी झाला. हा अपघात २८ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता घडला.भूषण शहाजी दळवी (वय २० रा. मसला खुर्द ता. तुळजापूर) असे जखमीचे नाव आहे. भूषण दळवी याला उपचारासाठी मदतनीस महंमद पठाण यांनी शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### यावलीत तरूणास अडवून बेदम मारहाण

**सोलापूर, दि. २९ मार्च -**

मोहोळ तालुक्यातील यावली येथे दुचाकीवरून जाताना, तिघांनी आडवून हाताने व चप्पलने मारहाण केल्याने तरूण जखमी झाला. ही मारहाण २६ मार्च रोजी सायंकाळी ४.४५ वाजता झाली.प्रशांत दत्तात्रय जाधव (वय ३१ रा. यावली) असे जखमी तरूणाचे नाव आहे. प्रशांत जाधव याला मोहोळ येथील सरकारी रुंग्णालयातून सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरून तरूण जखमी

**सोलापूर, दि. २९ मार्च -**

चिकली फाटा ते सारोळा (ब्रु) असे दुचाकीवरून जाताना, दारफळ पाटी येथे दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरूण जखमी झाला. हा अपघात २७ मार्च रोजी रात्री १०.३० वाजता घडला.अजय अनिल परीट (वय २६ रा. सगोळा जि. धाराशिव) असे तरुणाचे नाव आहे. अजयवर धाराशिव येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ श्रीशैल परिट यांनी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# कामगारांना मिळणार हक्काचे घर

## प्रधानमंत्री आवास निर्माण योजना; राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण संस्थेचा पुढाकार

### ५ हजारपैकी १ हजार घरकुलाचे लवकरच होणार हस्तांतरण

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च**

प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंतर्गत मोजे दहीटणे येथे राष्ट्रतेज अटल बिहारी वाजपेयी कामगार गृहनिमिण संस्थेच्या ५ हजार घरकुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या ५ हजार घरकुलांपैकी १ हजार घरकुलांचे हस्तांतरण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांनी सांगितले. यावेळी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन सुरेश बिराजदार, पंधे कन्स्ट्रक्शनचे अंकुर पंधे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, माजी नगरसेवक अमर पुदाले, अभियंता महिंद्रकर, राजेश दीड्डी आदींची उपस्थिती होती.

१४ लाख लोकसंख्या असलेल्या या शहरामध्ये ४० ते ५० टक्के लोकसंख्या ही विविध क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटीत कामगारांची आहे. हा कामगार वर्ग मिळेल त्या मोकळ्या जागेत पत्र्याचे शेड मारून किंवा झोपडीत राहून आपला उदरनिर्वाह करीत असतो. त्यामुळे त्यांच्यासाठी दिवसेंदिवस योग्य त्या मुलभूत सोयी सुविधांचा प्रश्न निर्माण होऊ लागलेला आहे. नेमकी हीच समस्या जाणून सोलापूर शहर उत्तरचे आ. विजयकुमार देशमुख यांनी पुढाकार घेत, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' अंतर्गत या कामगार वर्गासाठी ५००० घरकुल उभारणीचा संकल्प मांडला. लागलीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असंघटीत कामगारांच्या उन्नतीकरिता व त्यांचे राहणीमान उंचाविण्याकरिता या संकल्पनेला लगेचच हिरवा कंदील दाखवला व या कार्यासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल आणि असंघटीत कामगारांकरिता सर्व मुलभूत सोयींनीयुक्त असे एक चांगले गृहसंकुल उभारले जाईल असे आश्वासन दिले.

सुरेश रेवप्पा बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाल 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)' अंतर्गत सोलापुरातील असंघटीत कामगारांकरिता राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, दहिटणे, ता-उत्तर सोलापूर या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून सोलापुरातील असंघटीत क्षेत्रात काम करणारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ई. डब्ल्यू. एस) कामगार जसे कि, रिक्षा चालक, शिलाई कामगार, यंत्रमाग कामगार, अडत कामगार, माथाडी कामगार, हॉटेल कामगार, भाजीपाला विक्रेते, रुग्णालयातील कर्मचारी, बांधकाम क्षेत्रातील कामगार, इतर व्यावसायिक दुकानात काम करणारे व अन्य गरजू कामगार वर्गासाठी ५००० घरांच्या बांधणीचे उद्दिष्ट प्रस्तावित करण्यात आले. समाजातील वंचित घटकांना अल्प किमतीत घरे उपलब्ध व्हावीत म्हणून ग्रीन झोन असलेल्या जमिनी प्रधानमंत्री आवास योजनेकरिता वापरण्याची परवानगी दिली. त्याअनुषंगाने सदर संस्थेच्या माध्यमातून सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विकसित होत असलेल्या दहिटणे परिसरामध्ये जागा घेण्यात आली. १५ ते २० वर्षापूर्वीचा शेळगी-दहिटणे परिसर व आताचा विकसित शेळगी-दहिटणे परिसर, हे सर्व परिवर्तन आ.देशमुख यांच्याळेच घडल्याचे दिसत आहे.

### ग्रीन झोनमुळे अल्प किंमतीत घरकुल निर्मिती

गोरगरीब कामगारही या परिवर्तनाचे अंग व्हावे या तळमळीने राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेची स्थापना झाली. ग्रीन झोन असल्यामुळे सदर परिसरामध्ये अल्प किंमतीत घरकुल प्रकल्पासाठी जागा उपलब्ध झाल्यामुळे संस्थेस घरकुलाची किंमत कमीतकमी राखण्यास बहुमोल मदत झाली. तसेच बांधकाम कामगारांना विशेष अनुदान दोन लक्ष रुपये प्राप्त करून दिल्यामुळे घरांच्या किमती आणखी कमी झाल्या.

**- अंकुर पंदे, विकासक राष्ट्रतेज कामगार गृहनिर्माण संस्था.**

### नगरोत्थान योजना आणि बँकेच्या सहकार्यातून कामगारांना मदत

गृहप्रकल्पामधील एका घरकुलाची किंमत ही ६.२१ लाख अशी आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना रु. २.५ लाख सबसिडी मिळाल्यानंतर सर्वसाधारण घटकातील जनतेला हे घरकुल रु.३.७१ लाख किमतीमध्ये उपलब्ध असेल. कल्याणकारी मंडळाकडून अतिरिक्त प्रत्येकी रु.२.०० लाखाच्या सबसिडीस पात्र ठरल्यास हे घरकुल त्या सभासदांना फक्त रु.१.७१ लाख मध्ये उपलब्ध होते. तसेच, कामगारांना घरकुलासाठी सोलापूर जनता बँकेकडून अत्यल्प व्याजदरामध्ये गृहकर्ज उपलब्ध करून सुलभ मासिक हप्त्यात परतफेडीची सुविधाही करून दिलेली आहे.

**- डॉ किरण देशमुख, माजी नगरसेवक**

# देवगड हापूस आंब्यावर आता युनिक आयडी कोड

### बनावट आंब्याची विक्री रोखण्यासाठी पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च-**

देवगड हापूस आंब्याच्या नावाने होणारी तोतयागिरी आणि बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे.या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर टॅपर प्रूफ युआयडी सील (टीपी सील युआयडी ) सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती महेश धाराशिवकर आणि शशी थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देवगड अल्फोन्सो (हापूस) आंब्याच्या नावाने बाजारात होणारी तोतयागिरी आणि बनावट आंब्यांची विक्री रोखण्यासाठी हापूस (अल्फोन्सो) च्या भौगोलिक संकेत (जीआय) टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर असलेल्या देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने या वर्षीपासून प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर टॅपर प्रूफ युआयडी सील सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता प्रत्येक अस्सल देवगड हापूस आंब्यावर हा खास स्टिकर लावणे बंधनकारक असेल आणि असे युआयडी असलेले आंबेच देवगड हापूस किंवा देवगड अल्फोन्सों म्हणून विक्री किंवा विपणन करता येणार आहे. या उपक्रमामुळे देवगड हापूसच्या नावाखाली सर्रास होणारी बनावट आंब्यांची विक्री पूर्णतः बंद होतील आणि ग्राहकांना केवळ जीआय प्रमाणित, अस्सल देवगड हापूस आंबेच मिळतील असा संस्थेचा विश्वास आहे.

# घरफोड्या करणाऱ्या आंतरराज्य गुन्हेगारास अटक

### ११० ग्रॅम सोन्याचे व ११३ ग्रॅम चांदीचे दागिने हस्तगत

### शहर गुन्हे शाखेची कारवाई; दोन गुन्हे उघडकीस




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ मार्च -**

दिवसा घरफोड्या करणाऱ्या आंतरराज्य गुन्हेगारास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडून त्याच्याकडून घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. या गुन्हेगाराकडून पोलिसांनी ११० ग्रॅम सोन्याचे व ११३ ग्रॅम चांदीचे दागिने असा ९ लाख रुपये किंमतीचा ऐवज जप्त केला आहे.

अनिलकुमार मिस्त्रीलाल राजभर (वय ३८, रा. बोदरी, ता. केराकत, जि. जौनपूर, उत्तर प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. त्याच्याकडून जेलरोड पोलिस ठाणे व सिन्नर पोलिस ठाण्यातील गुन्हा उघडकीस आला आहे. राजभर याच्याविरुध्द गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये दिवसा घरफोडीचे ३५ गुन्हे दाखल आहेत.

१० मार्चला जि.प.चे शिक्षणाधिकारी कादर राजूमियाँ शेख (रा. फ्लॅट नं. ६०२, सेंटर पार्क अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांच्या बंद घराचा दरवाजा तोडून चोरट्याने १० तोळे सोन्याचे तर १० तोळे चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला होता. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर गुन्हे शाखेने राजभरकडून हॉटेल ॲम्बेसेटर ते प्रभाकर महाराज मंदीर रोडवरील युनिटी अपार्टमेंटजवळ घरफोडीच्या साहित्यासह सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले असून त्याच्याकडून सिन्नर घरफोडीचा गुन्हा देखील उघडकीस आला आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त एम.राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, स.आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली स. पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर, अमंलदार विजयकुमार वाळके, संदीप जावळ, विनोद रजपूत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवा, वसीम शेख, इब्राहीम शेख, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे, आकाश घोलकर, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

# रमजान ईदनिमित ईदगाह मैदान सज्ज





### महापालिकेच्या वतीने मैदान सपाटीकरण, स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च**

मुस्लिम बांधवांचा प्रमुख आणि महत्त्वाचा सण रमजान ईद सोमवारी देशभरात साजरा होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील रंगभवन ईदगाह मैदान येथे महापालिकेच्या वतीने अंतिम टप्प्यातील सर्व तयारी पूर्ण करण्यात आली. ईदगाह मैदानाचे स्वच्छता करण्यात आली, तसेच रोडरोलरच्या माध्यमातून मैदानाचे सपाटीकरण करण्यात आले.

शहरातील पाच ईदगाह मैदानावर मुस्लीम बांधवांकडून रमजान ईदची नमाज पठण करण्यात येते. होटगी रोडवरील आलमगीर ईदगाह मैदान, पानगल हायस्कूल येथील शाही आलमगीर ईदगाह मैदान, जुनी मिल कंम्पौड येथील आदिलशाह ईदगाह मैदान, रंगभवन येथील अहिले हदीस ईदगाह मैदान आणि आसार मैदान येथील ईदगाह मैदानावर मुख्य नमाज पठण होणार आहे. शहरातील या पाचही ईदगाह मैदानात महापालिकेने शुक्रवारपासून स्वच्छता केली. उर्वरित स्वच्छता शनिवारी पूर्ण करण्यात आली.

होटगी रोड येथील आलमगीर ईदगाहच्या आवारात काही वर्षापूर्वी झाडे लावण्यात आली होती. त्याचे योग्य पध्दतीने संगोपन झाल्यामुळे आज ही झाडे चार ते पाच फुट उंच झाली आहेत. त्यामुळे चारही बाजूने सावली येत आहे. नमाज अदा करतानासुध्दा या सावलीचा लाभ होईल. दरम्यान, रमजान ईदची सामूहिक नमाज येथील ईदगाह मैदानात केली जाते. स्त्री आणि पुरुष अशा पद्धतीने सामूहिक नमाज अदा करतेवेळी खडे टोचू नये, यासाठी मैदानातील खडे वेचण्यात आले. त्याच पद्धतीने सामूहिक नमाज पठण करतेवेळी सर्वांना सूचना ऐकू येण्यासाठी लाऊड स्पीकर लावण्यात आली आहेत. रमजान ईद एका दिवसावर येऊन ठेपली असल्याने सामूहिक नमाज आदा करण्यासाठी लागणारी सर्व तयारी महापालिका तसेच ईदगाह मैदान संस्थांच्या वतीने करण्यात आली. महापालिकेच्या ठेकेदाराच्यावतीने १२ कामगारांच्या साह्याने मैदान स्वच्छ तसेच खडे मुक्त करण्यात आले. तेथील छोटे-मोठे खडे वेचून बाजूला काढण्यात आले. त्याच पद्धतीने वाढलेले गवत काढण्यात आले. महापालिकेचे ठेकेदार राठोड यांच्याकडून महापालिकेने सदरचे काम करून घेतले. सामूहिक नमाज पठण करण्यासाठी मुस्लिम बांधवांची होणारी गर्दी लक्षात घेता. रंगभवन येथील सर्व फेरीवाले खोकेधारक यांनी एक दिवसासाठी आपला व्यापार बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### दूध पंढरीतर्फे विक्री व्यवस्था

रमजान ईदमध्ये शिरखुर्मासाठी लागणाऱ्या दुधाचे जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ दूध पंढरीतर्फे विक्री व्यवस्था करण्यात आली. यात सात रस्ता, नई जिंदगी, समाचार चौक, अशोक चौक, मौलाली चौक, जोडबसवण्णा चौक, अक्कलकोट रोड आदी ठिकाणी दुधाचे टँकर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### शहर पोलिसांचा चोख बंदोबस्त

रमजान ईदनिमित्त सोलापूर शहर पोलिसांकडून शहरात चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली तीन पोलिस उपायुक्त, ७ सहायक पोलिस आयुक्त, १६ पोलिस निरीक्षक, ४५ पोलिस उपनिरीक्षक, १००० पोलिस कर्मचारी, ५०० होमगार्ड व राज्य राखीव दलाची तुकडी असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. त्याशिवाय गस्त व फिक्स पॉईंट तैनात करण्यात आले आहेत.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### करकंब परीसरातील अवैध व्यवसाय बंद करा; रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची मागणी

**करकंब, दि.२९ मार्च-**

करकंब पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या करकंब व इतर गावांमध्ये मोठ्या प्रमाणात जुगार, मटका व बेकायदेशीरपणे दारू विक्री होत आहे. हे सर्व बेकायदेशीर व्यवसाय दिवसाढवळ्या शाळा परिसरातसुद्धा मोठ्या प्रमाणात सुरू आहेत.याकडे पोलीस प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. करकंब शहरांमध्ये अकरा जिवंत समाध्या आहेत. अशा पवित्र व धार्मिक पार्श्वभूमी लाभलेल्या शहराला मटका, जुगार व अवैध दारूविक्रीने पूर्णपणे वेढले आहे. या सर्व गोष्टींचा त्रास करकंबमधील सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे.यामुळे करकंब शहरांमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.या सर्व प्रकरणाची चौकशी करून हे सर्व अवैध्य व्यवसाय लवकरात लवकर बंद करण्यात यावेत व ज्या पोलिस अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने हे व्यवसाय जोमाने सुरू आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी रिपाइंचे (आठवले गट)पंढरपूर तालुका उपाध्यक्ष वंशदिप शिंदे यांनी पोलीस अधीक्षकसो सोलापूर ग्रामीण यांच्याकडे केली आहे.




### गणपती फार्मसीची गोविंद वृद्धाश्रमात आरोग्य तपासणी

**टेंभूर्णी, दि. २९ मार्च-**

टेंभुर्णी येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्चच्या विद्यार्थ्यांनी गोविंद वृद्धाश्रम, टेंभुर्णी येथे भेट देत सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडवले. या भेटीचे मुख्य उद्दीष्ट वृद्धांसोबत संवाद साधून त्यांना मानसिक आधार देणे, त्यांची गरज जाणून त्यांना मदत करणे आणि त्यांना भारतीय संस्कृतीनुसार सन्मानाची व आपुलकीची भावना देणे हा होता. विद्यार्थ्यांनी वृद्धांसाठी रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन आणि बीएमआय यांसारख्या मूलभूत आरोग्य तपासण्या केल्या. याशिवाय, त्यांना फळे,जीवनावश्यक व अन्य उपयुक्त वस्तू वितरित करण्यात आल्या. या कार्यक्रमादरम्यान, वृद्धांशी संवाद साधून त्यांच्या जीवनातील अनुभव ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. वृद्धाश्रमातील नागरिकांनी आपल्या आयुष्यातील संघर्ष आणि आठवणी सांगून विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला. या भेटीदरम्यान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीत वृद्धांचा सन्मान करण्याचे महत्त्व पटवून दिले.यावेळी प्रा. धनश्री करंडे, प्रा. रुपाली राऊत, प्रा. सुकेशिनी पाटील, प्रा. पूजा शिंदे, प्रा. केतकी पाटील, प्रा. पूजा शिरसकर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे आणि प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे उपस्थित होते.



### आयडीएफ फायनान्सकडून नाईकनगर शाळेला शालेय साहित्य भेट

**सोलापूर, दि. २९ मार्च-**

मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) येथील नाईकनगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना पाणीटंचाईसह ऊन्हाळ्यात उकाडयाचा त्रास होत होता. शिवाय डिजिटल युगातही टिव्हीची सोय नव्हती. म्हणून मंद्रुपमधील आयडीएफ फायनान्सियल प्रायवेट लिमिटेड यांच्याकडून नाईकनगर शाळेला दोन पंखे, खुर्च्या, पाण्याची टाकी, टीव्ही आदी साहित्य भेट देण्यात आले. सरपंच अनिता कोरे यांच्या हस्ते पूजन करून साहित्य शाळेकडे सूपूर्द करण्यात आले. यावेळी येथील अंगणवाडी केंद्रालाही कपाट, खुर्च्या व पंखा भेट देण्यात आले. केंद्रप्रमुख कलप्पा हेळवी, मुख्याध्यापिका सखूबाई गुंड, ग्रामपंचायत सदस्या शांता चव्हाण, शिक्षिका कमल अणची, आयडीएफ फायनान्सियल सर्विसेस मंद्रुपचे विभागीय व्यवस्थापक ज्ञानेश्वर सातपुते, शाखा व्यवस्थापक सतीश चव्हाण, वसूली अधिकारी महेश पांढरे, निसर्गराज कदम, अध्यक्ष खंडू चव्हाण, महेश चव्हाण, बाबू पवार, शिवाजी चव्हाण, अंगणवाडी सेविका सारीका जोडमोटे उपस्थित होते. सरपंच अनिता कोरे व केंद्रप्रमुख कलप्पा हेळवी यांनी आभार मानले.

### दहावीच्या परीक्षांमध्ये तोतया विद्यार्थी बसवून फसवणूक केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. २९ मार्च-**

येथील बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं-४३/२०११ अन्वये बार्शी येथील सिल्व्हर ज्युबली हायस्कूलमध्ये इयत्ता १० वी बोर्डाच्या परीक्षेमध्ये इंग्रजी विषयाच्या पेपरला आरोपी कासार याने स्वतः पेपर न देता तोतया विद्यार्थी बसवून इंग्रजी विषयाचा पेपर देण्यास लावल्यामुळे आरोपी कासार यांचेवर प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत काशिनाथ कोल्हे यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे आरोपीविरुद्ध भादंवि कलम-४२०, ३४ व महाराष्ट्र विद्यापीठ व मंडळे यांच्या परीक्षेमध्ये गैरप्रकार प्रतिबंधित करणारा कायदा कलम-७ अन्वये गुन्हा दाखल केला होता. सदरील प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील मे. ज्युडि. मॅजि. फर्स्ट क्लास न्यायाधीश पी.व्ही.राऊत सो. यांच्यासमोर झाली. सरकारी पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. यावेळी आरोपीच्यावतीने ॲड. राहुल अंकुश पाटील यांनी काम पाहिले. सरकारी पक्षातर्फे मुख्याध्यापक, सुपरवायझर, उपसंचालक, लिपीक व तपास अधिकारी अशा सहा साक्षीदारांचे साक्ष तपासण्यात आल्या. यावेळी ॲड. राहुल पाटील यांनी साक्षीदार,पंच आणि तपास अधिकारी यांचा पुरावा आरोपीस शिक्षा देण्याइतपत पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याचा अभाव असल्याचा युक्तिवाद केला. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपी कासार यांची मे.कोर्टाने निर्दोष मुक्तता केली. याकामी आरोपीच्यावतीने ॲड. राहुल पाटील,ॲड. श्रीराम काशीद यांनी काम पाहिले.

# तीर्थ येथे आजपासून श्रीरामनवमी व्याख्यानमाला

**रामलिंगेश्वर वाचनलायातर्फे आयोजन; ६ एप्रिलला सांगता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मार्च-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्री. रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालयातर्फे श्रीराम जन्मोत्सवानिमित्त दि. ३० मार्च ते ६ एप्रिलपर्यंत श्रीरामनवमी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात दररोज श्री रामलिंगेश्वर रूद्राभिषेक व बिल्वार्चन होणार आहे.

या व्याख्यानमालेचे उदघाटन रविवारी गुढीपाडव्याला ॲड. विक्रांत फताटे यांचे हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सुभाष गुरव, वे. सिध्दारूढ स्वामी, वे. मल्लय्या स्वामी, वे. रेवणय्या स्वामी हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी वेदमूर्ती बसवराज शास्त्री-हिरेमठ असणार आहेत. या व्याख्यानमालेत सोमवारी दि.३१ मार्च रोजी सोलापूरच्या रसिका व सानिका कुलकर्णी गीतरामायण सादर करणार आहेत. मंगळवारी दि.१ एप्रिल रोजी शिवलिंगप्पा वंगे



हे शेतकऱ्यांच्या समस्या या विषयावर व्याख्यान देणार आहेत. बुधवारी दि.२ एप्रिल रोजी अक्कलकोट पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ह.भ.प. संजय महाराज पाटील हे जीवनातील अध्यात्माचे महत्व हा विषय मांडणार आहेत. गुरूवारी दि. ३ एप्रिल रोजी भाजपा उद्योग आघाडीच्या राज्य सचिव श्रध्दा कंडुडे या युवकांचा उद्योगातील सहभाग काळाची गरज हा विषय मांडणार आहेत. शुक्रवारी दि. ४ एप्रिल रोजी वालचंद महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. हनुमंत मते हे नाटक जीवनाचे मर्म हा विषय मांडणार आहेत. शनिवारी दि. ५ एप्रिल रोजी ह.भ.प. काशिनाथ महाराज गुरव हे मच्छिंद्रनाथ व गोरखनाथा यांचे जीवनचरित्र हा विषय मांडणार आहेत. रविवारी दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम होणार आहे. कलहिप्परगा यथील संस्थान ष.ब्र.हिरेमठ गुरूशातंलिंग शिवाचार्य महास्वामी, अक्कलकोटच्या विरक्तमठाचे पूज्य बसवलिंग महास्वामी यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त पोलीस अधिकारी रमेश पाटील, उद्योगपती प्रशांत मुद्दबिहाळ उपस्थित राहणार आहेत. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी रेणूका पाटील-रणसिंग, कल्पना पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन होणार आहे. या सर्व कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन व्याख्यानमाला समितीमधील प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, रामचंद्र दसले, काशिनाथ बिराजदार, कल्याणराव मेंथे, प्रा. प्रभुलिंग वळसंगे, काशिनाथ जाधव, नागनाथ उदंडे,संतोष पाटील, शिवराज बिराजदार, रेवणसिध्द पाटील,शातप्पा चितले यांच्यासह पंचकमेटी, अक्कमहादेवी भजन संघ व ग्राम स्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



## सुयश विद्यालयाच्या अर्णव मसुते याची नवोदय विद्यालयासाठी निवड

**बार्शी, दि.२९ मार्च-**

बार्शीतील सुयश विद्यालय शाळेतील इयत्ता पाचवीचा विद्यार्थी अर्णव संजय मसुते याची जवाहर नवोदय विद्यालय, पोखरापूर येथे निवड झाली. त्याला इयत्ता पाचवी सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यश संपादनासाठी संस्थेचे अध्यक्ष शिवदास नलवडे, मार्गदर्शक प्रसाद नलवडे, शाळेच्या संस्थापिका प्रतिभा नलवडे, मार्गदर्शिका प्रियंका नलवडे यांनी तसेच शाळेचे मुख्याध्यापक सागर मंडलिक यांनी अभिनंदन केले.

## विठ्ठलराव शिंदे प्रशालेच्या दोन विद्यार्थ्यांची पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २९ मार्च-**

लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत माढा तालुक्यातील अंबाड येथील कै. विठ्ठलरावजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रथमेश रजपूत व नागेश कदम या दोन माजी विद्यार्थ्यांची पोलीस उपनिरीक्षक पदावर निवड झाली. तसेच ज्योती मोरे या माजी विद्यार्थीनीची महसूल सहायक या पदासाठी निवड झाली.



प्रथमेश रजपूत याने वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात हे यश प्राप्त केले. प्रथमेशचे उच्च माध्यमिक शिक्षण याच प्रशालेतून पूर्ण झाले. सन २०१९ साली झालेल्या १२ वी च्या परीक्षेत तो ८८ टक्के गुण घेऊन तो प्रशालेत प्रथम आला होता. पुढे पुणे येथून बी.टेकची पदवी घेऊन त्याने स्पर्धा परीक्षेवर लक्ष केंद्रित केले. आणि तो पहिलाच प्रयत्न पोलीस उपनिरीक्षक परीक्षा उत्तीर्ण झाला. तसेच कदम यांचे माध्यमिक शिक्षण याच प्रशालेतून पूर्ण झाले सन २०१२ साली झालेल्या १० वीच्या बोर्डाच्या परीक्षेत तो ८४.७३ टक्के गुण घेऊन प्रशालेत प्रथम आला. नंतर इंदापूर येथून बी एस्सी कॉम्प्युटरचे शिक्षण पूर्ण केले ज्योती मोरे हीने डी.एड.चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून हे यश संपादन केले. या तिन्ही विद्यार्थ्यांचा प्रशालेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच त्यांच्या माता पित्यांचा देखील सन्मान करण्यात आला.या प्रसंगी प्रशालेचे प्राचार्य जवानसिंग रजपूत, सुरेखा घैसास, एम.एस.पाटील, सोमनाथ होनमोटे उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. विष्णू घाडगे व आभार प्रा. देविदास जगताप यांनी व्यक्त केले.

### खोकल्याचे औषध समजून गोचीड मारण्याचे औषध पिले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे अंधारात खोकल्याचे औषध समजून मुलीने टेबलवरील गोचीड मारण्याचे औषध प्राशन केले.

हा प्रकार २७ मार्च रोजी रात्री ११ वाजता घडला. लक्ष्मी सैंदप्पा गिन्नी (वय १६ रा. दुधनी) असे औषध प्राशन केलेल्या मुलीचे नाव आहे, तिला त्रास होऊ लागल्याने अक्कलकोट येथील सरकारी दवाखान्यात उपचार करून पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## सोलापूर बाजार समितीसाठी मलकप्पा कोडलेंचा अर्ज दाखल

**वळसंग, दि.२९ मार्च-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीसाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे समर्थक येथील ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले यांनी ग्रामपंचायत गटातून सर्वसाधारण जागेसाठी अर्ज दाखल केला.

यावेळी समाजसेवक महेश बिराजदार, मुळेगावचे संदीप राठोड, सुभाष पाटोळे (होटगी स्टेशन), माजी उपसरपंच स्वामिनाथ कोडले, उपसरपंच समीर कटरे, ॲड. बसवराज कोडले, अनिल बर्वे, विनोद सुरपुरे, शलम अमालीचुंगे, बसवराज मिर्जे (दिंडुर सदस्य), अशोक वडगाव व वळसंग गटातील सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच सोसायटीचे सभासद उपस्थित होते.



## महिला मंडळ प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**करकंब, दि. २९ मार्च-**

महिला मंडळ पंढरपूर संचलित महिला मंडळ प्राथमिक शाळा महावीरनगर पंढरपूर येथील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ शुभसंदेश शुभेच्छासह पार पडला.

प्रमुख पाहुणे मोहोळचे नायब तहसीलदार सुधाकर धांईंजे, तालुका क्रीडा अधिकारी विठ्ठल भालेराव, संस्थेच्या अध्यक्षा प्रा. मेधाताई दाते, सचिवा वर्षा काणे, शिक्षीका आंधळगावकर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सरस्वतीच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. मुख्याध्यापिका लोखंडे यांनी शाळा, विद्यार्थ्यांविषयी माहिती दिली. साप्ताहिक शिक्षकध्येय यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला पुरस्कार शैक्षणिकक्षेत्र मुख्याध्यापिका लोखंडे, वैद्यकीय क्षेत्र सचिवा डॉ. वर्षा काणे यांना देण्यात आला. विवीध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या छापछडी,पियुष सगर,शिवन्या पवार, श्रेया घोडके, श्रृतिका माने हे विद्यार्थी तसेच पालक यांचा पदके देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी या संस्थेच्या अध्यक्षा प्रा.मेधा दाते, सचिवा डॉ. वर्षा काणे, शिक्षीका आंधळगावकर पालकवर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक कोळी यांनी तर आभार शिक्षीका अर्पिता कुलकर्णी यांनी मानले.

# महाविद्यालयीन जीवन हा आयुष्याला कलाटणी देणारा काळ

**डॉ. नरेशचंद्र काठोळे यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२९ मार्च-**

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी स्वत:चे ज्ञान अद्ययावत करुन करिअरच्या वाटेवर सिद्ध होणे गरजेचे आहे. स्पर्धेच्या युगात ध्येय गाठण्यासाठी परिश्रम, चिकाटी व संयम ठेवणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन काळ विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला कलाटणी देणारा आहे, असे प्रतिपादन अमरावती मिशन आयएएसचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी बार्शी येथे केले.



येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्यावतीने आयोजित 'यूपीएससी व एमपीएससी परीक्षांना सामोरे जाताना' या विषयावरील व्याख्यानात डॉ. काठोळे बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, परंडाचे प्राचार्य डॉ. टी. एन. लोखंडे, मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. राहुल पालके, प्रा.एस.एच. पाटील हे उपस्थित होते. अभ्यास, मार्गदर्शन व सातत्य ठेवल्यास आयुष्यात यश मिळवता येते. सामान्य कुटुंबातील अनेक विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवलेले आहे. त्यासाठी अभ्यासात सातत्यता व तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे, असेही डॉ. काठोळे म्हणाले. याप्रसंगी डॉ. लोखंडे यांनी विद्यार्थ्यांनी विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे यामधील महत्त्वाच्या बाबींना अधोरेखित करुन अभ्यासात गती घेणे गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ. पालके यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना विविध विषयांचे आकलन समकालीन परिस्थिती आधारे करणे गरजेचे आहे असे मत मांडले. याप्रसंगी डॉ. काठोळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून आपले ध्येय व मार्ग निश्चिती कशी आहे? याबाबत प्रश्न विचारले असता विद्यार्थ्यांनी सकारात्मक पद्धतीने त्यांना उत्तरे दिली. सूत्रसंचालन डॉ. राहुल पालके यांनी केले. तर आभार डॉ.बाबासाहेब सोनवणे यांनी मानले.

# कठीण परिस्थितीतून येणारेच यशस्वी होतात

**कुलगुरु महानवर; संतोष पाटील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण**

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मार्च-**

ग्रामीण भागातील कठीण परिस्थितीतून आलेले विद्यार्थीच मोठे यश मिळवतात. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि दिशा मिळाली की, हे राष्ट्रीय पातळीवर चमकतात, आपली गुणवत्ता सिद्ध करतात. ज्यांच्या बाहूंमध्ये बळ आहे, कष्ट करण्याची ताकद आहे, तेच यशस्वी होतात. महाविद्यालयातील हे यश अंतिम नसून ही सुरुवात आहे. यापुढे यशाची सवय लावून घेतली पाहिजे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. ते मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या २० व्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी, उपाध्यक्ष संदेश कोळी, सचिव एम. डी. कमळे, खजिनदार प्रा. व्ही. के. पाटील, विश्वस्त नागेश बिराजदार, सहसचिव प्रा. सुबोध



कोळी उपस्थित होते.

आ. सुभाष देशमुख म्हणाले, कौशल्यावर आधारित शिक्षण घेण्याचा प्रयत्न करा. छोट्या-मोठ्या उद्योगातून स्वत:चा त्याबरोबर गावाचा अन् पर्यायाने देशाचा विकास साधता येईल. रोजगार मागण्यापेक्षा आपण रोजगार देणारे झाले पाहिजे. संस्था अध्यक्ष पी. एल. कोळी म्हणाले, ग्रामीण भागातील मुले काही तरी नावीन्यपूर्ण करण्याच्या हेतूने धडपडत असतात. त्यांना संस्थेच्या माध्यमातून सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना पाठबळ देण्याचे काम केले जात आहे. मुलींना उच्च शिक्षण मिळावे, या हेतून काढलेल्या शाळा-कॉलेजमधून विद्यार्थिनी शिक्षण घेताहेत. शैक्षणिक गुणवत्तेसह विविध स्पर्धा आणि परीक्षांमध्ये यश मिळवत आहेत. ही उल्लेखनीय बाब आहे.यावेळी वर्षभरात शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उज्वल कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. वार्षिक अहवालाचे वाचन प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे यांनी केले. समन्वयक प्रा. बी. एस. कोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष कदम यांनी अतिथी परिचय करून दिला. शा. शि. संचालक डॉ. एस. एस. तोरवी, डॉ. डी. के. देडे, डॉ. एन. डी. बनसोडे, डॉ. जे. डी. नादरगी यांनी पारितोषिकांची उद्घोषणा केली. सूत्रसंचालन प्रा विजय साळवे यांनी केले तर प्रा. व्ही. एस. गडगी यांनी आभार मानले.

# हिंदू-मुस्लिम सामाजिक सलोखा कायम राहील

**ॲड. सचिन चव्हाण; चव्हाणवाडी (टें) येथे इफ्तार पार्टी**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २९ मार्च-**

मुस्लिम धर्मियांचा रमजान महिना सुरू असून रोजा(उपवास) सोडण्यासाठी चव्हाणवाडी(टें) काझी वस्ती येथे सालाबाद प्रमाणे रोजा इफ्तार पार्टीचे चव्हाण परिवाराच्या वतीने ॲड. सचिन चव्हाण यांनी आयोजन केले होते.

रोजा इफ्तार पार्टी मोठ्या उत्साहात पार पडली. रमजान महिना इस्लाम धर्मातील पवित्र महिना आहे या महिन्यात मुस्लिम समाज बांधव सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत कडक रोजे करतात या काळात अन्नपाणी कसलेही ग्रहण केले जात नाही तसेच अशा वेळी रोजा करणारा व्यक्ती फक्त अन्नपाणीच नाही तर सर्व वाईट गोष्टी पासून ही दुर असतो. इफ्तार पार्टीच्या निमित्ताने आपणच आपापसांत बंधुभाव वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत तसेच आपल्या गावांमध्ये धार्मिक व सामाजिक सलोखा कायम राहील असे प्रतिपादन ॲड. सचिन चव्हाण



यांनी व्यक्त केले.

यावेळी हनुमंत चव्हाण म्हणाले की, सामाजिक जातिय सलोखा आणि एकात्मतेसाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र येणे आवश्यक आहे. यावेळी सुभाष इंदलकर-पाटील यांनी सामाजिक एकोपा कायम जपला पाहिजे व अशा सामाजिक कार्यातनच एकमेकाच्या विचारांची देवाणघेवाण होत असते असे बोलून मुस्लिम बांधवांना रमजान महिन्याच्या शुभेच्छा दिल्या. तसेच उद्योजक अय्युब पटेल बोलताना म्हणाले की, हिंदू समाज बांधव आपल्या सणा निमित्त वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करतात तसेच मुस्लिम समाज बांधवांनीही हिंदू समाज बांधवांसाठी उपक्रम राबविले पाहिजेत यामुळे साहजिकच एकोपा वाढतो असतो असे सांगितले. यावेळी सोसायटी चेअरमन कैलास चव्हाण, हनुमंत चव्हाण, नवनाथ शिंदे, अय्युब पटेल, सोमनाथ कदम, विजय कदम, बाळासाहेब मोटे, बाळासाहेब चव्हाण, धनंजय भोसले, रमेश नांगरे, शाम नांगरे, सुधिर नांगरे, डॉ. शहाजहान काझी, अजिज शेख, इम्तियाज सय्यद, जावेद काझी, आसिफ काझी, कुदरत काझी, अमिर काझी, दजमाल काझी, शाहीद काझी, अल्ताफ काझी, कमाल काझी, शरिफ काझी, मोहसीन इनामदार, ॲड. गणेश चव्हाण, संग्राम चव्हाण, भाऊराव इंदलकर, रोहन चव्हाण, सचिन शिंदे, जोतिराम शिंदे, संग्राम नांगरे, सागर चव्हाण उपस्थित होते.

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सांगोला : शहरात गुढीपाडव्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे साखरेचे व खोबऱ्याचे हार विक्रीसाठी थाटलेली दुकाने.



## संक्षिप्त वृत्त...



### एकता मंचच्या अरोग्य शिबीरात १७५ महिलांची तपासणी

**वैराग, दि. २९ मार्च-**

एकता महिला मंच व साई होमिओपॅथी कॉलेज यांच्यावतीने भालगाव येथे आयोजीत करण्यात आलेल्या आरोग्य शिबीरामध्ये १७५ महिला व मुलींची आरोग्य तपासणी ग्रामपंचायत कार्यालय येथे करण्यात आली. प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. सपना मलमे व उपस्थित महिला मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सपना मलमे डॉ. कोमल जमादार, डॉ. पियुष मलमे व तसेच त्यांचे सहकारी राहुल आवचरे, प्रशांत खोबरे यांनी उपस्थित राहून तपासणी केली. यावेळी उपस्थित एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, शबनम सय्यद, उर्मिला दराडे, नागर दराडे, रोमबाई सोनवणे स्वाती ढवळे, स्वाती दराडे, रेश्मा दराडे, जयश्री दराडे, सुनीता सोनवणे, शशिकला सोनवणे, कविता तिडोरे, मनीषा तिडोरे, पूजा दराडे, सरस्वती तिडोरे, योगिता कराड, सुमन नरसुडे उपस्थित होते. सूत्रसंचालन व उर्मिला दराडे यांनी केले व आभार शबनम सय्यद यांनी मानले.



### चांदापुरी ग्रा.पं.च्या उपसरपंचपदी सरतापे

**पिलीव दि २९ मार्च**

चांदापुरी (ता.माळशिरस) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मोहिते पाटील समर्थक पाटील पार्टीचे सदस्य हनुमंत सरतापे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. विद्यमान उपसरपंच अजित लोखंडे यांनी स्थानिक पातळीवर ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने येथील उपसरपंचपद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी विद्यमान सरपंच जयवंत सुळ यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्यांची बैठक झाली. यावेळी ठरवून दिलेल्या वेळेप्रमाणे सदस्य हनुमंत सरतापे यांनी सुचक अजित लोखंडे यांच्या मार्फत उमेदवारी अर्ज दाखल केला. दाखल अर्जाची छाननी करून सदरचा अर्ज मंजूर झाला. त्यानंतर सदस्यांच्या नियम ११ प्रमाणे झालेल्या बैठकीत अध्यक्ष जयवंत सुळ यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत अधिकारी तथा सचिवा एन.आर.शेख यांनी श्री. सरतापे यांचा उपसरपंचपदाचा अर्ज मंजूर होऊन त्यांचाच एकमेव अर्ज असल्याने त्यांची निवड बिनविरोध करित असल्याचे अध्यक्ष जयवंत सुळ यांच्या परवानगीने घोषित केले. बैठकीला सरपंच जयवंत सुळ, सदस्य हनुमंत सरतापे, सविता पाटील, दिपाली निकम, अजित लोखंडे, तात्यासाहेब चोरमले, आप्पासाहेब शिंदे, प्रियंका सरक, लक्ष्मी साबळे, शोभा जाधव सदस्य उपस्थित होते. उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल श्री. सरतापे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी विजयसिंह पाटील, विजय निकम, दिलीप सरतापे, हनुमंत कोपनर, बापू लोखंडे, विजय कवळे, समाधान साबळे, अक्षय देठे, संतोष सरक उपस्थित होते.



### भूषण आकाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त अन्नदान

**नातेपुते, दि. २९ मार्च-**

नातेपुते येथील भूषणभाऊ आकाडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणा निमित्त मोरोची (ता.माळशिरस) येथील आश्रम शाळेतील मुलांना अन्नदान करण्यात आले. यावेळी आकाडे कुटुंबातील सर्व नातेवाईक, आकाडे मित्रपरिवार उपस्थित होते.

## राजेवाडी तलावातून सांगोला, आटपाडीला आवर्तनाचे पाणी मिळणार

### माजी आमदार शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २९ मार्च-**



येत्या दोन ते तीन दिवसांत सांगोला व आटपाडी तालुक्याला राजेवाडी तलावातून आवर्तनाचे पाणी मिळेल अशी माहिती माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली.

सांगोला व आटपाडी तालुक्याला राजेवाडी तलावातून आवर्तनाचे पाणी सोडण्यात यावे अशी मागणी शहाजीबापू पाटील यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्याकडे दूरध्वनीवरून केली असता या दोघांनीही सांगोला व आटपाडी तालुक्याला पाणी सोडण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. सध्या राजेवाडी कार्यक्षेत्रातील सांगोला व आटपाडी तालुक्यातील सर्व गावातील पिके पाण्याला आलेली आहेत. पाण्याची तीव्र टंचाई भासत आहे. शेतीच्या व जनावरांच्या तसेच पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे. राजेवाडी धरणात जिहे, कटापूर योजनेतून पाणी सोडण्याचे काम ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केलेले आहे. ना.जयकुमार गोरे यांनी गेल्या पावसाळी आवर्तनात संपूर्ण राजेवाडी तलाव पूर्णपणे भरून घेतलेला आहे. हे राजेवाडी तलावातील पाणी सांगोला व आटपाडी तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळावे यासाठी शहाजीबापू पाटील यांनी ना.जयकुमार गोरे व रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना दूरध्वनीवरून बोलून पाणी सोडण्याची विनंती केली आहे.

> शेतकऱ्यांची पिके पाण्याला आली आहेत. लवकरच आवर्तन सुरू करावे व सांगोला व आटपाडी तालुक्याला राजेवाडी तलावातून पाणी देण्यात यावे अशी मागणी केली. मागणी केल्यानंतर त्यांनी तात्काळ आवर्तन सुरू करून सांगोला व आटपाडी तालुक्यातील शेतकऱ्यांना पाणी सोडण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. लवकरच पाणी सोडण्याचे आश्वासन दिले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत राजेवाडी तलावातून आवर्तनाचे पाणी मिळेल. शेतकऱ्यानी हवालदिल होऊ नये.
> **- ॲड. शहाजीबापू पाटील,** माजी आमदार



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ मार्च-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते मुख्यमंत्री महोदयाचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांच्या समवेत पालकमंत्री जयकुमार गोरे,आमदार समाधान आवताडे, आ. अभिजीत पाटील, गोपीचंद पडळकर, सचिन कल्याणशेट्टी, बाबासाहेब देशमुख, माजी आमदार राम सातपुते, विभागीय आयुक्त चंद्रकांत फुलकुंडवार,विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री तसेच मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यामध्ये श्री विठ्ठल गर्भगृह श्री रुक्मिणी गर्भगृह, श्री विठ्ठल चारखांबी व सोळखांबी, बाजीराव पडसाळी, महालक्ष्मी मंदिर आदी कामांची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

## थकीत भाडेकरुंचे गाळे सील; सांगोला न.प.ची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २९ मार्च-**

सांगोला नगरपरिषदकडून वर्षानुवर्षे थकीत असलेल्या गाळा भाडेकरूवर धडक कारवाई करण्यात आली.

गाळा भाडेकरूंना वारंवार सांगूनसुद्धा त्यांनी थकीत रक्कम जमा केली नाही. त्यांना ७ दिवस, ३ दिवस, व शेवटी २४ तासांची अंतिम नोटीस बजावून देखील रक्कम भरली नाही. अशा भाजी मंडई लगत संग्राम सक्रे, त्रिमूर्ती टाकी समोर नौशाद मुलाणी, मयूर डोंगरे, जमील शेख,



विजय सुपेकर यांचे गाळे सील करण्यात आले.

सदर कार्यवाही नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचे मार्गदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी सचिन पाडे, कर निरीक्षक रोहित गाडे यांचे उपस्थितीत लिपिक सागर पवार, आनंद हुलजंतीकर, रामा सागर, निकोप ठोकळे, रमेश मोरे यांनी केली. तसेच कर व प्रशासकीय अधिकारी महेश रजपूत, अस्मिता निकम, पाणीपुरवठा अभियंता करण सरोदे यांचे उपस्थितीत पाणीपट्टी थकबाकीदारांचे नळ कनेक्शन कट करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

> कटू कार्यवाही टाळायची असेल तर सांगोला शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी आपल्या थकीत रकमेचा भरणा नगरपरिषद कार्यालयात करून नगरपरिषदेस सहकार्य करावे.
> **- डॉ. सुधीर गवळी**
> मुख्याधिकारी, सांगोला.



## जेऊर रेल्वे स्टेशनला सोलापूर विभाग प्रमुख मिश्रा यांची भेट

### रेल्वे सल्लागार समितीची तिकीट खिडकीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२९ मार्च-**

जेऊर रेल्वेस्टेशन येथे सोलापूर रेल्वे विभागाचे विभाग प्रमुख डीआरएम मिश्रा आले असता रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप पवार यांनी त्यांचे स्वागत केले तसेच जेऊर रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक एक वरती तिकीट खिडकी चालू करण्याची मागणी केली हुतात्मा उद्यान एक्सप्रेसला थांबा मिळावा, याचे निवेदन रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप पवार यांच्या हस्ते देण्यात आले. तसेच शहीद भगतसिंग प्रवासी संघटना जेऊर यांच्या वतीने देखील निवेदन करण्यात आले त्यांनी आपल्या निवेदनात हुतात्मा उद्यान व कुर्ला एक्सप्रेस या गाड्यांना जेऊर येथे थांबा द्यावा याची मागणी करण्यात आली. यावेळी रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप पवार, शहीद भगतसिंग प्रवासी संघटनेचे अध्यक्ष प्रवीण करे, उपाध्यक्ष बाळासाहेब गरड, किरकोळ व्यापारी संघटना जेऊर अध्यक्ष पवन कोठारी, हनुमंत कांडेकर, संतोष वाघमोडे, दत्तात्रय मारकड, नदाफ, गणेश टकलगे, सचिन निमगिरे उपस्थित होते.

## मंद्रूप येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह,शिवलिलामृत पारायण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**मंद्रूप, दि.२९ मार्च -**

मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री शिवलिलामृत ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा चैत्र शुद्ध प्रतिपदा ३० मार्च ते ३ एप्रिलपर्यंत चालणार आहे. यंदाचे हे चौथे वर्ष असून हा सोहळा मारुती मंदिरात होणार आहे.



सोहळ्याची सुरुवात रविवारी ३० मार्च रोजी सकाळी ९ वाजता दीप प्रज्वलनासह ध्वज, कलश, ग्रंथ, वीणा, मृदंग व गाथा पूजनाने होणार आहे. या सोहळ्यात दररोज पहाटे काकडा, सकाळी शिवलिलामृत ग्रंथ पारायण, गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, प्रवचन, रात्री हरिकिर्तन व हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. सोहळ्यात प्रसिद्ध प्रवचनकार व कीर्तनकार सहभागी होणार आहेत. हभपमलकारी मायनाळे महाराज, हभप शंभू गुंड महाराज, हभप वैष्णवी भगरे, हभप विजयराज बिज्जरगी महाराज यांची प्रवचनसेवा होणार आहे. तर हभपदत्तात्रय क्षीरसागर महाराज (उळे), हभप विजय बडे महाराज (बीड), हभप शिवांजली जरांगे-पाटील महाराज (बीड), हभप कृष्णा राऊत महाराज (बीड) अशा प्रसिद्ध हरिकिर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. तसेच २ एप्रिल रोजी दुपारी विनायक गुरव महाराज यांचे भारूड होणार आहे. सोहळ्याचा समारोप ३ एप्रिल रोजी सकाळी दिंडी व नगर प्रदक्षिण आणि गुरुवर्य हभप सुधाकर इंगळे महाराज यांचे काल्याचे कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### गुढीपाडव्यानिमित्त मंद्रूपमध्ये आज शोभायात्रा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर , दि. २९ मार्च,

गुढीपाडवा, हिंदू नववर्ष निमित्ताने मंद्रूप येथे सकल हिंदू समाजतर्फे रविवारी ३० मार्च रोजी दुपारी चार वाजता शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे. दुपारी चार वाजता बाजार स्थानक परिसरातील ग्रामदैवत श्री मळसिद्ध महाराज मंदिर येथून पारंपारिक वेशभूषेत शोभायात्रेची सुरवात होईल. पारंपारिक वेशभूषामध्ये बैलगाडी, ई-बाईक व सायकलस्वार गावातील मुख्य रस्त्यावरून निघणार आहेत. या शोभायात्रामध्ये पारंपारिक गाणी, नृत्य व खेळाचे प्रात्यक्षिक होणार आहे. शोभायात्रा श्री मळसिद्ध मंदिरात परतल्यानंतर विवेकानंद केंद्र कन्याकुमारीचे पश्चिम महाराष्ट्र विभागाचे युवा प्रमुख अप्पासाहेब हत्ताळे यांचे व्याख्यान होणार आहे. या शोभायात्रेत सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सकल हिंदू समाजतर्फे करण्यात आले.

## कुसमोड-निमगाव येथील शर्यतीत बाबुराव बोडरेंचा बैलगाडा प्रथम

### ५१ हजारांचे मिळवले बक्षिस; ३९५ बैलगाडयांचा सहभाग

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २९ मार्च-**



माळशिरस तालुक्यातील कुसमोड-निमगाव या दोन्ही गावच्या संयुक्तपणे गुढीपाडव्यानिमीत्त आयोजित करण्यात आलेल्या बैलगाडी शर्यतीत एकुण ३९५ बैलगाडयांनी सहभाग नोंदवीला. यामध्ये प्रथम क्रमांकाचे ५१ हजार रुपयांचे बक्षीस माण तालुक्यातील बाबुराव बोडरे यांच्या जोडीने पटकावले.

या शर्यतीत प्रत्येक फेरीत सात जोडयांच्या जोडया लावून ४४ फेऱ्या निश्चित करुन शेवटच्या उपांत्य फेरीपर्यंत सात फेऱ्या निवडण्यात आल्या. सदरच्या सात फेऱ्यात दोन अनुक्रमे पहील्या तीन नंबरच्या बक्षीसासाठी निवड करण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस ५१ हजार रुपये निम गावच्या कैलास मगर यांनी ठेवले होते ते बक्षीस माण तालुक्यातील बाबुराव बोडरे यांच्या जोडीने पटकावले तर दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस राहुल जावळे, हनुमंत राऊत ,बंटी काळे यांनी ३१ हजाराचे ठेवले होते ते फळवणी गावच्या तुकाराम आवताडे यांच्या बैलगाडीने पटकाविले. तर तिन नंबरचे बक्षीस २१ हजार रुपये नागेश लेंगरे यांनी ठेवले होते ते शेवरे गावच्या किरण खताळ यांच्या बैलगाडीने पटकाविले. उर्वरित चार बैलगाडयांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. यावेळी पंच म्हणून आकाश सिद, समालोचक म्हणून सुनिल मोरे व संपत वाघमोडे यांनी काम पाहीले. या स्पर्धेसाठी शिवा डा्व्हवर, गणेश लेंगरे, नाना चोरमले, कैलास मगर, विश्वनाथ मगर, ६५ फाटा ग्रुप मित्र मंडळ, सिद्धनाथ गणेश मित्र मंडळ, तसेच कुसमोड, मगराचे निमगाव सिमेवरील मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.

## विकास आराखड्याच्या सादरीकरणात मोजक्याच मंडळींची उपस्थिती

### पाळली गेली गुप्तता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ मार्च-**

पंढरपूर विकास आराखड्याचे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ज्यावेळी प्रेझेंटेशन द्यावयाचे होते, त्यावेळी केवळ बोटावर मोजण्या इतक्याच महत्वाच्या मंडळींची उपस्थिती दिसत होती. विशेष म्हणजे या बैठकीसाठी स्थानिक आमदार किंवा शासकीय विभागाचे इतर अधिकारी, स्थानिक अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांना देखील यामध्ये सहभागी करुन घेण्यात आलेले नव्हते. एवढी कमालीची गुप्तता किंवा दक्षता यावेळी प्रशासनाकडून पाळण्यात आलेली होती. पंढरपूर विकास आराखड्याचे प्रशासनाने तयार केलेले प्रेझेंटेशन पाहण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री शनिवारी खास पंढरपूर दौऱ्यावर आलेले होते. मुळातच या दौऱ्याबाबत प्रशासनाकडून अगोदपासूनच कोणताही गवगौवा करण्यात आलेला नव्हता. दरम्यान शुक्रवारी (ता.२८) दुपार पासून मुख्यमंत्र्यांच्या पंढरपूर दौऱ्याबाबत स्थानिक प्रशासनाकडून संकेत मिळू लागलेले होते. दरम्यान मुख्यमंत्र्यांचा अधिकृत शासकीय दौरा शुक्रवारी सायंकाळी उशिरा जिल्हा माहिती कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात आला होता. दरम्यान येथील विशामगृहा मध्ये दुपारी मुख्यमंत्र्यांना पंढरपूर विकास आराखड्याचे (कॉरिडोर) जिल्हा प्रशासनाकडून प्रेझेंटेशन देण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि अधिकारीस्तरावर विभागीय आयुक्त चंद्रकांत फुलकुंडवार, विशेष पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी आदी या बैठकीसाठी उपस्थित होते. यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आर्शीर्वाद यांनी स्वत: पंढरपूर विकास आराखड्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना सविस्तर माहिती दिल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना आराखड्या संदर्भातील प्रेझेंटेशन देतानाच्या बैठकीसाठी केवळ चार ते पाच महत्वाच्या मंडळींची उपस्थित होती.

### ॥ उसंतवाणी ॥

१४६४



इंग्लंडात दीदी । भाषण जोरात ।
प्रश्न विरोधात । बरसले ॥१॥

उभे आडवे ये । प्रश्न विकासाचे ।
'टाटा' सिंगुरचे । टोकदार ॥२॥

हिंदूंचा का केला । सांगा अपमान ।
का मुसलमान । गोंजारिले? ॥३॥

मेडिकल सारे । 'कार'नामे सांगा ।
पलटला टांगा । कायद्याचा ॥४॥

निवडणूक ती । आली हाकेवरी ।
जीव खालीवरी । ममताचा ॥५॥

नाचती ही भुते । जुन्या त्या पापांची ।
हिरव्या सापाची । लाल कधी ॥६॥

कांत परदेशी । मिळे चपराक ।
ओसरला धाक । ममताचा ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## मुख्यमंत्री फडणवीस यांचे सुजितसिंह ठाकूर यांच्याकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज २९ मार्च रोजी श्री क्षेत्र तुळजापूर येथे आई श्री तुळजाभवानी देवीजींच्या दर्शनासाठी नळदुर्ग रोडवरील हेलिपॅड येथे आगमन झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांचे आगमन प्रसंगी मित्राचे उपाध्यक्ष तथा तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील,



माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी आमदार अभिमन्यू पवार, माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक विरेश मिश्र, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव उपस्थित होते.

यावेळी त्यांनी देखील पुष्पगुच्छ देऊन मुख्यमंत्री महोदयांचे स्वागत केले.

## संक्षिप्त वृत्त...



### ॲड. व्यंकटराव गुंड यांनी केले मुख्यमंत्र्यांचे स्वागत

**धाराशिव, दि.२९ मार्च -**

आज (दि.२९) तुळजापूर येथे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले असता भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड-पाडोळीकर यांनी रूपामाता परिवाराच्या वतीने मुख्यमंत्र्यांचे स्वागत करण्यात केले. महाराष्ट्र कर्नाटक राज्यातील गूळपावडर कारखान्यांच्या संघटनेचे कार्याध्यक्ष या नात्याने गुंड यांनी गूळपावडर कारखान्यांच्या सध्याच्या समस्याबाबत मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य अनिल काळे, श्री सिद्धिविनायक उद्योगसमूहाचे अध्यक्ष दत्ता कुलकर्णी, संघटनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### संघटकपदी शिवाजी येवारे यांची निवड

**परंडा, दि.२९ मार्च -**

प्रत्येक तीन वर्षाला फेर रचना करण्याच्या अनुषंगाने व सावता परिषदेच्या संघटनात्मक धोरणाला अनुसरून संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे यांच्या मार्गदर्शनानुसार व सावता परिषदेचे महाराष्ट्र प्रभारी मयूर वैद्य तसेच प्रदेश कार्याध्यक्ष संतोष राजगुरू यांच्या सहकार्याने पुढील तीन वर्षासाठी प्रदेशाध्यक्ष या नात्याने पुढील प्रमाणे प्रदेश कार्यकारणी जाहीर केली. त्यात परंडा येथील रहिवासी शिवाजी येवारे यांची मुख्य प्रदेश संघटक म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीचे सावता परिषद तसेच भांडगाव तालुका परंडा सावता परिषद यांच्या वतीने सत्कार करून पुढील कार्यासाठी अभिनंदन व शुभेच्छा देण्यात आले आहेत.



### यशराज पाचंगे पंच परीक्षा उत्तीर्ण

**जळकोट, दि.२९ मार्च -**

धाराशिव येथील मधुकरराव पवार अध्यापक विद्यालयाचा डी.एड. प्रथम वर्षाचा विद्यार्थी यशराज विक्रम पाचंगे यांनी भारतीय लाठी महासंघ, महाराष्ट्र व भारतीय लाठी महासंघ, नवी मुंबई, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रयत शिक्षण संस्थेच्या मैदानावर घेण्यात आलेल्या लाठीकाठी स्पर्धेदरम्यान लाठी काठी प्रशिक्षणार्थी यांची पंच परीक्षा घेण्यात आली. या पंच परिक्षेवेळी लाठी महासंघाचे अध्यक्ष शिवराम भोसले, उपाध्यक्ष सुरेंद्र शिंदे, सचिव अश्विन कडलास्कर यांनी पंच परीक्षा घेतली. यामध्ये यशराज पाचंगे यांनी उत्तम यश प्राप्त केल्याबद्दल मधुकरराव पवार अध्यापक विद्यालयाचे अध्यक्ष अशोक पवार, उपाध्यक्ष अभिजीत पवार, सचिव निर्मलाताई हूटगी, प्राचार्य डॉ. विलास शिनगारे, प्रा. गणेश कदम, प्रा. अमृता पंढरपूरकर यांनी यशराज पाचंगे याचे कौतुक केले आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे मंदिरात स्वागत

**धाराशिव, दि.२९ मार्च -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज श्रीक्षेत्र येथे श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात आगमन झाले. संबळ वाद्याच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मित्राचे उपाध्याय तथा मंदिर विश्वस्त पाटील, फडणवीस यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, दिलीप गावडे, पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव उपस्थित होते.

## ५०० वर्षे अबाधित राहील असे मंदिराचे दर्जेदार काम करा...

# महत्वाच्या कामांना तातडीने निधी उपलब्ध करून देऊ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. मंदीर जीर्णोद्धाराचे काम पुढील किमान ५०० वर्षे अबाधित राहील अशा प्रकारचे गुणवत्ता पूर्ण काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले व मंदिरातील सुरु असलेल्या विकास कामांची पाहणी करून श्रीक्षेत्र तुळजापूर मंदीर व परिसर विकास आराखड्याची बैठक घेतली. यावेळी आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी लक्ष देऊन अतिशय उत्कृष्ट आराखडा बनविला असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. सदरील बैठकीस आ. राणाजगजितसिंह पाटील, विभागीय आयुक्त, पोलीस महानिरीक्षक, जिल्हाधिकारी, मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव यांच्यासह वास्तु विशारद व पुरातत्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पहिल्या टप्प्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करा, यासाठी आवश्यक तो निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याचे त्यांनी मान्य केले. आगामी दोन वर्षात मंदीर जीर्णोध्दाराचे काम पूर्ण करण्यासह किमान पुढील ५०० वर्ष हे काम अबाधित राहील अशा प्रकारचे दर्जेदार काम करण्याच्या सुचना त्यांनी दिल्या.

पुढील दोन वर्षात या तीर्थक्षेत्राचा कायापालट होणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

मंदीर पुनरबांधणीच्या कामात भवानी शंकर मंडपासमोरील काही स्तंभ बदलावे लागणार असून या ऐतिहासिक स्तंभाच्या कलाकृतीचे अनावरण मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आले.

जे स्तंभ बदलावे लागणार आहेत, त्यावरील कोरीव काम ८ महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. शारदीय नवरात्र महोत्सवानंतर प्रत्यक्षात हे स्तंभ जागेवर आणून मंदिराचे काम सुरू करून सहा महिन्यात ते पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

रुपये १८६६ कोटीच्या श्री तुळजाभवानी मंदीर व परिसर विकास आराखड्यास उच्चाधिकार समितीची मान्यता मिळालेली आहे. यामध्ये दर्शन मंडप, भव्य प्रवेशद्वार, आकर्षक कमानी, छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी माता तलवार देतानाचे शिल्प, लेझर शो, बाग-बगीचा या प्रमुख बाबींचा समावेश आहे.

## श्री तुळजाभवानी चरणी...

# अज्ञात भक्ताकडून १ किलो १०० ग्रॅम वजनाची सोन्याची बिस्किटे अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ मार्च -**

नियमित मोजणीसाठी शुक्रवार दि.२८ मार्च रोजी तुळजाभवानी मंदिरातील दानपेटया उघडल्या असता देवीजींच्या मूळ गभाऱ्यासमोर असलेल्या चोपदार दरवाजातील सिंहासन पेटी क्र.२ मध्ये सोन्याची ११ बिस्किटे आढळून आली. यातील प्रत्येक बिस्कीट १०० ग्रॅम वजनाचे असून त्याचे एकूण वजन ११०० ग्रॅम आहे. बाजार भावानुसार या सोन्याची किंमत जवळपास १ कोटी इतकी आहे.

मंदिर संस्थान येथे दानपेट्यांची मोजणी दर सोमवार, बुधवार आणि शुक्रवारी होत असल्याने हे दान बुधवार किंवा गुरुवारी झाले आहे.

या बिस्किटांवर त्याचे वजन १०० ग्रॅम आणि शुद्धता ९९९.0 असे लिहिले आहे. अशा प्रकारे दान करताना भाविकांना सुरक्षित वातावरण मंदिर परिसर व गाभाऱ्यात ठेवणे तसेच भाविकांचे दान योग्य ठिकाणी जाईल याबाबत योग्य दक्षता मंदिर संस्थानचे सुरक्षा अधिकारी व कर्मचारी घेत असतात.

यास्तव कौतुकाची थाप म्हणून मंदिर संस्थानकडून कर्तव्यावर उपस्थित कर्मचाऱ्यांचा श्रीफळ व देवींजींचा फोटो देऊन सन्मान केला.

# कळंब शहरात महिलेची हत्या

## अनैतिक संबंधातुन घटना घडल्याची चर्चा...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ मार्च -**

शहरात एका महिलेची हत्या झाल्याची धक्कादायक घटनासमोर आली आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून, वेगवेगळे तर्क-वितर्क लावले जात आहेत. कुठल्या कारणाने हत्या झाली. याबाबत अधिकृत माहिती समोर आली नसली तरी अनैतिक संबंधातून हा प्रकार झाला असावा, अशी चर्चा सध्या सुरू आहे. या प्रकरणाचा सखोल तपास पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे शहर आणि परिसरात दहशत पसरली आहे.

शहरातील द्वारका नगरीत राहणाऱ्या लोकांना २ दिवसांपासून उग्र वास येत होता. कसला वास येतो म्हणून त्यांनी गुरुवारी पोलिसांना संपर्क केला. ज्या घरातून वास येत होता. त्या घराला बाहेरून कुलूप लावलेले होते. दरवाजा तोडून आत प्रवेश केल्यानंतर संबंधित महिलेचा सडलेल्या अवस्थेत मृतदेह पोलिसांना आढळला. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की, कळंब शहरातील द्वारका नगरीत मनीषा कारभारी-बिडवे नावाची महिला मागील काही वर्षांपासून एकटी राहत होती. वसाहतीतील लोकांना तिच्या घराकडून उग्र वास येत होता. पोलिसांना संपर्क केल्यावर पुढील प्रकार समोर आला आहे. प्राथमिक दृष्ट्या या महिलेचा खून झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळतेय. या बाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून विजेत्या दिव्यांग खेळाडूंचा सत्कार

### विजेत्यांना मिळणार १० हजारांचे बक्षीस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर २१ ते २३ मार्च दरम्यान पार पडलेल्या राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत धाराशिवच्या दिव्यांग खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत एकूण ५० पदके पटकाविली. यामध्ये २९ सुवर्ण,१३ रौप्य आणि ८ कांस्य पदकांचा समावेश आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार व जि.प.च्या समाज कल्याण विभागाच्या वतीने विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभात जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार, जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरावत तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून सुवर्णपदक



विजेत्या २९ खेळाडूंना प्रत्येकी १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. जिल्हा समाज कल्याण अधिकारी खमितकर यांनी प्रास्ताविकात जिल्ह्यात दिव्यांग क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. यामुळे भविष्यात दिव्यांग खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करण्यास मदत होईल. या स्पर्धेत अस्थिव्यंग विद्यार्थ्यांनी १६ सुवर्ण, ८ रौप्य, ६ कांस्य असे एकूण ३० पदके, मतिमंद विद्यार्थ्यांनी ८ सुवर्ण, २ रौप्य, १ कांस्य असे एकूण ११ पदके, बहुविकलांग विद्यार्थ्यांनी ५ सुवर्ण, ४ रौप्य एकूण ९ पदके पटकाविली.

जिल्ह्याने या स्पर्धेत अस्थिव्यंग, मतिमंद आणि बहुविकलांग गटात उपविजेतेपद मिळवत क्रीडाक्षेत्रात भरीव योगदान दिले. कार्यक्रमाला दिव्यांग कल्याण विभागाचे अधिकारी प्रशिक्षक, विजेते खेळाडू आणि सहाय्यक उपस्थित होते.

### सर्व शेतकऱ्यांनी आपली फार्मर आयडी काढून घ्यावा : तहसीलदार कोळेकर

**लोहारा, दि.२९ मार्च -**

कृषी विभागाच्या पीएम किसान व पीकविमा तसेच महाडीबीटी व पोर्टल वरील विविध योजना नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोक्रा) नैसर्गिक आपत्ती अनुदान कर्ज या सारख्या इतर योजनाचा लाभ घेण्यासाठी लोहारा तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपली ॲग्रिस्टिक प्रकल्पातार्गत शेतकरी बांधवांनी दि.३१ मार्च रोजीपर्यंत आपल्या जवळच्या सीएससी केंद्रावर जाऊन आपला शेतकरी ओळख क्रमांक व फार्मर आयडी काढून घ्यावे, असे आव्हान तहसिल कार्यालय वतीने करण्यात आले आहे.

# एनव्हीपी शुगरचा गुढी पाडव्यानिमित्त १०० रुपयांचा दुसरा हप्ता बँक खात्यात वर्ग

### शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन ऊसबिल घ्यावे : चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

एनव्हीपी शुगर प्रा.लि. जागजी कारखान्याच्या वतीने सन २०२४-२५ च्या प्रथम गळीत हंगामात गाळपास आलेल्या उसाला प्रतिटन १०० रुपये प्रमाणे दुसरा हप्ता गुढीपाडवा सणाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला आहे.

एनव्हीपी शुगर कारखान्याने प्रथम गळीत हंगामात ऊस उत्पादक शेतकरी, वाहन मालक, तोडणी ठेकेदार, चालक, ऊस उत्पादक शेतकरी, खातेप्रमुख, कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने कमी कालावधीत १ लाख २ हजार मे. टन यशस्वी गाळप केले आहे. शेतकऱ्यांना ऊस दिल्यानंतर पंधरा दिवसांत प्रत्येक महिन्याच्या १ व १६ तारखेला संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात ऊसबिल जमा करून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे.

तरी ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे. अशा शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे.





तसेच ज्यांनी खाते दिले नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. धाराशिव बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे असे आवाहन चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

# येडशी ते बोरगाव (काळे) पर्यंतच्या चौपदरीकरणाच्या प्रत्यक्ष भुसंपादनाला सुरुवात : खा. ओम राजेनिंबाळकर

## भुसंपादनासाठी उपविभागीय अधिकारी कळंब, धाराशिव व लातूर यांची नियुक्ती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

धाराशिव व लातूर जिल्हयातील चौपदरीकरणाकरीता विकासाला गती देण्यासाठी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून, भारत सरकारच्या सड़क परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने येडशी ते बोरगाव (काळे) (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६३) च्या पेव्ड शोल्डर असलेल्या फोर लेनमध्ये आवश्यक जमिनीचे अधिग्रहण करण्यास अधिकृत मान्यता दिली आहे.

केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा उपयोग करून धाराशिव (उस्मानाबाद), कळंब आणि लातूर या भागांतील उप-विभागीय अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे. अधिग्रहीत होणाऱ्या जमिनीचे तपशील:

उपविभागीय अधिकारी, धाराशिव महामार्ग टप्पा: कि.मी. २०.४७ ते कि.मी. ३५.४ तालुका: धाराशिव, गावे : कसबे तडवळे, दुधगाव, जवळे (दु), येडशी, ढोकी, कोळेगाव, घोगरेवाडी.

उपविभागीय अधिकारी, कळंब महामार्ग टप्पा: कि.मी. ३५.४ ते कि.मी. ३८.८ तालुका : कळंब गावे : वाठवडा, ढोराळा. उपविभागीय अधिकारी, लातूर महामार्ग टप्पा : कि.मी. ३८.८ ते कि.मी. ८८.१५ तालुका : लातूर गावे : मुरुड बु, करकट्टा, बोरगाव बु, रामेगाव, मुरुड अकोला, माखरा, शेलगाव (दि.), एरंडगाव, शेलगाव (ज.), वडगांव (ज.). खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने लोकसभेत लोकप्रतिनिधींना दिलेल्या आयोगांचा वापर करत ह्या महामार्गाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी अनेक वेळा नितीन गडकरी यांची भेट घेतली होती.

धाराशिव, कळंब आणि लातूर परिसरातील नागरिकांची वाहतूक अधिक सुरक्षित आणि वेगवान करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्ग ६३ चे चौपदरीकरण हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांना आणि



व्यापार-उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे.

केंद्र सरकारकडून मंजुरी मिळवण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाल्याचा आनंद आहे.

पुढील टप्प्यात काम लवकर पूर्ण व्हावे, यासाठीही मी संबंधित यंत्रणांशी संपर्क साधणार आहे, असे खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर यांनी सांगितले.

या निर्णयामुळे धाराशिव, कळंब आणि लातूर जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार असून, महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील.

# राणा बनसोडे यांची शिवसेनेत घरवापसी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

धाराशिव नगरपालिका माजी नगरसेवक राणा बनसोडे यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत घरवापसी केली.

खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील यांच्यासह इतर शिवसैनिकांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षात त्यांचे स्वागत करून पुढील सामाजिक व राजकीय कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

भाजपच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी आमच्या या शिलेदाराची दिशाभूल करून भाजपात प्रवेश करण्यासाठी प्रवृत्त केले होते.

प्रवेश करून घेताना सांगितलेल्या काही बाबी असत्य असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत घरवापसी केली.

यावेळी शहरप्रमुख सोमनाथ गुरव, युवासेना शहरप्रमुख रवी वाघमारे, माजी नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, पंकज पाटील, राहुल बनसोडे, प्रताप शेंडगे, रियाज भाई, आनंद बनसोडे, रवी कोरे, शाहबाज पठाण आदी उपस्थित होते.

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ॲड. व्यंकटराव गुंड यांच्या उपस्थितीत बुथ समिती बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

तुरोरी (ता. उमरगा) येथे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अँड. व्यंकटराव गुंड पाडोळीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बूथ समिती अध्यक्ष बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये नवीन बूथ अध्यक्ष यांना निवडीचे पत्र देऊन सत्कार करून पक्ष संघटन वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



या बैठकीमध्ये युवराज सुरेश जाधव, बालाजी विश्वनाथ माणिकवार, पंडित शंकरराव शिंदे, शशिकांत भाऊराव बाळेकर, भरत रावसाहेब जाधव, ज्ञानेश्वर दाजी पाटील या नवीन सहा बूथ अध्यक्ष यांची निवड करण्यात आली.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष माधव पवार, तालुकाध्यक्ष शहाजी पाटील, उद्योग आघाडीचे श्रीकांत मीणियार, विकास जाधव, ग्राम समिती अध्यक्ष भगवान शिंदे, शाहूराज भोसले, चैतन्य स्वामी, सचिन जाधव, दिलीप भुसारे, बळीराम जाधव, पवन शहापूरे, नंदकिशोर पाटील, दयानंद मंडले, चैतन्य सूर्यवंशी, अशोक बिराजदार इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकरी उपस्थित होते.



### येत्या दोन वर्षात तुळजापूरनगरीचा कायापालट होणार...

# आराखड्यातील महत्त्वाच्या कामांना तातडीने निधी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

तुळजापूर विकास आराखड्याला शासनाने तत्वत: मान्यता दिली असून यातील महत्त्वाच्या कामांना तातडीने निधी वितरीत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आराखड्यातील कामांमुळे येत्या दोन वर्षात तुळजापूरचा कायापालट झालेला दिसेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. त्यानंतर मंदिर संस्थानच्या प्रशासकीय इमारतीतील सभागृहात मुख्यमंत्र्यांसमोर तुळजापूर विकास आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मित्राचे उपाध्यक्ष तथा मंदिर संस्थानचे विश्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार अभिमन्यू पवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, मंदिर संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते.

सादरीकरणादरम्यान जिल्हाधिकारी पूजार यांनी विकास आराखडा राबवताना एकूण ७३ एकर भूसंपादनाची गरज असल्याचे तसेच मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीच्या बैठकीत तुळजापूर विकास आराखड्यासाठी १८६६ कोटी रूपयांचा आराखडा मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली. त्यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी भूसंपादनाच्या कामाला वेग द्यावा अशी सूचना जिल्हा प्रशासनाला केली. यामुळे आराखड्यातील कामांनाही गती मिळणार असल्याचे ते म्हणाले.

**आराखड्यातील महत्त्वाच्या बाबी**

तुळजापूरला जागतिक दर्जाचे धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यटनस्थळ म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी स्थानिक नागरिकांचा सहभाग घेत शाश्वत विकास करण्यासाठी तुळजापूर विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. भाविकांचा त्रास कमी करून त्यांना श्री तुळजाभवानी देवीचे सुलभ व जलद दर्शन मिळावे, सध्याच्या पायाभूत सुविधांचा दर्जात्मक विकास करून नवीन पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती करण्याचे काम या आराखड्याच्या अंमलबजावणीतून होणार असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.

मंदिराचा इतिहास, संस्कृती, वारसा आणि आध्यात्मिक मांगल्याची जपणूक यात होणार आहे. गर्दीचे नियोजन करताना स्मार्ट क्यू सिस्टीम, ऑनलाईन दर्शन व्यवस्था, भाविकांच्या संख्येचे नियमन, रस्त्यांचे रुंदीकरण, वैकल्पिक मार्ग तयार करणे, नवीन पार्किंग व्यवस्था, वाहन पार्किंगपासून मंदिरापर्यंतची वाहतूक सेवा, शौचालयांची संख्या वाढवणे, कचरा वर्गीकरण, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, प्राथमिक आरोग्य सुविधांचा विस्तार, विश्रांती स्थळे, भाविक सुविधा केंद्राची उभारणी, वॉटर कुलर व आरामदायक शौचालयाची सुविधा, सूचना व मार्गदर्शन करण्यासाठी डिजिटल पद्धती (प) चा वापर अशा काही सुधारणा या आराखड्यात समाविष्ट आहेत. मंदिर परिसरात मंदिर परिसीमा वाढवणे, मंदिर शिखर संवर्धन, कुंड, तीर्थ सुधारणा व संवर्धन, इतर मंदिर संवर्धन, विद्युतीकरण, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, सुरक्षा व टेहळणी व्यवस्था, वातानुकूलन यंत्रणा इत्यादीचा समावेश आराखड्यात असल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी मुख्यमंत्री यांना दिली.

**तुळजापूर हेरिटेज टूर**

आराखड्यात तुळजापूर हेरिटेज टूर विकसित करण्याचे प्रस्तावित असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. यामध्ये अष्टतीर्थ भेट व दर्शन, मुख्य मंदिर भेट व दर्शन, रामदरा तलावाच्या डोंगरावर श्री तुळजाभवानी देवी यांच्याकडून छत्रपती शिवाजी महाराजांना आशीर्वाद रूपात भवानी तलवार देतानाचे १०८ फूट उंचीचे भव्य शिल्प व शिव उद्यान, उद्यानात लाइट अँड साऊंड शो, रामदरा तलावात बोटिंगची सुविधा आदी बाबींचा समावेश आहे.

मंदिर संस्थानचे विश्वस्त आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांच्या अपेक्षेनुसार आराखड्यातील कामे दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगतांना त्यांनी मुख्यमंत्री यांचे आभारही मानले.



## धाराशिव येथील महालक्ष्मी लॉन्ड्री आगीच्या भक्षस्थानी

### आग विझवताना लॉन्ड्री मालक जखमी... लाखो रुपयांचे नुकसान...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

शहरातील समता कॉलनी मध्ये असणाऱ्या नाईकवाडी नगरच्या माने कॉम्प्लेक्स मध्ये नेताजी आबा धोंगडे यांचे महालक्ष्मी लॉन्ड्री या नावाने दुकान आहे. काल सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान बंद केले होते. पहाटेच्या सुमारास सुमारास दुकानातून अचानकपणे धूर निघत असल्याचे शेजाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी ताबडतोब दुकान मालक नेताजी धोंगडे यांना बोलवून घेतल्यानंतर आग विझवण्याचे प्रयत्न झाले. स्थानिक नागरिकांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली.

या आगीमध्ये संपूर्ण दुकान जळून खाक झाले आहे. यामध्ये दुकानातील सर्व फर्निचर टेबल कपाट खुर्च्या जळून गेल्या आहेत. महत्वाचं म्हणजे ग्राहकांचे लॉन्ड्री साठी आलेले कपडे, ड्रेस, साड्या ही जळून गेलेल्या आहेत. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आग विझवताना फर्निचरचा गरम झालेला काच फुटून लॉन्ड्री मालक नेताजी आबा धोंगडे यांच्या पायाला इजा झाली आहे. त्यांना जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात ऍडमिट करण्यात आले आहे.

आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असून दुकांनाच्या वरच्या मजल्यावर निवासी प्लॅट आहेत.

सुदैवाने आग तातडीने आटोक्यात आल्याने कोणतीही गंभीर दुर्घटना घडली नाही. जाळीत लॉन्ड्री दुकानाची आनंद नगर पोलिसांनी पाहणी करून पंचनामा केला आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री तुळजाभवानी देवींजींचे घेतले दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ मार्च -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज श्री क्षेत्र तुळजापूर येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवींजींची विधिवत पुजा करून दर्शन घेतले. यावेळी मंदिर प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी कवड्याची माळ घालून स्वागत केले. फडणवीस यांनी यावेळी भवानी शंकराचे दर्शन घेतले व तुळजाभवानी मंदिर जीर्णोद्धार व ऐतिहासिक स्तंभ कलाकृतीचे अनावरण केले.

मुख्यमंत्रीद फडणवीस यांच्या समवेत मित्राचे उपाध्यक्ष तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आ. राणाजगजितसिंह पाटील, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व पोलीस अधीक्षक संजय जाधव, विकास मलबा उपस्थित होते. फडणवीस यांनी मंदिर परिसरात पुरातत्व विभागाकडून सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. तसेच मंदिराच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराची पाहणी केली व उपस्थितांशी संवाद साधला.

## समग्र शिक्षा राष्ट्रीय आविष्कार अभियान अभ्यास दौरा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२९ मार्च -**

समग्र शिक्षा राष्ट्रीय आविष्कार अभिमान दि.२३ ते २६ मार्च या चार दिवसाचा राज्यांतर्गत अभ्यास दौरा संपन्न झाला. समग्र शिक्षा राष्ट्रीय आविष्कार अभियान जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत राज्यांतर्गत अभ्यास दौरा यशस्वीपणे संपन्न झाला.यासाठी धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांच्या संकल्पनेतून नोडल अधिकारी मैंदर्गी आर. सी. उपशिक्षणाधिकारी (प्रा) यांच्या पुढाकाराने समग्र शिक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय अविष्कार अभियानमध्ये धाराशिव जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील विविध गुणवत्तेचे निकष पूर्ण करणारी शाळांमधील विविध अभियानांतर्गत बक्षीसपात्र शाळा. पाचवी व आठवी स्कॉलरशिप व एनएमएमएस होल्डर असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद च्या शाळेतील ६७ विद्यार्थ्यांची आविष्कार अभियान अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली होती.

धाराशिव जिल्ह्यातील शैक्षणिक दृष्ट्या प्रगत शाळेतील विद्यार्थ्यांचे लर्निंग आऊट कम्स सर्वोत्तम असलेल्या शाळेतील विद्यार्थी होते.आपल्या जिल्ह्यातील मुलांनी राज्यांतर्गत अभ्यास दौऱ्यास भेट दिल्यास विद्यार्थ्यांच्या विचारांची देवाणघेवाण, संस्कृती वृद्धीकरण व आनंददायी शिक्षण प्राप्त करण्यास मदत होईल व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ होईल यासाठी हा अभ्यास दौरा विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहे. सहल प्रमुख दादाराव तेलंग व काटेकर यांच्या मदतीने हा राज्यांतर्गत अभ्यास दौरा पुणे व मुंबई येथे संपन्न झाला पुणे येथील राजीव गांधी झूलॉजिकल पार्क कात्रज, पूणे आयुका ॲस्ट्रॉनॉमिक व ॲस्ट्रो फिजिक्स सेंटर पुणे, ऐतिहासिक शनिवार वाडा. लाल महाल, इस्कॉन टेम्पल, सावित्रीबाई फुले यांनी चालू केलेली भिडे वाड्यातील मुलींसाठीची देशातील पहिली शाळा, महाराष्ट्राचे विधान भवन,गेटवे ऑफ इंडिया, ताज हॉटेल, मरीन ड्राईव्ह, गिरगाव चौपाटी, इत्यादी ऐतिहासिक, भौगोलिक व शैक्षणिक ठिकाणी विद्यार्थ्यांनी भेट दिली. अभ्यास दौऱ्यासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विधान भवन येथील अधिवेशन कामकाज प्रत्यक्षदर्शी पाहता आले. आमदार कैलास घाडगे-पाटील, उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी, माजी खासदार प्रल्हाद कुलकर्णी, नेताजी पाटील यांनी अभिनंदन केले.

या अभ्यास दौऱ्याचे संयोजन ट्रॅव्हबल एजन्सी लातूरचे विकास जाधव यांनी उत्तम रित्या केले. सहलीसाठी शिक्षिका जयश्री माळी धाराशिव, दीपमाला खडके तुळजापूर, सविता मेटे कळंब शांता ठाकूर परांडा तसेच शिक्षक पद्माकर मोरे, खांडेक, हनुमंत शिंदे, क्षीरसाग वाशी व एसटी चालकांच्या सहकार्यांने अंतर्गत अभ्यास दौरा संपन्न झाला.

## बाल उधानासमोरील नालीवरील स्लॅब दुरुस्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ मार्च -**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती कळंब शहरात उत्साहाने साजरी होत आहे शहरातील बालोद्यान येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्ण कृती पुतळा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी हजारो भीमभक्त या उद्यानात आपली उपस्थिती लावतात.



या ठिकाणी मोठी गर्दी होत असते यामध्ये वृद्ध नागरिक, महिला,पुरुष व बालक यांचा समावेश असतो. याचबरोबर येथे बालोद्यान असल्याने चिमुकली मुल व त्यांना घेऊन वृद्ध आजोबा ही येत असतात. या बालोद्यानाच्या प्रवेशद्वारा समोर मोठा नाला आहे. या नाल्यावरील स्लॅब फुटला आहे. यामुळे लहान, मुले व वृद्ध नागरिक या खड्ड्यात पडण्याची शक्यता आहे. सदरील नाल्यावरील स्लॅब टाकण्याचे काम खामगांव पंढरपूर महामार्ग कामांतर्गत संबंधित महामार्ग कंत्राटी मेघा इंजीनियरिंग कंपनी यांनी केले आहे. परंतु काम झाल्यानंतर काही दिवसातच हा स्लॅब फुटला असून महामार्ग कंत्राटी कंपनी याकडे लक्ष देत नाही.

सदरील नाल्या वरील स्लॅबचे काम तात्काळ सुरू करावे अशी मागणी धाराशिव जिल्हा बहुजन जनता पक्षाच्यावतीने संजय पाटील उपविभागीय अधिकारी कळंब यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## पीएम किसन योजनेत २०१९ च्या नंतरील शेतकऱ्यांना समाविष्ट करा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ मार्च -**

पी एम किसान योजनेच्या अंतर्गत शेतकऱ्यांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने केंद्र शासनाने व खास करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून ही योजना शेतकऱ्यांसाठी देशभरात अमलात आणली गेली. सुरुवातीस अल्पकालावधीतच बऱ्याच शेतकऱ्यांनी नोंदणी केली. त्याप्रमाणे आत्तापर्यंत अविरत शेतकऱ्यांना रक्कम प्राप्त होत आहे. त्यानंतर केंद्र शासनाने या योजनेत काही सुधारणा केल्या. पारदर्शकता यावी यासाठी ही सर्व प्रक्रिया ऑनलाइन नोंदणी करण्याची दुरुस्ती केली. शेतकऱ्यांना मिळणारा हप्ता किंवा रक्कम ही त्यांच्या खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे ट्रान्सफर करण्याचे ठरवले. इ.स. २०१९ पर्यंतच्याच शेतकऱ्यांना ही योजना लागू राहील असे ठरवले. या योजनेमध्ये अद्यापपर्यंत कसलीही दुरुस्ती केलेली नाही.

नवीन खरेदी खताअन्वये व संमतीपत्रा आधारे आई-वडिलांपासून शेतीची वाटणी, फोड करून घेतलेले शेतकरी वर्ग यांना या योजनेचे दरवाजे बंद केले. केवळ जो शेतकरी मयत झाला असेल त्यांच्या वारसा पैकी एकालाच फक्त वारसा फेर आधारे आलेल्या नोंदी असतील तरच त्यांना ही योजना चालू ठेवली. त्यातही अशा शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज भरत असताना नाहक त्रासाला, समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

हा फॉर्म भरत असताना डॉक्युमेंट्स अपलोड करताना त्याची मर्यादा २०० केबी एवढीच ठेवली असल्याने त्यात सोबत जोडावयाचे डॉक्युमेंट्स एक तर बसत नाहीत आणि बसले तर ते डॉक्युमेंट संबंधित कार्यालयात छाननी करते वेळेस अधिकाऱ्यांना सुस्पष्ट दिसत नाहीत. यामुळे शेतकऱ्यांचे अर्ज बऱ्याच प्रमाणात बाद होत आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांना परत डॉक्युमेंट्स किंवा त्रुटीची पूर्तता करण्यास बराच त्रास सहन करावा लागत आहे. शेतातील कामे सोडून तालुक्याच्या ठिकाणी शेतकरी हेलपाटे मारत आहेत.

वेळेचा अपव्यय, आर्थिक भुर्दंड, नुकसान सहन करावा लागत आहे. याबाबत शेतकऱ्यांनी संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधून ही बाब निदर्शनास आणून दिली असतात त्यांनी ही योजना केंद्र शासनाची असल्याने त्यात दुरुस्तीची हातबलता दर्शवली.

यामुळे शेतकरी वर्गांतून २०० केबीची मर्यादा वाढवण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नव्याने झालेले शेतकरी या योजनेत समाविष्ट करून घ्यावे व या योजनेची व्याप्ती वाढवावी, अशी मागणी करीत आहेत.

> कुठलीही योजना तळागळापर्यंत पोहोंचली तरच यशस्वी ठरते. आधीच तांत्रिकदृष्ट्या अज्ञानी असलेल्या शेतकऱ्यांना पी.एम. किसान योजनेच्या किचकट ऑनलाईन पद्धतीमूळे प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामूळे अनेकजण या योजनेपासून वंचित राहत आहेत. योजनेचा लाभ घेण्यातील तांत्रिक अडचणी दूर करुन प्रत्येक तालुक्याला अशा प्रकारच्या योजनांची प्रक्रिया पार पाडण्यासाठी 'तंत्र मित्रांची' नेमणूक करणेदेखील आवश्यक आहे. योजना मिळवण्याची प्रक्रिया सुलभ व सोपी करण्यासाठी शासन व प्रशासन पावले उचलेल अशी आशा करुया. **- ॲड. शीतल चव्हाण**

> प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे १ फेब्रुवारी २०१९ पूर्वीचे शेतीची मालकी असलेली कुटुंबे पात्र आहेत. पात्र शेतकऱ्यांची नोंदणी ते लाभ वितरण ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन आहे.पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्र जमिन मालकी पुरावा सातबारा उतारा, फेरफार नक्कल, आधार कार्ड इत्यादी कागदपत्र स्वंयनोंदणी करताना अपलोड करणे आवश्यक आहे. मार्गदर्शक सूचनेप्रमाणे फाईल अपलोड करताना साईज ही२00ज्ञल असावी. परंतु बहुतांश शेतकऱ्यांनी कागदपत्र अपलोड केली असता सुस्पष्ट दिसत नाहीत. अशा वेळेस स्पष्ट कागदपत्र अपलोड करण्यासाठी पुन्हा फाईल शेतकऱ्यांकडे पाठविण्यात येते.याबाबत येणाऱ्या अडचणी विषयी वरिष्ठांना कळविण्यात आले आहे.
> **- ज्ञानोबा रितापुरे,** तालुका कृषी अधिकारी



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रक्तदान हे पवित्र काम : डॉ.बाबासाहेब ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे दर्जी बोरगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी वाढावी, आपणही समाजाचे देणे लागतो ही भावना त्यांच्यात निर्माण व्हावी यासाठी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या वेळी अध्यक्ष म्हणून पोलीस पाटील, राजेभाऊ माने, उद्घाटक म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सय्यद रहमान, डॉ.बाबासाहेब ठोंबरे, कालिदास लांडगे, धनराज बिरादार, संतोष कासले, किशोर पवार, अमित पुरकज, महेंद्र गांधले हे उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व वसंतराव नाईक यांचे प्रतिमापूजन झाले. त्यानंतर स्वागतगीत गायनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. डॉ.बाबासाहेब ठोंबरे मार्गदर्शन करताना म्हणाले की, स्वतःच्या शरीरातील महत्वाचा घटक दान करणे यासारखे जगात दान नाही म्हणून रक्तदान करणे हे अमुल्य दान आहे. रक्तदानाबरोबर नैतिक अधिष्ठान असणे आवश्यक आहे. दान देत असताना चांगले असावे आणि सत्पात्री असावे.

विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले पाहिजे, असे सांगून त्यांनी रक्तदान हे पवित्र काम असल्याचे नमूद केले. उद्घाटक सय्यद रहमान म्हणाले की, या शिबिरातून विद्यार्थी उच्च विचार व नैतिकतेचे मूल्य शिकत आहेत.

श्री.कालिदास लांडगे म्हणाले की, विद्यार्थी या शिबिरातून ग्रामीण भागाचा अनुभव घेवून विविध प्रश्न समजावून घेत आहेत. असे सांगून त्यांनी रक्तदानाचे महत्व विषद केले. अध्यक्षीय समारोपात पोलीस पाटील श्री.राजेभाऊ माने यांनी केला. यावेळी अनेक मान्यवर, नागरिक, कृषिदूत, कृषिकन्या, शेतकरी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## महात्मा बसवण्णा जयंती; विविध उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**



महात्मा बसवण्णा जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भजन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धा या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच इष्टलिंग सामूहिक पूजा, इष्टलिंगचे महत्त्व व इष्टलिंग दीक्षा कार्यक्रम होणार आहेत.

यानिमित्त महाराष्ट्रात लिंगायत चळवळीतील विचारवंतांना महाराष्ट्र बसव पुरस्कार देण्यात येणार आहेत. तसेच महात्मा बसवण्णा वेबसाईटचे अनावरण होणार आहे. लातूर, शिरूर अनंतपाळ, उदगीर व पुणे या ठिकाणी जागर समतेचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत महात्मा बसवण्णा जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी लताताई मुद्दे यांची एका बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. डॉ. शिवलिंग शिवाचार्य सत्संग समितीच्या त्या प्रमुख आहेत. त्यांनी आजपर्यंत ९५ सत्संगचे यशस्वी आयोजन केले आहे.

## ३० व ३१ मार्च या सुट्टीच्या दिवशीही सुरु राहणार वीजबील भरणा केंद्रे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
महावितरण समोरील सध्याच्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर आणि थकबाकी वसुलीची गंभीर गरज लक्षात घेता ३० आणि ३१ मार्च २०२५ या सुट्ट्यांच्या काळातही महावितरणची सर्व वीजबील भरणा केंद्र कार्यरत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याचा थकीत वीजबील असलेल्या ग्राहकांनी लाभ घ्यावा असे अवाहन महावितरणने केले आहे.

आर्थिक वर्ष संपत असताना, महसूल संकलन जास्तीत जास्त करण्यासाठी आणि कंपनीची आर्थिक स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी सुटटीच्या दिवशीही थकीत वीजबील जमा होणे महत्त्वाचे आहेत. थकबाकी वसूल करण्याचे महत्त्व लक्षात घेता, सर्व संबंधित कार्यालयांना ३० आणि ३१ मार्च या तारखांना सर्व वीजबील भरणा केंद्र सुरू ठेवण्यासाठी आवश्यक सूचना जारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर महावितरणचे मोबाईल पे, वॉलेट तसेच ऑनलाईन असणाऱ्या विविध पर्यायांचा वापर करत वीज ग्राहकांनी आपल्या थकीत व चालू वीज बिलाचा भरणा करून महावितरणला सहकार्य करावे तसेच उन्हाळ्याच्या काळात वीजपुरवठा खंडीत होवू नये यासाठी त्वरीत वीजबील भरावे असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

## माजी आ.कव्हेकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
शहरातील पद्मा नगर परिसरातील विठू माऊली रेसिडेन्सीला भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी सदिच्छा भेट दिली असता के.पी.झेड. बिल्डर्स अँड डेव्हलपर्सचे संचालक बालाजी पुळकुटे यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला.

यावेळी विठूमाऊली रेसिडेन्सिचे तुकाराम किंचे, व्यंकटेश झुल्फे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती रोहिदास वाघमारे, अशोकराव शेळके, सचिन शिंदे आदिंची उपस्थिती होती.

## डॉ. नितीन शितोळे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
येथील प्रख्यात दंत चिकित्सक तथा क्रोनोज जीमचे संचालक डॉ. नितीन



संदीपान शितोळे (वय ५२) यांचे शुक्रवारी (दि. २८) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास हाकेनगरस्थित निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. मुळचे ते नायगाव (ता. कळंब, जि. धाराशिव) येथील रहिवासी होते. तेरणा सहकारी साखर कारखान्याने माजी संचालक संदीपान शितोळे यांचे ते चिरंजीव होत. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी मारवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. लातूरच्या वैद्यकीय तसेच विविध क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय होते.

## उन्हाची तीव्रता वाढताच मागणी वाढली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
गेल्या काहि दिवसापासून शहरासह जिल्ह्यातील तापमाणात मोठ्या प्रमाणात वाढ होत चालली आहे. त्यामुळे नागरीकांकडून मोठ्या प्रमाणात शहाळयाची खरेदी करत आहेत. शहरातील बाजारपेठेत गेल्या काही दिवसापासून शहाळ्याची मागणीत वाढ झीली असून शहरातील बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात शहाळयाची आवक वाढली आहे.

शहरातील बाजारात विक्रीसाठी येणा-या शहाळ्याची आवक ही बेंगलोर, तामिळनाडू, चेन्नई, केरळ, आंध्र प्रदेश येथून होत असल्याचे व्यापारी रिहान बागवान यांनी बोलताना दिली.

शहरातील विविध भागात तसेच चौका-चौकात मागील काहि दिवसापासून किरकोळ व्यापा-यांनी शहाळे विक्रीचे दुकाने थाटले आहेत या दुकानावर येणा-या शहाळ्याचे केरळ आणि आंध्र प्रदेश येथील शहाळ्यांचे कवच पातळ असतात ते कडक उन्हामुळे ही शहाळी तडकण्याची शक्यता असते. मात्र याउलट चेन्नई येथून येणारी शहाळी कडक असल्याने त्यांची आवक व्यवस्थित होत आहे. सध्या बाजारात आठ दिवसाला चार ते पाच ट्रक भरून शहाळ्याची



आवक येत असल्याचे विक्रीत्यांनी सांगितले. सध्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने शहाळ्यांची मागणीत वाढ झाली आहे.

सध्या बाजारात आवक मुबलक प्रमाणात होत असल्याने शहाळ्याला ५० ते ६० रूपये भाव मिळत आहे. गतवर्षाप्रमाणे मार्च नंतर शहाळ्याच्या दरात वाढ होत असते. उन्हाच्या चटका वाढत जाईल तसा भाव वाढत असतात त्यामुळे यंदा शहाळ्याच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता व्यापारी वर्गानी वर्तवली आहे. शहाळ्याच्या पाण्यात कॅल्शियम, पोटॅशियम, फॉस्फरस आणि इतर पोषक तत्त्वे, पोटासंबंधी आजार असो अथवा बद्धकोष्टता यासाठी नारळ पाणी पिण्याने या समस्या दूर होतात. पचनशक्ती वाढते. तसेच रक्तदाबावर नियंत्रणासाठी नारळ पाणी उपयुक्त ठरते. वजन कमी करण्यासाठी देखील याचा फायदा होत असतो.

तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश येथून नारळ विक्रीसाठी महाराष्ट्रात आणले जातात. तसेच दक्षिण भागातील विविध राज्यांतून येणारा नारळ मुंबईत दाखल होतो आणि तो पुढे आसपासच्या बाजारपेठेत विक्रीसाठी नेला जातो. यंदा नारळाचे पीक मोठ्या प्रमाणात आले आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शहाळ्याच्या किमतीत काही प्रमाणात घट झाली आहे. जवळपास एक महिन्या नंतर दरात वाढ होतील असे व्यापाऱ्यानी सांगितले आहे.

## लातूर जिल्हा रुग्णालयाच्या जागेसाठी मिळाला निधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रयत्नामुळे गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित असलेल्या लातूरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या उभारणीचा प्रश्न मार्गी लागला आहे. या रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या मोबदल्यासाठी ३ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीला पुरवणी मागण्यांमध्ये मंजुरी देण्यात आली होती. हा निधी 'बीडीएस' प्रणालीवर वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवारी निर्गमित केला आहे.

२०१३ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली होती. १०० खाटांचे हे रुग्णालय उभारण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातून ३१ कोटी ८५ लाख रुपयांचा निधीही प्राप्त झाला आहे. या रुग्णालयासाठी नांदेड रोडवरील कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा निश्चित करण्यात



आली आहे. या जागेचा मोबदला म्हणून परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये देण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र, निधीअभावी ही कार्यवाही प्रलंबित होती. यामुळे 'माझं लातूर' परिवाराने साखळी उपोषण करून वेळोवेळी संबंधितांकडे पाठपुरावा केला.

दरम्यान, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी लातूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पहिल्याच दौऱ्यात त्यांनी हा प्रश्न मार्गी लावण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करून त्यांनी नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जिल्हा रुग्णालयाच्या जागेसाठी आवश्यक निधी पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करून घेतला. हा निधी आरोग्य विभागाकडे प्राप्त झाला आहे. तसेच परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला हा निधी वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवारी निर्गमित केला आहे.

त्यानुसार परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाला हा निधी देण्यात येणार असून जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न निकाली निघाला आहे.

## शिक्षण सहसंचालक डॉ. बच्छाव यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
पुणे येथील उच्च शिक्षण संचालनालयाचे सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांचा लातूरच्या राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे पुष्पगुच्छ व शाल देऊन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी सत्कार केला.



यावेळी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायभाये, संस्थेच्या सहसचिव तथा तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे उपस्थित होते. यावेळी डॉ. बच्छाव यांनी प्राचार्य केंद्रे यांच्यासोबत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासह अन्य विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत चर्चा केली. यावेळी उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिकांचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत २०२३, २४ या वर्षातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका, कंत्राटी कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा शुक्रवारी जि. प.च्या स्थायी समिती सभागृहात पार पडला.

कार्यक्रमाचा प्रारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने झाला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) जावेद शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, १३ अंगणवाडी सेविका, १३ मदतनीस, १३ पर्यवेक्षिका, २ विस्तार अधिकारी, ३ कंत्राटी कर्मचाऱ्यांचा उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव केला. प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) जावेद शेख यांनी केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला व बालकल्याण विभागातील कर्मचाऱ्यांचे योगदान आणि सेवाभावाला सन्मान देण्यात आला. कार्यक्रमास सीडीपीओ, सर्व विस्तार अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडीताई, मदतनीस, पर्यवेक्षिका उपस्थित होत्या.

## 'ज्ञानेश्वर भूषण' ने कशिश सय्यद सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
लातूर एज्युकेशन सोसायटीद्वारा संचलित ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातर्फे यंदापासून ज्ञानेश्वर भूषण पुरस्कार देण्यात येत असून पहिला मान इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कशिश महेबूब सय्यद हिला मिळाला. संस्थेचे उपाध्यक्ष प्रल्हादराव दुडीले व प्राचार्य एस. एम. मलवाडे यांच्या हस्ते तिला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपमु.अ. क्षीरसागर एम. के., पर्यवेक्षक बैनगिरे एम.एस., श्रीमती पाटील पी. बी., सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व अन्य शालेय उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करून विद्यालयाच्या लौकिकात भर घालणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान व्हावा तसेच भविष्यातही त्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करून देशासाठी योगदान द्यावे, या हेतूने या पुरस्काराचे वितरण करण्यात येत आहे. संस्थेचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

## लातूर जिल्हा परिषदेला राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
येथील जिल्हा परिषदेला राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धेत (२०२४, २०२५) अंतर्गत जिल्हा परिषद शाळांच्या मोकळ्या जागेवर 'नरेगा'तून क्रीडांगण उभारणी केल्याची दखल घेऊन लातूर जिल्हा परिषदेला राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

लातूर जिल्हा परिषदेने 'नरेगा' योजनेचा आधार घेऊन ११२ जिल्हा परिषद शाळांच्या मैदानावर सुसज्ज क्रीडांगण तयार केले. यातील ४५ क्रीडांगण तयार झाली असून उर्वरित, शाळांतील क्रीडांगणांची कामे प्रगतीवर आहेत. तत्कालिन मुख्य कार्यकारी



अधिकारी अनमोल सागर यांच्या कल्पनेतून जिल्हा परिषद शाळांच्या मैदानावर क्रीडांगण उभारणीचे काम सुरू झाले. पहिल्या टप्प्यात ११२ जिल्हा परिषद शाळांच्या मैदानावर क्रीडांगणाचे काम सुरू झाले. ४५ क्रीडांगणे तयार झाली. उर्वरित, ६७ जिल्हा परिषद शाळांवर क्रीडांगण उभारणीची कामे प्रगतीवर आहेत. ही क्रीडांगणे उभारण्यासाठी 'नरेगा'चा आधार घेण्यात आला. याची राज्य शासनाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धे अंतर्गत दखल घेतली. नाविण्यपूर्ण उपक्रम म्हणून लातूर जिल्हा परिषदेच्या शाळांवर विकसित केलेल्या क्रीडांगणास राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार जाहीर झाला.

'खेलो लातूर नरेगातून क्रीडांगण निर्मिती' या सदराखाली पुरस्काराची घोषणा झाली. सर्वोत्कृष्ट कल्पना व उपक्रम म्हणून शासनाने विशेष दखल घेतली. २० हजार रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

## आणखीन चार सराईत एक वर्षासाठी जिल्ह्यातून तडीपार

### पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पुन्हा चार सराईत गुन्हेगारांना एक वर्षासाठी जिल्ह्यातून तडीपार करण्याची कारवाई केली आहे. या गुन्हेगारांना जिल्ह्याच्या हद्दीच्या बाहेर सोडण्यात येत आहे.

लातूर जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत टोळी तयार करून वारंवार चार सराईत गुन्हेगार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत होते. त्यामुळे अभी उर्फ बसवेश्वर उरगुंडे-पाटील), विशाल सुभाष उरगुंडे-पाटील, संजय भारत मुळे आणि प्रसाद बब्रुवान पवार (चौघेही रा. नागझरी, ता. लातूर) या चौघांवर पोलीस अधीक्षक मुंडे यांनी तडीपारची कारवाई केली आहे. या सराईतांवर एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत समाजविघातक कारवाया करणे, परिसरातील रहिवासी नागरिकांच्या मालमत्तेला इजा पोहोचून भय निर्माण करणे, प्राणघातक शस्त्र वापरून दहशत निर्माण करणे, आजन्म कारावास किंवा अन्य कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेले गुन्हे करणे, शांतता भंग करणे, यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून यामुळे सामाजिक शांतता धोक्यात आली होती. जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी, गुन्हेगारांकडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये, यासाठी शहरात वारंवार मालमत्ताविषयी व शरीराविषयी गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून सामाजिक शांतता भंग करणाऱ्या गुन्हेगाराना एक वर्षासाठी जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले असून नमूद गुन्हेगारांना जिल्ह्याच्या हद्दीच्या बाहेर सोडण्यात येत आहे.

या आरोपींविरुध्द शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत, एमआयडीसी ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे, सहायक पोलीस निरीक्षक



सचिन द्रोणाचार्य, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस अंमलदार प्रदीप स्वामी, पोलीस अंमलदार गणेश माळवदे यांनी तडीपार प्रस्ताव तयार करून पोलीस अधीक्षक मुंडे यांच्याकडे पाठविले होते. त्यावर पोलीस अधीक्षकांनी सदर प्रस्तावांचे अवलोकन करून नमूद आरोपींमुळे सामाजिक शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने सदर सराईत गुन्हेगारांना लातूर जिल्ह्यातून तडीपार केले आहे. गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत गुन्हेगार, उपद्रवी लोकांवर जरब बसवण्यासाठी यापूर्वी अनेक गुन्हेगारांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

## आसावरी जोशी हिला 'स्टार ऑफ द सिझन अवॉर्ड'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेला 'सिंफनी ऑफ इंडिया, भारत की गुंज' या रियालिटी शो मध्ये लातूरच्या कन्या व दयानंद कला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आसावरी बोधनकर जोशी हिला भारतातून सर्वप्रथम पुरस्कार 'स्टार ऑफ द सिझन अवॉर्ड' प्राप्त झाला.

या कार्यक्रमात काही वैयक्तिक व समूह सादरीकरण होते. उपांत्य फेरीत ७ संघ सामील झाले होते. त्यात आसावरी व समूह यशस्वीरित्या पुढे आला आणि शेवटी अंतिम फेरीत मध्ये भारतातून ५ संघात मध्ये अटीतटीची स्पर्धा झाली व यात त्यांचा संघ विजेता ठरला. या यशाबद्दल तीचे अनेकांनी अभिनंदन केले.

## सेवालयाचे कार्य संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी : माधवराव पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च -**
आज समाजामध्ये विविध प्रकारच्या सामाजिक समस्या असल्याचे आपणास दिसून येते. आपल्या देशात एचआयव्हीग्रस्त बालकांसाठी सेवालयाचे कार्य आपल्या देशासाठी प्रेरणादायी आहे तेव्हा आपण प्रा. रवी बापटले यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजामध्ये कार्य केले पाहिजे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हॅप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिराचा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारपीठावर आम्ही सेवकचे संस्थापक प्रा. रवी बापटले, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक ॲड. काशिनाथ साखरे, सुपर्ण जगताप, डॉ. मनोज मोठे, डॉ. संजय गवई, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, समर्पित भावनातून काम करणाऱ्या कमी समाजामध्ये जाणवत आहे. एचआयव्ही बाधित रुग्णासाठी सेवालय उभे करणारे प्रा. रवी बापटले संघर्ष योध्दे आहेत. मनातला मानवतावादी धर्म जागृत करून समाज ऋण फेडले पाहिजे. कष्ट करून स्वतःचा उदरनिर्वाह स्वतः करणारा हाच करा ईश्वराचा पाईक असतो रुग्णांना आत्मविश्वास देऊन त्यांना आत्मनिर्भर करण्याचे काम सेवालयाने केले आहे. असेही ते म्हणाले.यावेळी बोलताना प्रदीप दिंडेगावे म्हणाले की, तरुणांमध्ये समाजभान निर्माण करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते. समाज माध्यमात वाया घालणाऱ्या तरुण पिढीने प्रा. रवी वापरले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा भिसे, जयश्री भांडे यांनी केले तर उपस्थित त्यांचे आभार डॉ. मनोहर चपळे यांनी मानले.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जागतिक रंगभूमी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी साकारले मुखवटे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२९ मार्च -**

'जागतिक रंगभूमी दिन' २७ मार्च या दिनाचे औचित्य साधून यशवंत विद्यालय अहमदपूर येथे विविध नाटकात वापरण्यात येणाऱ्या प्राणी पक्षी कार्टून्स इत्यादी चेहऱ्याव लावण्यासाठीचे विद्यार्थ्यांने विविध आकाराचे मुखवटे साकारले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात २०२४-२५ या शैक्षणिक



वर्षापासून 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविला जातो.

सदरील उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना टाकाऊ पुठ्ठ्यापासून सुरेख मुखवटे तयार साकारण्यासाठी कला शिक्षक महादेव खळुरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. लहान मोठे आकाराचे मुखवटा कलाकृतीतून आनंददायी शिक्षण विद्यार्थ्यांने घेतला.

वरील उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव डी.बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगविकर, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, उपसचिव डॉ. सुनिता चवळे, मुख्याध्यापक गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी आदिनी कौतुक व अभिनंदन केले.



## संक्षिप्त वृत्त...



### मानस देशमुख महावाचन स्पर्धेत तालुक्यात प्रथम

**उदगीर, दि.२९ मार्च -**

येथील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई आयोजित महावाचन उत्सव २०२४ समग्र शिक्षा, जिल्हा परिषद लातूर महावाचन लेखन स्पर्धा तीन भिन्न वयोगटात घेण्यात आली. यात लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील मानस संजय देशमुख हा ९ वी ते १२ वी या गटात तालुकास्तरीय वाचन स्पर्धेत सर्वप्रथम आला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या एखाद्या पुस्तकावर परिक्षण लिहिणे अपेक्षित होते. यात मानसने विश्वास नांगरे पाटील लिखित मन है विश्वास या पुस्तकाचे परिक्षण लिहिले होते. लातुर येथे स्काऊट गाईड कार्यालयात वंदना फुटाणे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) प्रमोद पवार उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यशस्वीतेबद्दल मधुकरराव वट्टमवार, शंकरराव लासुणे, सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, अरुण पत्की, कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले यांसह सर्व शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले.



### घरोघरी जाऊन साजरी केली इफ्तार पार्टी

**शिरूर अनंतपाळ, दि.२९ मार्च -**

शिरूर अनंतपाळ शहरातील प्रभाग क्रमांक ३ मध्ये कोरोना काळात सर्व धार्मिक, सामाजिक कार्यक्रमावर बंदी होती तेंव्हा पवित्र रमजान महिन्यात शिरूर अनंतपाळ सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी आगळ्या वेगळ्या पद्धतीने व शासनाच्या नियमांचे पालन करत घरोघरी जाऊन मुस्लिम बांधवांना पवित्र रमजान महिन्याच्या शुभेच्छा व इफ्तार पार्टीची सुरवात केली. यावेळी नामदेवराव जगताप, गोविंद मलवाडे, कैलास शिंदे, त्र्यंबक तोंडारे, संजय आवाळे, अशोक शिवणे, सुनिल तोंडारे, संभाजी पारशेटे, बालाजी बरबटले, आसिफ उजेडे, गणी तांबोळी, पप्पू तांबोळी, मुन्ना बरबटले, परवेज मुजेवार, प्रविण शिवणे, तसेच मित्र परिवार उपस्थित होता.

### रामनवमी निमित्त उदगीरमध्ये सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन

**उदगीर, दि.२९ मार्च -**

श्रीराम प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने रामनवमीच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. युवा पिढीला शारीरिकदृष्ट्या सक्षम व बळकट बनवण्यासाठी आणि सुदृढ राष्ट्रनिर्मितीच्या उद्देशाने आयोजित सपाटे सूर्यनमस्कार स्पर्धा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन माजी मंत्री व उदगीरचे आमदार संजयभाऊ बनसोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमोलभैया निडवदे, श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सतीश राजेंद्र पाटील, अजय नवरखेले, अनिल मुदाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# निटूर येथे दोन गटात राडा; दगडांच्या वर्षावासह तलवार लोखंडी रॉड खंजीरने हल्ला

**सात जण गंभीर जखमी... पंधरा जणांवर गुन्हा दाखल...**

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२९ मार्च**

तालुक्यातील निटूर हे बाजारपेठेचे गाव आहे. येथे दर सोमवारी आठवडी बाजार भरतो आजुबाजुच्या दहा ते पंधरा खेड्यापाड्यातील लोक बाजारात भाजीपाला व राशन खरेदीसाठी येतात. येथे बाजारपेठ असल्याने या गावात सुसंस्कृत, संयमाने वागणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. परंतु काही विघ्नसंतोषी लोकांमुळे या गावाच्या लोकांना भितीयुक्त वातावरणात जिवन जगावं लागते आहे.

दोन दिवसांपूर्वी रात्री साडेआठच्या सुमारास मागील भांडणाची कुरापत काढून दोन गटात हाणामारी झाली. यात दोन्ही बाजूंनी दगडफेक, तलवार, लोखंडी, रॉड खंजीरने मारहाणीत सातजण गंभीर जखमी झाले आहेत.

याबाबतीत शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात पंधरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच जणांना ताब्यात घेतले आहे. पोलीसांकडुन मिळालेली माहिती अशी की, निटूर येथे गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास लातूर-निटूर-जहिराबाद महामार्गावर एका हॉटेलसमोर मागील भांडणाची कुरापत काढून हाणामारीला सुरुवात झाली.

यामध्ये एकच गोंधळ उडाला. यामध्ये तलवारी लोखंडी रॉड खंजीर आशा धारदार शस्त्रांचा वापर करण्यात आला. यात सातजण गंभीर जखमी झाले असून पोलिसांनी उपचारासाठी लातूर येथे दाखल केले आहे.

याबाबत शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात संभाजी शिंदे, समीर शिंदे, बुध्दा कांबळे, शुभम कांबळे, सुमीत कांबळे, समाधान कांबळे, संदीप मचाळे, सचिन मधाळे, समाधान शिंदे, आदेश कांबळे, अविनाश हारणे, माधव साठे, राम गजभार, संकेत गजभार, हरी गजभार सर्व राहणार निटूर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे.

या हाणामारी दरम्यान चार चारचाकी वाहनांची तोडफोड करण्यात आली.

मारहाण प्रकरणी तीन जणांविरुद्ध अट्रॉसिटी तर इतर बारा आरोपी विरोधात प्राणघातक हल्ला प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपअधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गजानन अन्सापुरे हे



करीत आहेत. हाणामारी चारचाकी वाहनांची तोडफोड केल्याने नागरिकांतून भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

निटूर हे बाजारपेठेचे गाव आहे येथील व्यापार लाईन शांत व संयमी आहे. परंतु काही वर्षांपासून वरचेवर वाढत चालेली गुंडगिरी बेकायदा देशी विदेशी दारू, मटका, जुगार खेळणे गुटखा ह्या अवैध धंद्यामुळेच आमच्या गावची बदनामी होते आहे. या लोकांना कायद्याची भिती राहिलीच नाही. याकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांमधून बोलले जाते.

## रेणापूर तालुक्यासह पानगाव परिसरात वाढला उन्हाचा पारा

### नवीन कुलर व पंखे विक्रीत वाढ...

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.२९ मार्च -**

रेणापूर तालुक्यासह पानगाव परिसरात दोन आठवड्यापासून तापमानाने ४० अंश सेल्सिअस पार केले असून या कडाक्याच्या उन्हाळ्याने नागरिकासह सर्वच सजीव प्राण्यांची लाही लाही होत आहे.

सकाळी नऊ वाजल्यापासूनच सूर्य आग ओकत असल्याने गावातील मुख्य बाजारपेठा, चौक, बस स्थानक, आठवडी बाजार या अतिशय वर्दळीच्या ठिकाणी दोन आठवड्यापासून माणसा अभावी तथा गावातील वर्दळीचे ठिकाणे सुनसान पडल्याचे चित्र दिसून येत आहे.

गेल्या सात ते आठ दिवसापासून तापमान वाढल्यामुळे व्यवसायावर त्याचा परिणाम झालेला दिसून येत आहे. व्यवसायिक ग्राहक नसल्याने व्यापारी आर्थिक संकटात सापडले आहेत.



दरम्यान वाढलेल्या तापमानामुळे ग्रामीण भागात नवीन कुलरची व पंख्याची विक्रमी विक्री होत आहे.

तसेच पुरुष टोप्या व गमजा तर महिलांकरिता हातरुमालांची विक्री वाढलेली आहे. बहुतांशी महिला व मुली उन्हापासून बचावात्मक उपाय म्हणून कानाला चेहऱ्याला ओढण्या गुंडाळून घराबाहेर पडताना दिसून येत आहेत.

त्यामुळे या साहित्याचा विक्रीत अचानक वाढ झालेली दिसून येत आहे. तर दुसरीकडे या वाढत्या तापमानाने शीतपेयांची मागणी वाढली आहे.

छोट्या मोठ्या शीतपेय दुकानदारांचे व्यवसाय चांगले चालत असल्याने आता शीतपेय रसवंती ग्रह थाटलेली बघायला मिळत आहेत.

## वलांडीत इफ्तार पार्टीतून हिंदू मुस्लिम एकतेचे संदेश व मस्जिद परिचय कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२९ मार्च -**

तालुक्यातील वलांडी येथे शूक्रवार दि २८ मार्च रोजी पवित्र रमजान महीन्यात इफ्तार पार्टीतून हिंदू मुस्लिम एकतेचे संदेश देण्यात आले. ईफ्तार पार्टी व नमाज पठण झाल्यावर सर्व धर्मिय बांधवांसाठी मस्जिद परिचय कार्यक्रम उस्मानिया मस्जिदीच्या आत घेण्यात आले.



किबलाकडे मक्केच्या दिशेने नमाज पठण कसे करतात तर पवित्र कूरआनमध्ये नमाज अदा करण्यासाठी किबला (काबा) कडे तोंड करण्याचा आदेश दिला आहे. इफ्तार पार्टीत पोलीस उपविभागीय अधिकारी नितीन कटेकर, पंडीत धूमाळ, गटविकास अधिकारी सागर वरंडेकर, सपोनि. माणिकराव डोके, बालाजी केंद्रे, सह तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

इफ्तार पार्टीचे आयोजन राम भंडारे, अंकुश गायकवाड, हसन मोमीन, शादूल बौडीवाले, अहेमद पठाण, अक्रम शेख, निहाज मूर्शेद आदीने केले होते.

## उस्तुरी येथील श्री. नागनाथेश्वर यात्रेचे पशू प्रदर्शनाने उत्साहात सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२९ मार्च -**

उस्तुरी (ता. निलंगा) येथे दरवर्षी गुढीपाडव्याला ग्रामदैवत श्री. नागनाथेश्वरांची यात्रा आयोजित केली जाते. चौदाव्या शतकात हेमाडपंती पध्दतीने बांधलेले हे मंदिर म्हणजे कलाकृतीचे एक उत्तम उदाहरण आहे. या मंदिराला क तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळाले असुन यात्रेनिमित्ताने नाट्य मंडळाच्या कलाकराच्या सहकार्याने सांस्कृतिक नाटकांचे आयोजन केले जाते.नाटक पाहण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उस्तुरीत येतात. परंपरेनुसार चालत आलेला यात्रेचा उपक्रम यावर्षीही मोठ्या उत्साहाने साजरा होणार असून यावर्षी विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल या यात्रेत पहावयास मिळणार असुन ष.ब्र.१०८ श्री. राजशेखर स्वामी व मनिप्र कोरणेश्वर स्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार दि.२८ मार्च रोजी सकाळी १० वाजता पशु प्रदर्शनाने यात्रेचे उत्साहात सुरुवात झाली. तरी उस्तुरी परिसरातील सर्व नागरिक व भाविकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा, असे यात्रा संयोजन समिती व सर्व ग्रामस्थांकडुन आवाहन करण्यात आले आहे.

## जागतिक रंगभूमी दिनानिमित्त यशवंतच्या विद्यार्थ्यांनी साकारले मुखवटे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२९ मार्च -**

'जागतिक रंगभूमी दिन' २७ मार्च या दिनाचे औचित्य साधून यशवंत विद्यालय अहमदपूर येथे विविध नाटकात वापरण्यात येणाऱ्या प्राणी पक्षी कार्टून्स इत्यादी चेहऱ्याव लावण्यासाठीचे विद्यार्थ्यांने विविध आकाराचे मुखवटे साकारले.

पहिला जागतिक रंगभूमी दिन १९६२ मध्ये साजरा झाला. प्रतिवर्षी या दिवशी विविध कार्यक्रम व उपक्रमांद्वारे जागतिक रंगभूमी दिन उत्साहाने साजरा केला जातो.आपल्या संस्कृतीत-सामाजिक आणि धार्मिक उत्सवांमध्ये आणि नाट्यप्रयोगांमध्ये-मुखवटे घालण्याचा मोठा इतिहास आहे. शालेय स्नेह संमेलनात मुलांसाठी, मुखवटे वापरुन मजेदार आनंद लुटत



असत. बऱ्याच वेळा नाट्यीकरण करत असताना आपल्याला काही प्राण्यांचे, पक्ष्यांचे मुखवटे लागत असतात. नाटकांच्या सादरीकरणादरम्यान, मुखवटे प्रामुख्याने पात्रांत राग, दुःख आणि आनंद व्यक्त करण्यासाठी वापरले जातात.अशा मुखवटे पासून नाटकात जिवंत दर्शन घडते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार, NEP-२०२० मूल्यसंसस्कार किंवा आनंद हा केवळ पाठ्यपुस्तके वाचून निर्माण होत नाही. तर ती कृतीमधून, अनुभवांतून, खेळांतून, कलेतून, पर्यटनांतून, प्रात्यक्षिकांतून, स्वनिर्मितीमधून आणि बौद्धिक खेळांतून हे साधता येते.

यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शालेय आनंददायी शनिवार 'दप्तराविना शाळा' हा विचार मांडला गेला. म्हणून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविला जातो. सदरील उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना टाकाऊ पुठ्ठ्यापासून सुरेख मुखवटे तयार साकारण्यासाठी कला शिक्षक महादेव खळुरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. लहान मोठे आकाराचे मुखवटा कलाकृतीतून आनंददायी शिक्षण विद्यार्थ्यांने घेतला.

वरील उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव डी.बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगविकर, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, उपसचिव डॉ. सुनिता चवळे, मुख्याध्यापक गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सूर्यवंशी आदिनी कौतुक व अभिनंदन केले.

## वैद्यकीय क्षेत्रातील असामान्य कार्यकृतत्व म्हणजे मेरी लास्कर होय : डॅनिअल मस्करणीस




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२९ मार्च -**

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत कर्करोगाच्या औषधाचे संशोधन करावया शासनाला भाग पाडणाऱ्या मेरी लास्कर यांच्या जीवन चरित्रावर सुंदर असा वाचक संवाद संपन्न झाला.

अमेरिकेतील मेरी लास्कर या काही डॉक्टर, संशोधिका किंवा राजकीय व्यक्ती नसल्या तरी त्या आरोग्याशी निगडित समस्येमुळे अस्वस्थ होत्या. लास्कर फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने कार्य करीत राहिल्या. गरजेपोटी दानशूर व्यक्तीकडून वर्गणी गोळा करायच्या. प्रसंगी राजकीय लोकांना जाब विचारत या सामान्य स्त्रीने आरोग्य आणि कर्करोगाशी निगडित वैद्यकीय क्षेत्रातील असामान्य कार्यकृतत्व म्हणजे मेरी लास्कर होत, असे विचार पुणे येथील आयटी तज्ज्ञ व साहित्यिक मा. डॅनिअल मस्करणीस यांनी व्यक्त केले.

उदगीर येथील वाचक संवादाचे ३३३ वे पुष्प मा. डॅनिअल मस्करणीस यांनी मेरी लास्कर या स्वलिखित पुस्तकावर संवाद साधून गुंफले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. धनाजी कुमठेकर हे उपस्थित होते.

पुढे बोलताना मा. डॅनिअल मस्करणीस म्हणाले, मेरी लास्कर यांच्या प्रयत्नामुळे अमेरिकेत विविध आजारावर कार्य करणाऱ्या लास्कर फाउंडेशनच्या २७ उपसंस्था कार्यरत आहेत. याचा उपयोग केवळ अमेरिकेतील लोकांनाच नाही, तर जगातील शेकडो लोकांच्या आरोग्यासाठी होत आहे. आज आरोग्याशी निगडित कार्य करण्यासाठी संस्था आहेत, परंतु समाज व राजकीय लोकांचे पाठबळ त्यांना नाही.

निधी कमी पडत असल्यामुळे या संस्थेमार्फत समाधानकारक संशोधन होत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत मेरी लास्कर यांनी आरोग्यासाठी केलेले कार्य विचार करायला लावणारे आहे.

यावेळी उपस्थित श्रोत्यांनी अनेक प्रश्न विचारले त्यास संवादकांनी अतिशय वस्तुनिष्ठपणे समाधानकारक उत्तर देत श्रोत्यांना अंतर्मुख केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य संयोजक अनंत कदम, आनंद बिरादार, तुळशीदास बिरादार, डॉ.कांत जाधव, मुरलीधर जाधव, प्रा.राजपाल पाटील, सुरेश वजनम आदींनी प्रयत्न केले. कार्यक्रमास उद्योजक रमेश अंबरखाने, डॉ.संग्राम पटवारी आदींसह अनेक मान्यवर, विद्यार्थी, पत्रकार, उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ.म.ई.तंगावार तर आभार प्राचार्य डॉ.शिवाजी सगर यांनी मानले.

## बी.टी. चव्हाण यांचा कार्यपूर्ती गौरव सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२९ मार्च -**

शिरूर अनंतपाळ पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बी.टी. चव्हाण यांचा पंचायत समिती शिरूर आनंतपाळ कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्याकडून कार्यपूर्ती गौरव सोहळा संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डोंगरे यांनी केले.

या कार्यक्रमाची सुरुवात भोजराज विद्यालयाच्या बाल विद्यार्थ्यांकडून स्वागतम स्वागतम हा मानाचा मुजरा या स्वागत गीताने करण्यात आला. बी.टी. चव्हाण यांच्या कार्यशैलीने व कार्य तत्परतेमुळे तालुकाभरातील अनेक मान्यवराकडून या कार्यक्रमासाठी उपस्थिती लावण्यात आली होती.

या उपस्थितीमध्ये सोमनाथ स्वामी, गोविंद पोद्दार, गोविंदराव चिलकुरे, मंगेश पाटील, सुतेज माने, ऋषिकेश बद्दे, येमुलवाड नंदकिशोर शेरखाने, बंडू पाटील, बद्रीनाथ सूर्यवंशी, लिंबराज माने, बालाजी सूर्यवंशी, भागवत वंगे, सुखदेव पाटील, उपसरपंच योगेश बिरादार, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे तालुकाध्यक्ष उत्तमराव कदम, राजनारायण बिरादार व सदस्य शिवहार कोटे, नितेश झांबरे या सर्वाकडून उपस्थिती लावण्यात आली.

## क्षयरोग सप्ताहानिमित्य रोटरी व ग्रामीण रुग्णालयाचे फूड बास्केट वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२९ मार्च -**

जागतिक क्षयरोग सप्ताह निमित्त अहमदपूर येथे रोटरी क्लब व ग्रामीण रुग्णालय अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग बाधित रुग्णांना फूड बास्केटचे वाटप करण्यात आले. सर्वत्र वेगाने पसरत असलेल्या क्षयरोगावरती नियंत्रण मिळवण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र सरकार मोठ्या प्रमाणात कार्य करत आहे.

यामध्ये संशयित रुग्णांच्या तपासण्या करणे, रुग्णाची ओळख पटल्यानंतर त्यांना नियमित औषधोपचार देणे व रुग्णांच्या सभोवताली असणाऱ्या सर्व व्यक्तींची तपासणी करणे जेणेकरून संशयित आढळल्यास त्यांच्यावर त्वरित उपचार करणे व इतर अनेक उपक्रम आरोग्य विभागातर्फे चालवण्यात येत आहेत.

याचाच एक भाग म्हणून जागतिक क्षयरोग सप्ताह निमित्त



क्षयरोग बाधित रुग्णांना त्यांना पूरक असे अन्न व प्रोटीन्स मिळावे यासाठी फुटबोस्केट देण्यात येत आहेत.



अहमदपूर येथे ग्रामीण रुग्णालयात दिफ२८ मार्च रोजी रोटरी क्लब व ग्रामीण रुग्णालय यांनी संयुक्त उपक्रम घेऊन क्षयरोग बाधित रुग्णांना अशा फूड बास्केटचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. जयप्रकाश केंद्रे हे होते. तर या कार्यक्रमास रोटरीचे अध्यक्ष राजीव कल्याणे, सचिव अनिल फुलारी, डॉ. प्रवीण जगताप, डॉ. नाथराव कराड डॉ. रमेश केंद्रे, भरत ईगे, अनिल चवळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व क्षयरोगाबद्दल मार्गदर्शन डॉ. प्रवीण जगताप यांनी केले. यावेळी रोटरीच्या वतीने प्रा. अनिल चवळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिस्टर मारथा भुसूम, सिस्टर प्रवीणा पाटील व राजेंद्र पांडे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश सूर्यवंशी यांनी केले तर आभार सिस्टर प्रवीणा पाटील यांनी मांडले.